सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

# कार्यक्रम अंदाजपत्रक
# २०२६-२७
# मराठी भाषा विभाग

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई
२०२६

# मराठी भाषा विभाग

# कार्यक्रम अंदाजपत्रक

# २०२६-२७

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | कार्यक्रमाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | ४ |
| २. | मराठी भाषा विभाग, मंत्रालय | ५-१६ |
| ३. | भाषा संचालनालय | १७-३० |
| ४. | राज्य मराठी विकास संस्था | ३१-६२ |
| ५. | महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ | ६३-६८ |
| ६. | महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ | ६९-७४ |
| ७. | सन २०२५-२६ अर्थसंकल्पीय अंदाज व सुधारित अंदाज आणि सन २०२६-२७ अर्थसंकल्पीय अंदाज | ७५-७७ |

## कार्यक्रम क्रमांक-१

### प्रस्तावना

मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये "मराठी भाषा विभाग" असा स्वतंत्र प्रशासकीय विभाग शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरओबी-२०१२/१०८/१८ (र. व का.), दिनांक २९ नोव्हेंबर, २०१० अन्वये निर्माण करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीतील सामान्य प्रशासन विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग आणि शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्या अखत्यारित असलेले मराठी भाषेशी संबंधित विषय तसेच, मराठी भाषाविषयक कामकाज हाताळणारी खालील कार्यालये / संस्था / मंडळे मराठी भाषा विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली वर्ग करण्यात आली आहेत :-

१. भाषा संचालनालय

२. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

३. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ

४. राज्य मराठी विकास संस्था

## कार्यक्रम क्रमांक-२

## मराठी भाषा विभाग, मंत्रालय

मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये “मराठी भाषा विभाग” असा स्वतंत्र प्रशासकीय विभाग शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरओबी-२०१२/१०८/१८ (र. व का.), दिनांक २९ नोव्हेंबर २०१० अन्वये निर्माण करण्यात आला आहे. मराठी भाषा विभागाचे मुख्य उद्दीष्ट मराठी भाषेचा प्रचार, प्रसार, विकास, जतन व संवर्धन हे आहे. विभागाकडून खालील कामकाज हाताळण्यात येते.

**(१) मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा :-**

भारतीय भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यासंदर्भात केंद्र शासनाकडून कार्यवाही केली जाते. अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी केंद्र शासनाने कळविलेल्या निकषांच्या अनुषंगाने मराठी भाषा ही अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी पात्र ठरते किंवा कसे, याबाबतचा अभ्यास करुन केंद्र शासनाकडे परिपूर्ण प्रस्ताव पाठविण्यासाठी राज्य शासनाने प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली भाषा तज्ज्ञांची एक समिती दि.१० जानेवारी, २०१२ च्या शासन निर्णयानुसार स्थापन केली होती. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याबाबतचा परिपूर्ण अहवाल शासनाने दि.१२ जुलै, २०१३ रोजी केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाकडे पाठविला होता.

मा. मुख्यमंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने मा. पंतप्रधान महोदयांना दि.२४.०८.२०२२ रोजीचे पत्र अग्रेषित करण्यात आले होते. त्यास अनुसरुन केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाने दि.०३.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याचा राज्य शासनाचा प्रस्ताव केंद्रीय मंत्रालयाच्या विचाराधीन असून, त्याबाबतची कार्यवाही सुरु असल्याचे कळविले होते.

केंद्रीय मंत्रिमंडळाने दि.०३.१०.२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये मराठी भाषेस अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत निर्णय घेतला.

➢ **<u>मराठी भाषेस अभिजात दर्जा मिळाल्यानंतर होणारे फायदे खालीलप्रमाणे आहेत :-</u>**

- केंद्र शासनाकडून प्रतिवर्षी मराठी भाषा विकासाच्या अनुषंगाने निधी मिळणार.
- भाषा भवन उभारणे, मराठी भाषेतील ग्रंथ व साहित्याच्या प्रसारासाठी, ग्रंथ निर्मिती, देशभरातील विद्यापीठे किंवा अन्य संस्थांमार्फत भाषेच्या प्रचार, प्रसाराकरिता सदर निधी मिळणार.
- मराठी भाषेतील विद्वानांसाठी प्रतिवर्षी दोन राष्ट्रीय पुरस्कार.
- सेटर ऑफ एक्सलन्स फॉर स्टडीज स्थापना होणार.
- प्रत्येक विद्यापीठात त्या भाषेचा अभ्यास करण्यासाठी विशेष केंद्राची उभारणी, अशा रितीने ४५० विद्यापीठांमध्ये मराठी शिकण्याची व्यवस्था.
- प्राचीन ग्रंथांचा अनुवाद केला जाणार.

राज्य मंत्रिमंडळाच्या दि.१४.१०.२०२४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये प्रतिवर्षी दि.३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा सन्मान दिन म्हणून साजरा करण्यास, तसेच, अभिजात मराठी भाषाविषयक जनजागृतीकरिता अभिजात मराठी भाषा सप्ताह साजरा करण्यास व अन्य बाबींना मान्यता मिळाली. त्यास अनुसरुन शासन निर्णय,दि.१४.१०.२०२४ निर्गमित करण्यात आला आहे. त्यातील तरतूदी खालीलप्रमाणे आहेत-

१) प्रतिवर्षी दिनांक ३ ऑक्टोबर हा दिवस ‘अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस’ म्हणून साजरा करण्यात यावा.

२) प्रतिवर्षी दि. ३ ऑक्टोबर ते दि. ९ ऑक्टोबर या कालावधीत राज्यातील सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये ‘अभिजात मराठी भाषा सप्ताह’ आयोजित करण्यात यावा.

३) मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर येथे अभिजात भाषेच्या संशोधन व अध्ययनासाठी एक उच्च दर्जाचे संशोधन केंद्र (Centre of Excellence) तसेच, अनुवाद अकादमी स्थापित करण्यात यावी.

४) केंद्र सरकार व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहकार्याने सर्व विद्यापीठांमध्ये टप्प्याटप्प्याने मराठी अध्यासने स्थापित करण्यात यावीत.

५) अभिजात मराठी भाषा या संशोधन क्षेत्रातील एका महनीय व्यक्तीचा अभिजात मराठी भाषा सन्मान पुरस्कार देऊन गौरव करण्यात यावा व याच सप्ताहात मराठी भाषा विभागांतर्गत येणाऱ्या संस्था व मंडळे यांच्या पुरस्कारांचे वितरण करण्यात यावे.

६) नियोजित मराठी भाषा भवनामध्ये अभिजात मराठी भाषेतील पोथ्या, हस्तलिखित साहित्य, कागदपत्रे आदींचे एक मध्यवर्ती संग्रहालय स्थापन करण्यात यावे.

७) नियोजित मराठी भाषा भवनामध्ये अभिजात मराठी भाषा दालन निर्माण करण्यात यावे. अभिजात मराठी भाषेचा इतिहास उलगडून दाखविणारी चित्रफीत तयार करुन, ती अभिजात मराठी भाषा दालनात तसेच, राज्यातील सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये दाखविण्यात यावी.

८) बृहन्महाराष्ट्र मंडळे व आंतरराष्ट्रीय मराठी भाषा मंचाच्या माध्यमातून अभिजात मराठी भाषेच्या जतन, संवर्धन, प्रचार व प्रसाराचे कार्य करण्यात यावे.

९) अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळातंर्गत येणाऱ्या चार घटक संस्था व कोकण मराठी साहित्य परिषद आणि दक्षिण महाराष्ट्र साहित्य परिषद अशा साहित्य संस्थांनी अभिजात मराठी भाषा विषयक उपक्रम राबवावेत.

१०) अभिजात मराठी भाषा सन्मान दिन व सप्ताह साजरा करण्याच्या अनुषंगाने शासनस्तरावरुन सविस्तर मार्गदर्शक तत्वे, कार्यक्रमांच्या आयोजनाबाबत सूचना निर्गमित करण्यात येतील.

उपरोक्त नमूद दि.१४.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयास अनुसरुन अभिजात मराठी भाषा दिवस व अभिजात मराठी भाषा सप्ताह साजरा करण्याच्या अनुषंगाने शासनस्तरावरुन सविस्तर मार्गदर्शक तत्वे, कार्यक्रमांच्या आयोजनाबाबत दि.२१.७.२०२५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये खालीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत-

१) राज्यातील सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालये / महामंडळ, केंद्रशासनाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालये, मंडळे / महामंडळे, सार्वजनिक उपक्र, सर्व खाजगी उद्योग, आस्थापना व व्यापारी बँका, सर्व शैक्षणिक संस्था / विद्यापीठे / महाविद्यालये इ. सर्व संस्थामधून अभिजात मराठी भाषेसंदर्भातील जास्तीत जास्त संशोधन, संवर्धन व जनजागृती व्हावी या हेतूने प्रतिवर्षी दिनांक ३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा दिवस व दि. ३ ऑक्टोबर ते दि. ९ ऑक्टोबर या कालावधीत अभिजात मराठी भाषा सप्ताह म्हणून साजरा करण्यात यावा.

२) अभिजात मराठी भाषा सप्ताहामध्ये अभिजात मराठी भाषेसंदर्भात तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, शिबीरे आयोजित करण्यात यावीत.

३) अभिजात मराठी ग्रंथांची प्रदर्शने आयोजित करावीत. तसेच, ताम्रलेख / शिलालेखांच्या प्रदर्शनांचे आयोजन करुन, विद्यार्थी, सामान्य जनतेस मराठी भाषेतील अभिजात ग्रंथपरंपरेची ओळख करुन द्यावी.

४) अभिजात मराठी भाषेच्या अनुषंगाने प्राचीन ग्रंथ संपदेचे समकालीन मराठी मध्ये अनुवाद केलेल्या पुस्तकांचे प्रदर्शन व विक्री करणे.

५) शाळा / महाविद्यालयांमध्ये अभिजात मराठी ग्रंथ संपदेचे डिजिटाईझेशन करुन, त्याची विद्यार्थ्यांना तोंडओळख करुन देणे. तसेच, सदर ग्रंथाचे जतन व संवर्धन करण्याच्या पद्धतीचा चलचित्र सादरीकरण (स्लाईड शो) करणे.

६) शाळा / महाविद्यालये तसेच, शासकीय कार्यालयांमध्ये मराठी भाषेसंदर्भात प्रश्नमंजूषेचे (quiz), निबंध लेखन, वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करणे.

**(२) <u>प्रशासनिक व्यवहारात मराठी भाषेचा वापर वाढविणे</u> :-**

दिनांक १ मे, १९६० रोजी जेव्हा महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली तेव्हा शासनाने शक्य तितक्या लवकर इंग्रजीऐवजी मराठीतूनच राज्यकारभार करण्याचे धोरण जाहीर केले. त्यानुसार, महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ अन्वये दिनांक २६ जानेवारी, १९६५ पासून मराठी ही राज्याची राजभाषा म्हणून घोषित करण्यात आली व महाराष्ट्र राज्याची राजभाषा म्हणून देवनागरी लिपीतील मराठी भाषेचा अंगिकार करण्यात आला. तद्नंतर, 'महाराष्ट्र राजभाषा (वर्जित प्रयोजने) नियम, १९६६', च्या अधिसूचनेन्वये दिनांक १ मे, १९६६ पासून 'वर्जित प्रयोजने' वगळता सर्व शासकीय प्रयोजने मराठीतून करणे अनिवार्य करण्यात आले. यामध्ये नमूद करण्यात आलेली 'वर्जित प्रयोजने' सर्वसाधारणपणे पुढीलप्रमाणे आहेत :-

१. केंद्र शासन व केंद्रीय कार्यालये यांच्याशी करण्यात येणारा पत्रव्यवहार.

२. अन्य राज्यांशी करण्यात येणारा पत्रव्यवहार.

३. परराष्ट्रांचे दूतावास यांच्याशी करण्यात येणारा पत्रव्यवहार.

४. महालेखापाल कार्यालयाशी करण्यात येणारा पत्रव्यवहार तसेच, त्यांच्याकडे द्यावयाचे लेखे.

५. न्यायालयीन व विधिविषयक बाबी.

६. वैद्यकीय औषधी योजना, अहवाल आणि वैद्यकीय अहवालातील तांत्रिक बाबी.

**(अ) शासन व्यवहारात मराठीचा वापर करणे सुलभ व्हावे म्हणून शासनाने खालीलप्रमाणे उपाययोजना केलेली आहे :-**

**१)** शासन व्यवहारात मराठीचा वापर करणे सुलभ होण्याच्या दृष्टीने, आवश्यक असलेल्या भाषिक क्षमता व कौशल्ये शासकीय कर्मचारी व अधिकारी यांनी प्राप्त करणे आवश्यक आहे. यासाठी भाषा संचालनालयाकडून मराठी भाषा परीक्षा घेण्यात येते. इंग्रजी लघुलेखक / लघुटंकलेखक / टंकलेखक / लिपिक-टंकलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांसाठी भाषा संचालनालयाकडून घेण्यात येणारी मराठी लघुलेखन / टंकलेखन परीक्षा तसेच, केंद्रीय कामकाजाची भाषा हिंदी असल्यामुळे ज्या शासकीय कर्मचारी / अधिकारी यांनी एस.एस.सी. परीक्षेत हिंदी विषय घेऊन परीक्षा उत्तीर्ण केली नसेल, त्यांच्यासाठी भाषा संचालनालयामार्फत हिंदी भाषा परीक्षा घेण्यात येते.

या परीक्षा सर्व शासकीय कर्मचाऱ्यांनी विहित मुदतीत उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. विहित मुदतीत या परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास सदर अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढी परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत रोखून ठेवल्या जातात.

**२)** विभागाच्या अधीनस्त असलेल्या भाषा संचालनालयामार्फत प्रमाण नमुने, सर्वसाधारण नमुने व विशेष नमुने, संक्षिप्त शेऱ्यांची पुस्तिका उपलब्ध करण्यात आली आहे. तसेच, शासकीय कर्मचाऱ्यांना मराठीतून टिप्पण्या व पत्रव्यवहार करणे सुलभ व्हावे, या उद्देशाने प्रशासनिक लेखनाला उपयुक्त होईल असे साहित्य, पुस्तके, शुद्धलेखन नियमावली, विविध परिभाषा कोश, शब्दावल्या तयार करण्यात येऊन, त्यांच्या प्रती शासकीय कार्यालयांना पुरविण्यात आल्या आहेत. तसेच, प्रशासकीय

कामकाजात मराठी भाषेचा प्रभावी वापर होण्यासाठी भाषा संचालनालयाने यापैकी बहुतेक माहिती भ्रमणध्वनी उपयोजकावर देखील उपलब्ध केली आहे.

**(ब) महाराष्ट्र राजभाषा अधिनियम (सुधारणा), २०२१, दि. १६ जुलै, २०२१ :-**

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ मध्ये सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१ दि. १६ जुलै, २०२१ महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात आला आहे.

सदर अधिनियमामध्ये खालील प्रमाणे महत्त्वाच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत-

१. शासकीय प्रयोजने स्पष्ट करण्यात आलेली आहेत.

२. राज्य शासनाचे प्रत्येक कार्यालय जनसंवाद व जनहित यांच्यासंबंधित त्यांच्या धोरणामध्ये मराठीचा वापर करण्यासाठी यथोचित तरतूद करेल.

३. मराठी भाषा अधिकारी प्रत्येक कार्यालयात नेमण्यात येईल.

४. सर्व कार्यालये त्यांच्या संकेतस्थळावर किंवा संदेशवहनाच्या कोणत्याही साधनांवर मराठी भाषेच्या वापराबाबत स्वयंप्रेरणेने प्रकटीकरण करतील.

५. सदर अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी न करणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

६. अधिनियमातील तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करणे, मराठी भाषेचा वापर न करण्याबाबतच्या तक्रारींचे निराकरण करणे आणि मराठी भाषेसंदर्भात विभागाने वेळोवेळी जाहिर केलेले उपक्रम राबविणे इत्यादी सर्व बाबींसंदर्भात जिल्हास्तरावर कार्यवाही करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली ‘जिल्हा मराठी भाषा समिती’ महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१ दि. १६ जुलै, २०२१ अन्वये स्थापन करण्यात आली आहे.

७. जिल्हास्तरीय समितीला मदत करण्यासाठी तसेच, सल्ला देण्यासाठी राज्यस्तरावर **‘राज्य मराठी भाषा समिती’** स्थापन करण्यात आलेली आहे. या समितीचे अध्यक्ष मा. मंत्री, मराठी भाषा हे असून, उपाध्यक्ष मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन हे आहेत.

**(क) महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरणे (राजभाषा) अधिनियम, २०२२ :-**

स्थानिक प्राधिकरणे म्हणजे महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत, औद्योगिक नगरी, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, अन्य कोणतीही स्थानिक स्वराज्य संस्था, नियोजन प्राधिकरण, राज्य सरकारची मालकी असलेली, त्याचे नियंत्रण असलेली किंवा निधी पुरवठा केलेली वैधानिक महामंडळे, शासकीय कंपन्या किंवा कोणतेही प्राधिकरण यांच्या कार्यालयीन कामकाजात आणि जनसंवाद व जनहिताशी संबंधित बाबींमध्ये मराठी भाषेचा वापर करणे या अधिनियमान्वये बंधनकारक करण्यात येणार आहे. सदर अधिनियम शासन निर्णय, क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.६२/भाषा-२, दि.९ मे, २०२२ अन्वये देखील उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

**(ड) महाराष्ट्र शाळांमध्ये मराठी भाषेचे सक्तीचे अध्यापन व अध्ययन अधिनियम, २०२०, दि.०९ मार्च, २०२० :-**

मराठी भाषेचा प्रचार व प्रसार होण्यासाठी तिचा अभ्यास शालेय स्तरापासून करण्याच्या अनुषंगाने शालेय शिक्षणामध्ये इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या राज्यातील सर्व प्रकारच्या शिक्षण मंडळांच्या शाळांमधून मराठी भाषा विषय अनिवार्य करण्याबाबतचा ‘महाराष्ट्र शाळांमध्ये मराठी भाषेचे सक्तीचे अध्यापन व अध्ययन अधिनियम , २०२०’ दि.०१ एप्रिल, २०२१

पासून राज्यामध्ये लागू करण्यात आला आहे. या संदर्भात नियम तयार करण्याची कार्यवाही शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून सुरु आहे.

❖ **मराठी भाषा संशोधन, विकास व सांस्कृतिक केंद्र स्थापन करणे :-**

महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक धोरणानुसार मराठी भाषेचा विकास, संवर्धन, जतन व संरक्षण करण्याच्या दृष्टीने सन २०१० पासून स्वतंत्र मराठी भाषा विभागाची स्थापना करण्यात आली आहे. या विभागाच्या अखत्यारीत असलेली ४ क्षेत्रीय कार्यालये मुंबईत विविध ठिकाणी कार्यान्वीत असून, या कार्यालयांचा एकमेकांशी समन्वय साधण्यासाठी ही कार्यालये एकाच इमारतीत असण्याची आवश्यकता विचारात घेऊन, मराठी भाषा विभागाच्या निर्मितीनंतर राज्याचे सांस्कृतिक धोरण-२०१० मध्ये शिफारस केलेले मराठी भाषा भवन उभारण्याचे प्रस्तावित आहे.

उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने दि. १४ फेब्रुवारी, २०१८ रोजी झालेल्या मा. मंत्रिमंडळ बैठकीत वांद्रे-कुर्ला परिसरात मराठी भाषा भवन, महाराष्ट्र, मुंबई येथे उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यास अनुसरुन शासन निर्णय, मराठी भाषा विभाग, दि. ५ मार्च, २०१८ निर्गमित करण्यात आला आहे.

**अ) मराठी भाषा भवन, मुख्य केंद्र, चर्नी मार्ग, मुंबई :-**

मराठी भाषेचा प्रचार, प्रसार, विकास, जतन आणि संवर्धन करणे तसेच, मराठी भाषेच्या अधिनस्त सर्व कार्यालये एकाच छताखाली आणण्याकरिता मराठी भाषा भवन हा उपक्रम हाती घेतला आहे. गिरगाव महसूली विभागातील भूखंड क्र.१७३६ व १७३६/१ येथील ३७७० चौ.मी. इतक्या क्षेत्रावर मराठी भाषा भवन उभारण्यात येणार आहे.

मराठी भाषा भवन, चर्नी मार्ग, मुंबई या इमारतीची संरचना G+२ Basement+५ प्रस्तावित आहे. सदर इमारतीमध्ये मराठी भाषा विभागाची अधिनस्त कार्यालये, शालेय शिक्षण विभाग यांची दोन कार्यालये, सुसज्ज ग्रंथालय, ॲम्फीथिएटर, बालोद्यान, ४०० प्रेक्षक क्षमतेचे प्रेक्षागृह प्रस्तावित आहे.

तसेच, या इमारतीमध्ये मराठी भाषेच्या समृद्ध दर्शन घडविणारी प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन अशी दालने प्रस्तावित आहेत. सदर दालनांमध्ये तत्कालीन कालखंडातील ग्रंथ, महनीय ग्रंथकर्त्यांची माहिती मराठी भाषेचा निर्देश करणाऱ्या प्राचीन शिलालेखांच्या प्रतिकृती असतील. मराठी भाषेचा झालेल्या विकासाचे दर्शन घडविणारी माहिती सदर दालनात असेल. तसेच, महाराष्ट्राचा भाषिक नकाशा प्रस्तावित असून, त्यामध्ये स्थाननिहाय मराठी भाषा, साहित्य, साहित्यिक अशी माहिती स्कॅन कोडद्वारे उपलब्ध होईल.

**ब) मराठी भाषा भवन, उपकेंद्र, ऐरोली :-**

दि.१४.०२.२०१८ च्या मा. मंत्रिमंडळ बैठकीमध्ये मराठी भाषा भवनचे मुख्य केंद्र दक्षिण मुंबई किंवा वांद्रे-कुर्ला वसाहत या परिसरामध्ये व उपकेंद्र ऐरोली, नवी मुंबई येथे बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार दि.०५.०३.२०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित करण्यात आले.

सदर इमारतीचे बांधकाम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून करुन घेण्यात येणार आहे. प्रस्तावित मराठी भाषा भवन, उपकेंद्र, ऐरोली, नवी मुंबई येथे साहित्यिकांच्या निवासासाठी प्रशस्त इमारत उभारण्यात येणार आहे. मराठी भाषा भवन उपकेंद्र, ऐरोली, नवी मुंबई या इमारतीचे एकूण बांधकाम क्षेत्रफळ ५३१६.१७ चौ.मी. होते. तथापि, सीआरझेडच्या नवीन

अधिसूचनेनुसार सदर क्षेत्रफळात वाढ होऊन ते ८६५४.७३ चौ.मी. झाल्याने मा. मंत्री, मराठी भाषा यांनी या बांधकामामध्ये काही सुधारणा करण्याचे व त्यानुसार पुर्ननिविदा काढण्याचे आदेश दिले होते. त्याप्रमाणे औद्योगिक विकास महामंडळाकडून सुधारित अंदाजपत्रक व आराखडे शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहे. सदर सुधारित अंदाजपत्रक व बांधकाम आराखडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आले आहे.

❖ **मराठी भाषा धोरण :-**

मा. मंत्रीमंडळाने दि. १३.०३.२०२४ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेस अनुसरुन, शासन निर्णय, मराठी भाषा विभाग, दि.१५ मार्च, २०२४ अन्वये महाराष्ट्र राज्याचे मराठी भाषा धोरण प्रसिद्ध करण्यात आले आहे. सदर धोरणाचा शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

❖ **विधानमंडळ मराठी भाषा समिती :-**

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ अन्वये ‘मराठी’ ही शासन व्यवहारासाठी राजभाषा म्हणून स्विकारण्यात आली आहे. सर्व क्षेत्रात राज्यातील राज्य शासकीय / निमशासकीय कार्यालयांमध्ये मराठी भाषेचा सक्षमपणे वापर करणे हे शासनाचे धोरण आहे. या धोरणाचा काटेकोरपणे अवलंब व्हावा व मराठी भाषेच्या वापरासंबंधी सर्व राज्य शासकीय / निमशासकीय कार्यालयांच्या कामाचा आढावा घेतला जावा, या उद्देशाने राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या सदस्यांचा समावेश असलेली, ‘संयुक्त विधिमंडळ मराठी भाषा समिती’ स्थापन करण्यात आली आहे. या समितीकडून राज्यातील शासकीय कार्यालयांचा व स्थानिक संस्थांच्या कामाचा आढावा घेण्यात येतो व प्रशासनाच्या कामात मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर व्हावा, यादृष्टीने समितीकडून विविध सूचना व उपाययोजना सुचविण्यात येतात.

❖ **आंतरराष्ट्रीय मराठी मंच स्थापन करणे :-**

मराठी भाषेचा प्रचार व प्रसार व संवर्धन करणे हे विभागाचे धोरण आहे. अनेक मराठी भाषिक परदेशात मराठी भाषेच्या संदर्भात विविध उपक्रम, कार्यक्रम राबवून आंतरराष्ट्रीय स्तरावर मराठी भाषेचा प्रचार-प्रसार व संवर्धन करण्याचा प्रयत्न करतात. सदर बाब शासनाच्या निदर्शनास आल्यामुळे विविध देशातील मराठी भाषिक आणि मराठी भाषेसाठी काम करणाऱ्या संस्थांना एका छत्राखाली आणून त्यांच्या उपक्रमांना शासनस्तरावर व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यासाठी मराठी भाषा विभाग, शासन निर्णय दि. ७ मार्च, २०२२ अन्वये आंतरराष्ट्रीय मराठी मंचाची स्थापना करुन, त्यासाठी समन्वयक नेमण्यात आले आहेत.

❖ **मराठी भाषा संवर्धनाकरीता विविध वार्षिक उपक्रम :-**

**(अ) मराठी भाषा संवर्धन पंधरवडा** :-

मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी, तिचे संवर्धन करुन वृद्धिंगत करण्यासाठी दरवर्षी दि. १ जानेवारी ते १५ जानेवारी हा कालावधी ‘मराठी भाषा संवर्धन पंधरवडा’ म्हणुन साजरा करण्यात येत होता. सदर ‘मराठी भाषा संवर्धन पंधरवडा’ सन २०२१ पासून दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीत साजरा करण्याचा निर्णय शासन निर्णय क्र.मभापं-२०१९/प्र.क्र.१११/भाषा-२, दि. १८ सप्टेंबर, २०२० अन्वये घेण्यात आला आहे. या कालावधीत शाळा, महाविद्यालये यांच्या सहभागाबरोबरच सर्व प्रशासनिक विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, शासकीय संस्था/मंडळ, सार्वजनिक उपक्रम, राज्यातील सर्व केंद्रीय कार्यालये, बँका, वाणिज्य संस्था इत्यादी कार्यालयांनी मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत दरवर्षी स्वतंत्रपणे शासन परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात येतात.

**(आ) मराठी भाषा गौरव दिन (दिनांक २७ फेब्रुवारी) :-**

ज्येष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून, मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. आपल्या मातृभाषेचा गौरव म्हणून आणि त्यांच्या स्मृतीला अभिवादन म्हणून शासन निर्णय क्र.मभादि-१०१२/प्र.क्र.८८/२०१२/भाषा-३, दिनांक २१ जानेवारी, २०१३ अन्वये दिनांक २७ फेब्रुवारी हा त्यांचा जन्मदिन राज्यभर ‘मराठी भाषा गौरव दिन’ म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णयास अनुसरुन सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये, शासकीय संस्था/मंडळ, सार्वजनिक उपक्रम इत्यादी कार्यालयांनी समारंभपूर्वक ‘मराठी भाषा गौरव दिन’ सोहळा साजरा करण्याबाबत दरवर्षी स्वतंत्रपणे शासन परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात येतात.

शासनातर्फे या दिवशी (१) मराठी साहित्य क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या ज्येष्ठ साहित्यिकास ‘**विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार**’, (२) उत्कृष्ट प्रकाशन संस्थेस ‘**श्री. पु. भागवत पुरस्कार**’, मराठी भाषा संवर्धनासाठी मोलाचे योगदान देणाऱ्या व्यक्तीस अथवा संस्थेस (३)आंतरराष्ट्रीय किर्तीचे ज्येष्ठ भाषा वैज्ञानिक आणि साहित्य समीक्षक डॉ.अशोक केळकर यांच्या नावे ‘**मराठी भाषा अभ्यासक पुरस्कार**’ २ पुरस्कार(व्यक्ती व संस्था) व (४) कवितेच्या माध्यमातून भाषा संवर्धनाचे कार्य करणाऱ्या कवीवर्य मंगेश पाडगांवकर यांच्या नावे **‘मराठी भाषा संवर्धक पुरस्कार’** २ पुरस्कार (व्यक्ती व संस्था)असे पुरस्कार त्याचप्रमाणे, (५) उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मितीस ‘स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार’ (३५ पुरस्कार) या पुरस्कारांचे वितरण करण्यात येते.

❖ **वाचन प्रेरणा दिन (दिनांक १५ ऑक्टोबर) :-**

माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने दि. १५ ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिवस ‘वाचन प्रेरणा दिन’ म्हणून साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या निर्णयास अनुसरुन शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची प्रेरणा निर्माण करण्यासाठी व वाचनाची आवड वृद्धिंगत करण्यासाठी सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये, शासकीय संस्था/मंडळ, सार्वजनिक उपक्रम इ. कार्यालयांनी ‘वाचन प्रेरणा दिन’ साजरा करण्याबाबत दरवर्षी स्वतंत्रपणे शासन परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात येतात.

❖ **मराठी भाषेच्या प्रचार-प्रसारासाठी राज्यातील शाळा, महाविद्यालये, ग्रंथालये आणि अधिनस्त कार्यालये यांच्या सहकार्याने सुरु करण्यात आलेले विविध उपक्रम :-**

मराठी भाषेच्या प्रचार-प्रसाराच्या हेतूने मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. मभावा-२०२०/प्र.क.९८/भाषा-२, दि. २४ जून, २०२२ अन्वये सध्या सुरु असलेल्या उपरोक्त तीन उपक्रमांबरोबरच पुढील आठ उपक्रम राज्यातील शाळा, महाविद्यालये, ग्रंथालये, अधिनस्त कार्यालये यांच्या सहकार्याने सुरु करण्यात आले आहेत.

१. शैक्षणिक स्तरावर मराठी भाषेचा वापर वाढविणे.

२. ग्रंथालयांना पुस्तकांच्या स्वरुपात सहाय्य करणे.

३. तांत्रिकदृष्ट्या मराठी भाषा समृद्ध करण्यासाठी निधी .

४. साहित्यिकांचा सन्मान, ज्येष्ठ साहित्यिकांच्या जन्मशताब्दी वर्षाचे आयोजन आणि मराठी भाषेच्या प्रचार-प्रसारासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांचा शताब्दी सोहळा यासाठी निधी.

५. सीमावर्ती भागात मराठी भाषेसंदर्भात कार्यरत असणाऱ्या संस्थांना निधी .

६. शैक्षणिक अभ्यासक्रमाबाहेरील मराठी भाषेतील प्राविण्याबाबतच्या परीक्षा.

७. माहिती व जनसंपर्क संचालनालयाच्या मदतीने मराठी प्रचार-प्रसारासंबंधी जाहिराती तयार करणे.

८. मराठी भाषेच्या प्रचार व प्रसारासाठी उपक्रम मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या स्तरावर राबविणे.

सदर उपक्रम विभागीय आणि जिल्हा स्तरावर राबविण्यासाठी ६ विभागीय आयुक्त आणि ३६ जिल्हाधिकारी यांना निधी देण्याचा निर्णय शासन निर्णय दि. २४ जून, २०२२ अन्वये घेण्यात आला आहे.

❖ **शासन व्यवहारात देवनागरी लिपी व वर्णमालेनुसार मराठी हस्तलेखन, टंकलेखन, मुद्रण, संगणक इत्यादींसाठी स्वीकारलेली देवनागरी लिपी व वर्णमाला अद्ययावत करणेबाबत :-**

शासन व्यवहारात देवनागरी लिपी व वर्णमालेनुसार मराठी हस्तलेखन, टंकलेखन, मुद्रण, संगणक इत्यादींसाठी स्वीकारलेली देवनागरी लिपी व वर्णमाला अद्ययावत करणेबाबतच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ६ नोव्हेंबर, २००९ चा मूळ शासन निर्णय अधिक्रमित करुन, सदर शासन निर्णयातील मूलभूत बाबींमध्ये बदल न करता, केवळ काही अनुषंगिक बाबींचा समावेश शासन निर्णय दि. १० नोव्हेंबर, २०२२ अन्वये करण्यात आला.

❖ **पुस्तकांचे गाव या योजनेचा विस्तार करणेबाबत :-**

पुस्तकांचे गाव या योजनेचा विस्तार करणेबाबत मराठी भाषेचा विकास, प्रचार, प्रसार व वाचन संस्कृतीची जोपासना व्हावी, या दृष्टीने पुस्तकाचे गाव विस्तार ही योजना प्रत्येक जिल्ह्यात सुरु करण्याचा निर्णय दि.०४.०१.२०२२ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने प्रथमतः ६ महसुली विभागात पुस्तकांचे गाव सुरु करण्यात येणार आहे. त्यानुसार दि.२५.०३.२०२२ च्या शासन निर्णयान्वये ४ गावांना मान्यता देण्यात आली आहे.

❖ **बृहन्महाराष्ट्र मंडळामार्फत साहित्य संमेलन आयोजित करण्यासाठी अनुदान :-**

मराठी भाषेचा प्रचार व प्रसार हे मराठी भाषा विभागाचे मुख्य धोरण आहे. सदर धोरणाशी सुसंगत पारंपारिक पध्दतीने प्रचार-प्रसार करण्याबरोबर, त्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन विविध माध्यमांचा वापर करुन मराठी प्रचार प्रसारविषयक कार्यक्रम महाराष्ट्र राज्याबाहेर आयोजित करण्यास रु.२५.०० लक्ष इतके अनुदान देण्याचा दि.२३.०२.२०२३ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

❖ **युवक मंडळे स्थापन करणे व अनुदान देण्याबाबत :-**

मराठी भाषेचा प्रचार-प्रसार करण्यासाठी महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर परंतु, देशांतर्गत मराठी भाषा युवक मंडळे स्थापन करणे व त्यांना कार्यक्रम/उपक्रम करण्याच्या अटीवर वार्षिक रु.१०,०००/- (दहा हजार रुपये) इतके अनुदान देण्यास व सदरचा उपक्रम राज्य मराठी विकास संस्थेमार्फत राबविण्याचा निर्णय दि.१३.०७.२०२३ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

❖ **महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली, गोवा येथे मराठी भाषिकांसाठी विविध भाषिक उपक्रम सूरु करणे हा नवीन उपक्रम राज्य मराठी विकास संस्थेमार्फत सुरु करण्याबाबत :-**

अन्य राज्यात असलेल्या मराठी भाषकांसाठी विविध भाषिक उपक्रम करण्याची तरतूद राज्य मराठी विकास संस्थेच्या घटनेत आहे. सदर तरतूदीच्या अनुषंगाने महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली व गोवा यांना मराठीच्या प्रचार-प्रसारासाठी कार्यक्रम आयोजित करण्याच्या अटीच्या अधीन राहून, प्रत्येकी रु.१०.०० लक्ष इतका निधी राज्य मराठी विकास संस्थेच्या निधीतून देण्याच्या उपक्रमास दि.१३.०७.२०२३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता घेण्यात आली आहे.

❖ **जेष्ठ साहित्यिकास विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार :-**

शासन निर्णय दि.३१.०८.२०१२ नुसार मराठी साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या साहित्यिकास ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त साहित्यिक कै. विंदा करंकदीकर यांच्या नावे जीवन गौरव पुरस्कार महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने सन २०१२-१३ पासून प्रदान करण्यात येत आहे. या पुरस्काराचे स्वरुप रु.१०,००,०००/- (अक्षरी रुपये दहा लक्ष फक्त) रोख, मानचिन्ह व मानपत्र असे दि.१८.०२.२०२६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. **सन २०२५ या वर्षाचा** विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक **'श्री. श्रीनिवास विनायक कुलकर्णी'** यांना देण्यात आला आहे.

❖ **श्री. पु. भागवत पुरस्कार :-**

शासन निर्णय दि.३१.०८.२०१२ नुसार महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून साहित्य निर्मिती क्षेत्रात लक्षणीय व उत्कृष्ट कार्य करणाऱ्या प्रकाशन संस्थेस मराठी प्रकाशन व्यवसायात मोलाचे कार्य करणारे श्री. पु. भागवत यांच्या नावे दरवर्षी पुरस्कार देण्यात येतो. या पुरस्काराचे स्वरुप रु.५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लक्ष फक्त) रोख, मानचिन्ह व मानपत्र असे दि.१८.०२.२०२६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. **सन २०२५ या वर्षाचा** श्री. पु. भागवत पुरस्कार **'निर्मल प्रकाशन, नांदेड'** या संस्थेस देण्यात आला आहे.

❖ **अन्य साहित्य संमेलन या योजनेचे नाव जिल्हा साहित्य संमेलन करुन, जिल्हा साहित्य संमेलनाच्या अनुदानात वाढ करण्याबाबत :-**

अन्य साहित्य संमेलन या योजनेचे नाव जिल्हा साहित्य संमेलन करुन जिल्हा साहित्य संमेलनांसाठी ३६ जिल्ह्यात ३६ साहित्य संस्थाकरिता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षापासून प्रत्येकी रु.५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लक्ष फक्त) च्या मर्यादेत अनुदान देण्याबाबत दि.०३.१०.२०२४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेसाठी रु.१८०.०० लाख इतके वार्षिक आवर्ती अनुदान मंजूर करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**<u>विभागाची संरचना</u>**

मंत्री

↓

सचिव

↓

सह सचिव

↓

- अवर सचिव
  - कक्ष अधिकारी (आस्था-१)
  - कक्ष अधिकारी (भाषा-२)
  - कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प)
- अवर सचिव
  - कक्ष अधिकारी (नोंदणी शाखा)
  - कक्ष अधिकारी (रोख शाखा)
  - कक्ष अधिकारी (भाषा-३)
- अवर सचिव
  - कक्ष अधिकारी (आस्था-२)
  - कक्ष अधिकारी (भाषा-१)

## मराठी भाषा विभाग

## कर्मचारी विषयक गोषवारा

## Personnel Summary

| अ.क्र. | वर्ग | पदसंख्या |
|---|---|---|
| १. | अ | ५ |
| २. | ब (राजपत्रित) | ८ |
| ३. | ब (अराजपत्रित) | १३ |
| ४. | क | १२ |
| ५. | ड | ८ |
| **एकूण** | | **४६** |

# मराठी भाषा विभाग
## पदांचे वर्गीकरण

| अ क्र.<br>(१) | पदनाम<br>(२) | वेतनश्रेणी SCALE OF PAY<br>(३) | पदांची संख्या<br>(४) | DESIGNATION<br>(५) |
|---|---|---|---|---|
| | | **(अ) राजपत्रित गट-अ (Gazetted Class-A)** | | |
| १. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव | संवर्ग पद (भा.प्र.से) | १ | Additional Chief Secretary / Principal Secretary / Secretary |
| २. | सह सचिव / उप सचिव | एस-२५ : ७८८००-२०९२०० | १ | Joint Secretary / Deputy Secretary |
| ३. | अवर सचिव | एस-२३ : ६७७००-२०८७०० | ३ | Under Secretary |
| | | **एकूण (अ)** | **५** | **Total (A)** |
| | | **(ब) राजपत्रित गट-ब (Gazetted Class-B)** | | |
| ४. | कक्ष अधिकारी | एस-१७ : ४७६००-१५११०० | ८ | Section Officer |
| | | **एकूण (ब)** | **८** | **Total (B)** |
| | | **(क) अराजपत्रित गट-ब (Non-Gazetted Class-B)** | | |
| ५. | सहायक कक्ष अधिकारी | एस-१६ : ४४९००-१४२४०० | ९ | Assistant Section Officer |
| ६. | लघुलेखक (उच्चश्रेणी) | एस-१५ : ४१८००-१३२३०० | २ | Stenographer (H.G.) |
| ७. | लघुलेखक (निम्नश्रेणी) | एस-१४ : ३८६००-१२२८०० | २ | Stenographer (L.G.) |
| | | **एकूण (क)** | **१३** | **Total (C)** |
| | | **(ड) अराजपत्रित गट-क (Non-Gazetted Class-C)** | | |
| ८. | लिपिक-टंकलेखक | एस-६ : १९९००-६३२०० | १० | Clerk-cum-Typist |
| ९. | वाहनचालक | एस-६ : १९९००-६३२०० | २ | Driver |
| | | **एकूण (ड)** | **१२** | **Total (D)** |
| | | **(इ) अराजपत्रित गट-ड (Non-Gazetted Class-D)** | | |
| १०. | शिपाई | एस-१ : १५०००-४७६०० | ८ | Peon |
| | | **एकूण (इ)** | **८** | **Total (E)** |
| | | **एकूण (अ+ब+क+ड+इ)** | ४६ | **Total (A+B+C+D+E)** |

**मराठी भाषा विभागाची माहिती https://marathi.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

## कार्यक्रम क्रमांक-३

## भाषा संचालनालय

दि.१ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर सामान्य प्रशाससन विभाग, शासन निर्णय दि.६.जुलै, १९६० अन्वये भाषा संचालनालयाची निर्मिती करण्यात आली आहे. शासनाला प्रशासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर करण्यासाठी सहाय्य आणि सल्ला देण्यासाठी भाषा सल्लागार मंडळ (सध्याची भाषा सल्लागार समिती) घटित करण्यात आले. समितीने विविध विषयांतील शब्दांबाबत मराठीतील परिभाषेसंदर्भात (Terminology) दिलेल्या सल्ल्यानुसार त्यांचे परिभाषा कोश (Glossary) तयार करणे, विविध प्रशासकीय संज्ञा/पदनामे ठरविणे, त्याचप्रमाणे प्रशासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर करण्यासाठी मार्गदर्शक पुस्तकांची निर्मिती करणे इत्यादी कामे भाषा संचालनालयामार्फत करण्यात येत असून, शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा वापर करण्याच्या धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने भाषा संचालनालयाद्वारे पुढील कामे व जबाबदाऱ्या पार पाडल्या जातात-

**१) राज्य कायदे व नियमांचे मराठीकरण :-**

सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना, क्रमांक.ओएलएफ-१०९५/७३७/प्र.क्र.३६/९५/२०ब, दिनांक १४ ऑगस्ट, १९९५ अन्वये महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ चे कलम ५ अंमलात आले असून, त्यानुसार १५ ऑगस्ट, १९९५ पासून राज्य विधानमंडळात सादर केली जाणारी सर्व विधेयके, राज्य विधानमंडळाने संमत करावयाचे सर्व अधिनियम, माननीय राज्यपालांनी प्रख्यापित केलेले सर्व अध्यादेश तसेच, त्याखाली अधिसूचना, आदेश, नियम, विनियम, परिनियम व उपविधी मूळ स्वरुपात मराठीत करणे बंधनकारक केले असून, त्यांच्या मराठीतील मसुद्यांस मूळ मसुदा म्हणून समजले जाते.

कायदे व नियमांचे मसुदे मूलत: मराठीत तयार करण्याची यंत्रणा उपलब्ध नसल्याने, महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६५ याच्या कलम ५ची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने, भाषा संचालनालयाद्वारे खालील विधिविधानांचा व दुय्यम विधिविधानांचा मराठी अनुवाद व अनुवाद तपासणी केली जाते आणि तद्नुषंगिक कामे व जबाबदाऱ्या पार पाडल्या जातात-

(अ) राज्य विधानमंडळात सादर केली जाणारी सर्व विधेयके.

(ब) राज्य विधानमंडळाने संमत केलेले अधिनियम.

(क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ अन्वये माननीय राज्यपालांनी प्रख्यापित केलेले सर्व अध्यादेश.

(ड) केंद्रीय व राज्य अधिनियमांखालील सर्व अधिसूचना, आदेश, नियम, विनियम, परिनियम, उपविधी.

**अ) राज्य अधिनियमांचे मराठीकरण :-**

सन २०२४-२५ या वर्षांमध्ये एकूण ४३ विधेयके, २० अध्यादेश, ४ विधानमंडळ ठराव, मा. राज्यपाल यांचे अभिभाषण इत्यादी वैधानिक प्रकरणांचे मराठीकरण केले असून, मराठी अनुवाद केलेली काही ठळक प्रकरणे पुढीलप्रमाणे आहेत-

**१) विधानसभा / विधानपरिषद विधेयके :-**

अ) महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांनी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत विधेयक, २०२४.

आ) महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गांस प्रतिबंध) विधेयक, २०२४.

इ) महाराष्ट्र खाजगी पदयोजन एजन्सी (विनियमन), विधेयक, २०२५.

ई) महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०२५.

फ) महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) (सुधारणा) विधेयक, २०२५.

**२) महाराष्ट्र अध्यादेश :**

अ) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती.....निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे अध्यादेश, २०२४.

आ) महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) अध्यादेश, २०२४.

इ) श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) (सुधारणा) अध्यादेश, २०२४.

ई) महाराष्ट्र ग्रामपंचायत, जिल्हा परिषदांच्या...वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे अध्यादेश, २०२५.

उ) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नागरी (सुधारणा) अध्यादेश, २०२५.

सन २०२५-२६ या वर्षामध्ये विधीमंडळाची जेवढी अधिवेशने पार पडतील, त्यानुसार वेळोवेळी येणारे अध्यादेश, विधेयके, विधानमंडळ ठराव अशा वैधानिक प्रकरणांचा तातडीने अनुवाद करुन देणे अपेक्षित आहे. सदर कार्यासनात कोणत्याही प्रकारे प्रलंबित कामे न ठेवता तातडीने अनुवादाची कामे करुन दिली जातात. त्यामुळे सन २०२५-२०२६ या वर्षामध्ये संबंधित शाखेची संपूर्ण कामे करुन देण्याचे प्रस्तावित आहेत.

**ब) नियमांचे मराठीकरण :-**

सन २०२४-२५ या वर्षामध्ये २८ सेवाप्रवेश नियम, १८ नियम / परिनियम / विनियम, १२१ अधिसूचना, १३ आदेश, इत्यादी दुय्यम विधिविधान विषयक प्रकरणांचे मराठीकरण केले असून, मराठी अनुवाद केलेली काही ठळक प्रकरणे पुढीलप्रमाणे आहेत-

अ) नगररचना व मूल्य निर्धारण संचालनालयाच्या आस्थापनेवरील तांत्रिक संवर्ग गट अ व गट ब सेवा प्रवेश नियम.

आ) शुल्क नियामक प्राधिकरण कार्यालयाचे लेखापरिक्षण करण्याबाबत आदेश.

इ) अनुसूचित जमातीच्या व्यक्तींना कोर्ट फी मधून संपूर्ण सवलत.

ई) गोसेवा आयोग अधिनियम, २०२३ चे नियम.

उ) महाराष्ट्र चित्रपटगृहे विनियमन नियम, १९६६ सुधारणा.

ऊ) भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ अन्वये अधिसूचना.

ऋ) खाजगी विद्यापीठे स्थापन करण्यासाठी विनियम.

ऌ) मुद्रांक शुल्क माफी आदेश.

ऍ) महाराष्ट्र कारागृह संचित व अभिवचन रजा नियम, २०२४.

ऐ) भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील कलम २६५, २६६ आणि ३०८ अधिसूचना प्रारुप.

सन २०२५-२६ या वर्षामध्ये नियम, परिनियम, अधिसूचना, आदेश अशा दुय्यम विधिविधान विषयक वैधानिक प्रकरणांचा तातडीने अनुवाद करुन देणे अपेक्षित आहे. सदर कार्यासनात कोणत्याही प्रकारे प्रलंबित कामे न ठेवता तातडीने अनुवादाची कामे करुन दिली जातात. त्यामुळे सन २०२५-२०२६ या वर्षामध्ये संबंधित शाखेची संपूर्ण कामे करून देण्याचा प्रयत्न असेल.

**(२) राज्य अधिनियमांचे अद्ययावतीकरण :-**

महाराष्ट्र राज्य विधानमंडळाने, सुधारणा अधिनियमांन्वये केलेल्या तरतुदींचा समावेश करुन, मूळ राज्य अधिनियम अद्ययावत करण्याचे आणि ते पुनर्मुद्रित प्रतींमध्ये (रिप्रिंट) पुस्तक स्वरूपात प्रसिद्ध करण्याचे काम डिसेंबर, १९८३ पासून भाषा संचालनालयाद्वारे केले जात आहे. यामध्ये पुढील कामांचा समावेश होतो-

(अ) राज्य विधानमंडळाने सुधारणा अधिनियमांन्वये केलेल्या तरतुदींचा समावेश करुन, मूळ राज्य अधिनियमांचे अद्ययावतीकरण करणे.

(ब) अद्ययावत केलेले राज्य अधिनियम, पुनर्मुद्रित प्रतींच्या (रिप्रिंट) स्वरुपात प्रसिद्ध करणे.

(क) अद्ययावत करुन पुस्तक स्वरुपात प्रसिद्ध केलेले राज्य अधिनियम, भाषा संचालनालयाच्या संकेतस्थळावर टाकणे. (अपलोड करणे).

(ड) राज्य अधिनियमांचे एकत्रीकरण करुन, ते महाराष्ट्र अधिनियम संहिता या स्वरुपात प्रसिद्ध करणे.

महाराष्ट्र राज्य विधानमंडळाकडून नवीन राज्य अधिनियमांच्या निर्मितीबरोबरच मूळ राज्य अधिनियमांमध्ये सुधारणा करण्याचे काम निरंतर केले जात असल्याने, राज्य अधिनियमांचे अद्ययावतीकरण करुन, ते पुस्तक स्वरुपात प्रसिद्ध करण्याची प्रक्रिया देखील सतत चालू आहे. आजपर्यंत एकूण २७५ राज्य अधिनियमांचे अद्ययावतीकरण करुन, ते पुस्तक स्वरुपात प्रसिद्ध केले आहे आणि अद्ययावतीकरण केलेले एकूण २५३ राज्य अधिनियम संकेतस्थळावर टाकलेले आहेत. अद्ययावतीकरण करण्यात येत असलेल्या राज्य अधिनियमांची सन २०२५-२६ या वर्षातील स्थिती खालीलप्रमाणे आहे-

अ) अद्ययावतीकरण करुन अंतिम छपाईसाठी शासकीय मुद्रणालयाकडे पाठविले राज्य अधिनियम - ०३.

ब) अद्ययावतीकरणाच्या विविध टप्प्यांवर असलेले राज्य अधिनियम - १२१.

सद्य:स्थितीत सदर कार्यासनातील उपलब्ध मनुष्यबळासह अन्य कार्यासनातील कर्मचाऱ्यांची मदत घेतली जात आहे. त्यामुळे सन २०२६-२७ या वर्षात राज्य अधिनियमांचे अद्ययावतीकरण करुन, अंतिम छपाईसाठी शासकीय मुद्रणालयाकडे ६० राज्य अधिनियम पाठविणे प्रस्तावित आहेत. त्याचप्रमाणे अद्ययावतीकरणाच्या विविध टप्प्यांवर असलेले १२१ राज्य अधिनियमांपैकी सुमारे ६० अधिनियम पुस्तक स्वरुपात प्रकाशित करणेकामी अंतिम छपाईसाठी पाठविणे नियोजित आहे.

**(३) सुवास (SUVAS) प्रणाली** :-

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, महत्वाच्या न्यायनिर्णयांचे मराठीत भाषांतर जनतेसाठी उपलब्ध करुन देण्याकरिता मा. सर्वोच्च न्यायालयाने ‘सुवास’ प्रणाली निर्माण केली आहे. त्यासाठी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निदेशानुसार मराठी भाषेत अनुवादित किंवा मूलत: तयार झालेले अधिनियम, नियम, उपनियम, परिनियम यांच्या मराठीत मुक्त स्त्रोत संगणकीय प्रती मा. उच्च न्यायालयाला देण्याचे काम या कार्यासनाकडे आहे. तथापि, या कार्यासनातील माहे ऑक्टोबर, २०२५ पर्यंत पुरेसे कर्मचारी कार्यरत नसल्याने, अन्य शाखांच्या कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने अशा प्रत्यक्ष प्रतींची छाननी करण्यात आली. सुमारे ३०,००० पृष्ठे एवढा दस्तऐवज भाषा संचालनालयाकडे उपलब्ध आहे. ज्याचे मुक्त स्त्रोत संगणकीय प्रणालीत रुपांतर करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन, या कार्यासनामार्फत बाह्य स्त्रोत यंत्रणेद्वारे सदर काम पूर्ण करुन घेण्यासाठीचा प्रस्ताव शासनास पाठविण्यात आला होता. त्यास शासनाची मान्यता मान्यता मिळाली आहे. सद्य:स्थितीत त्यानुसार यंत्रणा उभारणी करण्यासाठी शासनमान्य महाआयटी या संस्थेमार्फत कंत्राटी स्वरुपात १० ‘माहिती तंत्रज्ञान सहायक’ यांची भरती करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

येत्या आर्थिक वर्षात उपरोक्त प्रक्रिया पूर्ण होताच, बाह्य स्त्रोत यंत्रणेद्वारे उक्त ३०,००० पृष्ठांचे कायद्याच्या स्वरुपात टंकलेखन करुन, त्याच्या मुक्त स्त्रोत संगणकीय प्रती मा. उच्च न्यायालय यांच्याकडे देण्याचे प्रस्तावित आहे.

**(४) केंद्रीय अधिनियम व भारताचे संविधान यांचे मराठीकरण :-**

**(अ) केंद्रीय अधिनियमांचे मराठीकरण** :- यामध्ये पुढील कार्यप्रक्रियेचा समावेश होतो -

**(१)** भारत सरकारच्या विधि व न्याय मंत्रालयाच्या राजभाषा खंडाकडून प्राथम्य सूच्यांद्वारे नेमून दिलेल्या केंद्रीय अधिनियमांचा मराठी अनुवाद व अनुवाद तपासणी करणे.

**(२)** मराठी अनुवाद केलेले केंद्रीय अधिनियम, विधिक्षेकरिता (vetting) दिल्ली येथील राजभाषा खंडाकडे पाठविणे.

**(३)** मराठी अनुवाद केलेल्या केंद्रीय अधिनियमांवर राजभाषा खंडाच्या कार्यकारी गटाच्या बैठकीत चर्चा करणे व मान्यता घेणे.

**(४)**कार्यकारी गटाच्या बैठकीत सुचविलेल्या दुरुस्त्या व मान्य केलेले अर्थ पर्याय अंतर्भूत करुन, केंद्रीय अधिनियम अॅझ्युअरलेड प्रतीच्या स्वरुपात मुद्रित करण्यासाठी शासकीय मुद्रणालयाकडे पाठविणे.

**(५)** अॅझ्युअरलेड प्रतीच्या स्वरुपात मुद्रित केलेले केंद्रीय अधिनियम, राजभाषा खंडामार्फत माननीय राष्ट्रपती महोदयांकडे अनुमतीसाठी पाठविणे.

**(६)** माननीय राष्ट्रपती महोदयांची मान्यता मिळालेले केंद्रीय अधिनियम, शासकीय मुद्रणालयामार्फत ‘भारताचे राजपत्र’ यामध्ये प्रसिद्ध करणे.

**(७)** राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या केंद्रीय अधिनियमांची, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ अन्वये प्राधिकृत पाठाच्या स्वरुपात छपाई करुन, जनतेकरिता विक्रीसाठी शासकीय मुद्रणालयाच्या ग्रंथागारांमध्ये पुस्तक स्वरूपात उपलब्ध करुन देणे तसेच, भाषा संचालनालयाच्या व राजभाषा खंडाच्या संकेतस्थळांवर टाकणे.

ही प्रक्रिया सतत चालू असून आजमितीस, मराठी अनुवाद केलेल्या एकूण ३९५ केंद्रिय अधिनियमांना, राजभाषा खंडाच्या कार्यकारी गटाने मान्यता दिलेली आहे आणि एकूण २०७ केंद्रिय अधिनियम प्राधिकृत पाठाच्या स्वरुपात प्रसिद्ध केलेले आहेत. तसेच, ४ अधिनियम प्राधिकृत पाठाच्या स्वरुपात प्रसिद्ध करण्यासाठी शासकीय मुद्रणालयाकडे पाठविण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे, ३९ केंद्रीय अधिनियम प्राधिकृत अनुवादाच्या स्वरुपात प्रसिद्ध केलेले आहेत. उर्वरित अधिनियम कार्यवाहीच्या विविध टप्प्यांवर आहेत.

**(ब) भारताच्या संविधानाचे मराठीकरण** :- यामध्ये पुढील कार्यप्रक्रियेचा समावेश होतो-

१) संसदेने वेळोवेळी केलेल्या संविधान सुधारणा अधिनियमांमधील तरतुदींचा मराठी अनुवाद व अनुवाद तपासणी करुन, भारताचे संविधान अद्ययावत करणे.

२) अद्ययावत केलेले भारताचे संविधान मुद्रितांसाठी शासकीय मुद्रणालयाकडे पाठवणे.

३) मुद्रित वाचन करुन, भारताच्या संविधानाची मुद्रित प्रत, मान्यतेसाठी राजभाषा खंडाकडे पाठविणे.

४) राजभाषा खंडाने सुचवलेल्या दुरुस्त्या अंतर्भूत केलेली भारताच्या संविधानाची मुद्रित प्रत, अंतिम छपाईसाठी शासकीय मुद्रणालयाकडे पाठवणे.

५) भारताच्या संविधानाच्या छापील प्रती, जनतेकरीता शासकीय मुद्रणालयाच्या ग्रंथागारांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध करुन देणे तसेच, भाषा संचालनालयाच्या व राजभाषा खंडाच्या संकेतस्थळावर टाकणे.

**५) संकीर्ण बाबी :-**

**१) भारतीय संविधानाच्या इंग्रजी व मराठी या स्वरुपातील द्विभाषी आठवी आवृत्तीचे लोकार्पण :-**

भारतीय संसदेने पारित केलेल्या ९९ ते १०६ व्या संविधान सुधारणा अधिनियमांतील तरतुदींचा समावेश करुन, भारतीय संविधानाची इंग्रजी व मराठी या स्वरुपातील द्विभाषी आठवी आवृत्ती भारत सरकारच्या विधि व न्याय मंत्रालयातील राजभाषा खंडाच्या मान्यतेने व खर्चाने छपाई केली व दिनांक १ मे, २०२५ रोजी त्याचे लोकार्पण करण्यात आले.

**२) तीन प्रमुख फौजदारी कायदे प्रसिद्ध करणे:-**

भारतीय संसदेने पारित केलेले पुढील तीन प्रमुख कायदे, मराठी भाषेमध्ये अनुवादित करुन, भारत सरकारच्या विधी व न्याय मंत्रालयातील राजभाषा खंडाच्या कार्यकारी गटाच्या मान्यतेने व मा. राष्ट्रपतींच्या अनुमतीने भारताच्या राजपत्रामध्ये व प्राधिकृत पाठामध्ये प्रसिद्ध करण्याचे योजिलेले आहे.

१. भारतीय न्याय संहिता, २०२३.

२. भारतीय साक्ष अधिनियम, २०२३.

३. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३.

यांपैकी भारतीय साक्ष अधिनियम, २०२३ याला राजपत्रात प्रसिद्धी मिळाली असून, भारतीय न्याय संहिता, २०२३ याच्या मराठीतील अनुवादाला मा. राष्ट्रपती यांची मान्यता मिळण्यासाठी सदर अनुवादाची प्रत नवी दिल्ली येथे पाठविली आहे.

पुढील आर्थिक वर्ष सन २०२६-२७ मध्ये उक्त तीनही फौजदारी अधिनियम यांना प्राधिकृत पाठाच्या स्वरुपात प्रसिद्धी देण्यास प्राधान्य दिले जाईल. त्याचप्रमाणे, प्रत्येक चार महिन्यात एक अशा कार्यकारी गटाच्या नवी दिल्ली येथे किमान तीन बैठका व प्रत्येक बैठकीत किमान ४ अधिनियम अशा प्रकारे १२ केंद्रीय अधिनियमांना मान्यता मिळवण्याचा प्रयत्न आहे.

**(३) नियमपुस्तिका आणि प्रमाण नमुने व प्रपत्रे यांचे मराठीकरण : -**

शासन व्यवहारात मराठीचा वापर करण्याच्या दृष्टीने, मंत्रालयीन विभाग व शासकीय कार्यालयांद्वारे वापरल्या जाणाऱ्या नियमपुस्तिका (Manuals) प्रमाण नमुने आणि प्रपत्रे यांचा मराठीत अनुवाद करुन देण्याचे काम भाषा संचालनालयाद्वारे केले जाते.

**(४) प्रशासकीय व संकीर्ण प्रकरणांचे मराठीकरण :-**

**अ)** महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६५ अन्वये शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा १०० टक्के वापर करण्याच्या धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने, सर्व मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय व संकीर्ण प्रकरणांसह पुढील प्रकरणांचा मराठीत अनुवाद करण्याचे व अनुवाद तपासणीचे काम भाषा संचालनालयाद्वारे केले जाते.

**आ)** केंद्र सरकारच्या व राज्य शासनाच्या विविध योजना व कार्यक्रम.

**इ)** केंद्र सरकारची व राज्य शासनाची धोरणे व मार्गदर्शक तत्त्वे.

**ई)** मंत्रालयीन विभागांची अन्य प्रशासकीय व संकीर्ण प्रकरणे.

**उ)** विविध चौकशी समित्यांच्या व अभ्यास समित्यांचे अहवाल व कृती अहवाल.

**ऊ)** भारतीय निवडणूक आयोगाचे निदेश, आदेश, नियम, आचार संहिता व नियम पुस्तिका.

सन  २०२३-२४ या वर्षात विविध मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय व संकीर्ण प्रकरणांचा मराठी अनुवाद व अनुवाद तपासणी करुन दिलेली आहे. अलिकडील काळामध्ये मराठी अनुवाद करुन दिलेली काही ठळक प्रशासकीय प्रकरणे पुढीलप्रमाणे आहेत :-

अ) आगामी सार्वत्रिक निवडणुकांसाठी निवडणुक आयोगाकडून प्राप्त पुस्तके, निदेश, मार्गदर्शनपर सुचना, BLO ई-पत्रिका इ. चा अनुवाद व तपासणी (इंग्रजी पृष्ठे सुमारे २०,०००)

आ) पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग, महाराष्ट्र शासन यांची उद्दिष्टे व ध्येयधोरणे तसेच, पंतप्रधान कृषि योजना यांचा व इतर प्रकरणांचा अनुवाद व तपासणी.

इ) दि.२१ जून, २०२४ हा दिवस १० वा जागतिक योग दिन साजरा करण्याबाबत मा. पंतप्रधान महोदय यांच्या संदेशपत्राचा अनुवाद.

ई) 'राजभवन मुंबई येथील अधिकारी व कर्मचारी वर्ग यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या' या पुस्तकाचे मराठीत भाषांतर.

उ) राज्याच्या प्रस्तावित गृहनिर्माण धोरणाचा अनुवाद.

ऊ) राज्य विदा धोरण, कृत्रिम बुद्धिमत्ता व १६ व्या वित्त आयोगाचा मसुदा तसेच, सार्वजनिक व खाजगी भागीदारी सहभाग धोरण याचा मराठी अनुवाद व तपासणी.

ऋ) महाराष्ट्र उद्योग, गुंतवणुक व सेवा धोरण, २०२५ व इतर महत्वाची धोरणे (७ धोरणे) यांचा मराठी अनुवाद व तपासणी

**(५) विविध अर्थसंकल्पीय प्रकाशनांचे मराठीकरण :-**

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०२ व २०५ अन्वये वित्त विभागामार्फत राज्य विधानमंडळाच्या तीनही अधिवेशनामध्ये सादर केल्या जाणाऱ्या पुढील अर्थसंकल्पीय प्रकाशनांचा मराठी अनुवाद, अनुवाद तपासणी, सुधारणा, मुद्रित वाचन, अशी अंतिम मुद्रणापर्यंतची कामे तसेच, खर्चाच्या विवरणपत्रात आवश्यक त्या सुधारणा करण्यासाठी शुद्धिपत्र तयार करण्याचे काम आणि मा. वित्त मंत्र्यांच्या भाषणावर व्याकरणिक व भाषिक संस्कार करण्याची कामे भाषा संचालनालयाद्वारे केली जातात :-

(१) खर्चाचे पूरक विवरणपत्रे.

(२) अर्थसंकल्पविषयक निवेदन.

(३) अर्थसंकल्पीय अंदाज.

(४) अधिक खर्चाचे विवरणपत्र.

(५) नवीन बाबींचे विवरणपत्र.

सन २०२५-२६ या वर्षात पुढील अर्थसंकल्पीय प्रकाशनांचा मराठी अनुवाद व अनुवाद तपासणी करण्याचे आणि त्याच्या अंतिम मुद्रणापर्यंतची कामे पार पाडलेली आहे.

(१) खर्चाचे पूरक विवरणपत्र, २०२५-२०२६, (जुलै, २०२५ व डिसेंबर, २०२५), (मार्च, २०२६)

(२) नवीन बाबींचे विवरणपत्र, (मार्च, २०२६) अर्थसंकल्पविषयक निवेदन, २०२५-२०२६.

**(६) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या लेखापरीक्षा अहवालांचे मराठीकरण :-**

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १५१ अन्वये भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्यामार्फत मा. राज्यपालांना सादर केल्या जाणाऱ्या व दरवर्षी विधानमंडळात मांडल्या जाणाऱ्या पुढील अहवालांचा मराठी अनुवाद, अनुवाद तपासणी व मुद्रित वाचन, इत्यादी कामे भाषा संचालनालयाद्वारे केली जातात -

(१) वित्तीय लेखा.

(२) विनियोजन लेखा.

(३) लेख्यांवरील ओझरता दृष्टीक्षेप.

उपरोक्त अहवालांपैकी, पुढील अहवालांचे मराठीकरण करण्यात आले-

(१) वित्तीय लेखा, २०२४-२५ इ.पृ. ४३८.

(२) विनियोजन लेखा, २०२४-२५ इ.पृ. ७१६.

(३) लेख्यावरील ओझरता दृष्टीक्षेप, २०२४-२५ इ. पृ.५१.

**(७) परिभाषा व शब्दकोश निर्मिती कार्य :-**

(अ) शासन व्यवहारात व न्याय व्यवहारात आणि शालेय व विद्यापीठ स्तरावरील अभ्यासक्रमात मराठीचा वापर करण्यासाठी प्रशासकीय, तांत्रिक व शास्त्रीय विषयांचे परिभाषा कोश व शब्दकोश तयार करण्याचे व ते अद्ययावत करण्याचे काम भाषा संचालनालयाद्वारे केले जात आहे.

(ब) परिभाषा निर्मिती व कोश निर्मिती हे कार्य संशोधन व अकादमिक स्वरुपाचे आहे.

(क) विविध विषयतज्ज्ञांचा समावेश असलेल्या भाषा सल्लागार मंडळाच्या मार्गदर्शनाखाली हे कार्य पूर्वी करण्यात आले आहे. आता, भाषा सल्लागार समितीच्या मार्गदर्शनाखाली संबंधित विषयांच्या तज्ज्ञांची उप समिती घटित करुन, नवीन परिभाषा कोश निर्मितीचे व पूर्वीच्या कोशांमध्ये सुधारणा करुन, त्यांचे अद्ययावतीकरण करण्याचे काम सुरु आहे.

(ड) जनतेच्या मागणीनुसार, कोश/ परिभाषा कोश व लघुपुस्तिका यांचे स्कॅन करून/ मुद्रित स्वरुपात पुनर्मुद्रण करण्याचे कामदेखील नियमितपणे चालू आहे.

**(अ) भाषा संचालनालयाने तयार केलेले परिभाषा कोश, शब्दकोश व शासन व्यवहार उपयोगी मार्गदर्शक पुस्तिका :-**

भाषा संचालनालयाची एकूण ५२ प्रकाशने असून, त्यात पुढील प्रकाशनांचा समावेश आहे :-

**१) भारताचे संविधान :-** इंग्रजी-मराठी द्विभाषी आवृत्ती.

**२) शब्दकोश ४ :-** भाषा संचालनालयाने शासन व्यवहारास व न्याय व्यवहारास उपयुक्त असलेले पुढील कोश प्रसिद्ध केलेले आहेत-

| | | | |
|---|---|---|---|
| १) शासन व्यवहार कोश | २) प्रशासन वाक्प्रयोग | ३) पदनाम कोश | ४) न्यायव्यवहार कोश |

**३) शासन व्यवहार उपयोगी मार्गदर्शक पुस्तिका :-** भाषा संचालनालयाने शासन व्यवहारास उपयोगी असलेल्या पुढील मार्गदर्शक पुस्तिका व ग्रंथ प्रसिद्ध केलेले आहेत-

| | | | |
|---|---|---|---|
| १) प्रशासनिक लेखन | २) राजभाषा परिचय | ३) कार्यदर्शिका | ४) मराठी लघुलेखन मार्गदर्शिका |
| ५) शासन व्यवहारात मराठी | ६) मराठी टंकलेखन प्रवेशिका | ७) प्रमाणलेखन नियमावली | ८) मंथन |
| ९) मराठी लघुलेखन | १०) राजभाषा परिचय व कार्यरुप व्याकरण | ११) संक्षिप्त शेऱ्यांची लघुपुस्तिका | १२) शासन व्यवहार नित्योपयोगी लघुपुस्तिका |

**४) परिभाषा कोश-२९ :-**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | ग्रंथालयशास्त्र परिभाषा कोश | १६) | शरीरक्रियाशास्त्र परिभाषा कोश |
| २) | गणितशास्त्र परिभाषा कोश | १७) | राज्यशास्त्र परिभाषा कोश |
| ३) | समाजशास्त्र परिभाषा कोश | १८) | साहित्य समीक्षा परिभाषा कोश |
| ४) | तत्त्वज्ञान व तर्कशास्त्र परिभाषा कोश | १९) | लोकप्रशासन परिभाषा कोश |
| ५) | वाणिज्यशास्त्र परिभाषा कोश | २०) | अर्थशास्त्र परिभाषा कोश |
| ६) | रसायनशास्त्र परिभाषा कोश | २१) | धातुशास्त्र परिभाषा कोश |
| ७) | भूशास्त्र परिभाषा कोश | २२) | मानसशास्त्र परिभाषा कोश |
| ८) | शारीर परिभाषा कोश | २३) | व्यवसाय व्यवस्थापन परिभाषा कोश |
| ९) | शिक्षणशास्त्र परिभाषा कोश | २४) | संख्याशास्त्र परिभाषा कोश |
| १०) | यंत्र अभियांत्रिकी परिभाषा कोश | २५) | औषधशास्त्र परिभाषा कोश |
| ११) | स्थापत्य अभियांत्रिकी परिभाषा कोश | २६) | भूगोलशास्त्र परिभाषा कोश |
| १२) | भौतिकशास्त्र परिभाषा कोश | २७) | वृत्तपत्रविद्या परिभाषा कोश |
| १३) | विद्युत अभियांत्रिकी परिभाषा कोश | २८) | न्यायवैद्यक व विषशास्त्र परिभाषा कोश |
| १४) | कृषिशास्त्र परिभाषा कोश | २९) | भाषाविज्ञान व वाङ्मयविद्या परिभाषा कोश |
| १५) | जीवशास्त्र परिभाषा कोश | | |

**५) शब्दावल्या-६:-**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | वित्तीय शब्दावली | ४) | कृषिशास्त्र पारिभाषिक शब्दावली |
| २) | शासन व्यवहार शब्दावली | ५) | विकृतीशास्त्र पारिभाषिक शब्दावली |
| ३) | भौतिकशास्त्र पारिभाषिक शब्दावली | ६) | वाणिज्यशास्त्र पारिभाषिक शब्दावली |

**(ब) भाषा संचालनालयाची प्रकाशने संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्याबाबतची सद्य:स्थिती :-**

१. भाषा संचालनालयाचे परिभाषा कोश व अन्य प्रकाशने ई-पुस्तकाच्या स्वरूपात भाषा संचालनालयाच्या http://directorate.marathi.gov.in या संकेतस्थळाअंतर्गत असलेल्या https://shabdakosh.marathi.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. तसेच, भाषा संचालनालयाने शासन शब्दकोश भाग-१ हे भ्रमणध्वनी उपयोजक तयार केले असून, ते गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध आहे.

२. भाषा संचालनालयाने प्रसिद्ध केलेल्या परिभाषा कोशांची विद्याशाखेनुसार उपयोजके तयार करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

३. शासनाने मान्यता दिलेले १० नवीन परिभाषा कोश तयार करण्याचा व प्रकाशित करण्याचा मानस आहे.

४. लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालयाने कळविलेल्या परिभाषा कोशांच्या शिल्लक साठ्यानुसार परिभाषा कोशांचे पुनर्मुद्रण करण्याची आवश्यकता आहे.

**(८) राज्य कायद्यांचे हिंदीकरण :-**

केंद्र शासनाच्या त्रिभाषा सूत्रानुसार महाराष्ट्र राज्याच्या भाषिक धोरणातही त्रिभाषा सूत्राचा स्वीकार केला गेला असून, दिनांक ६ जुलै, १९६० मध्ये भाषा संचालनालयाची स्थापना झाल्यानंतर विधि विषयक अनुवादाच्या कामासाठी मराठी प्रमाणे हिंदी भाषेत अनुवाद करणारे कार्यासन निर्माण करण्यात आले आहे.

जनहिताच्या दृष्टीने आवश्यक कायदे करणे व प्रचलित कायद्यांमध्ये सुधारणा करणे हे राज्य विधान मंडळाचे काम असल्यामुळे विधि विभागाने तयार केलेल्या इंग्रजी प्रारुपांचा हिंदी भाषेमध्ये अनुवाद करण्यासाठी भारतीय संविधानाच्या भाग १७-राजभाषा, अनुच्छेद ३४२ ते ३५१ च्या तरतूदी अन्वये व महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ च्या कलम ४ ची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने विधि व न्याय विभागाने तयार केलेल्या इंग्रजी भाषेतील विधेयकांचा (इंग्रजी प्रारुप) हिंदी भाषेत अनुवाद करुन, विधि व न्याय विभाग यांनी विधानमंडळ सचिवालय यांना विधेयकाची नोटीस देण्यासाठी हिंदी मुद्रित प्रती देणे, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ अन्वये मा. राज्यपाल महोदयांद्वारे प्रख्यापित केलेले महाराष्ट्र अध्यादेश यांचा हिंदी भाषेत अनुवाद करुन, शासन निर्णयानुसार राजपत्रात प्रसिद्धीसाठी पाठवणे, त्याचप्रमाणे प्रत्येक वर्षी अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या सुरुवातीला तसेच, नवीन सरकार सत्तारुढ होताना पहिल्या अधिवेशनात सादर केल्या जाणाऱ्या मा.राज्यपाल महोदयांच्या इंग्रजी अभिभाषणाचा हिंदी भाषेत अनुवाद करुन संसदीय कार्य विभाग यांना अंतिम मुद्रिताकरिता देणे, राज्य विधानमंडळाच्या तीनही अधिवेशनात सादर केली जाणारी अर्थसंकल्पीय वित्त (धन) विधेयके उदा. महाराष्ट्र विनियोग, लेखानुदान, अनुपूरक, प्रथम, द्वितीय, तृतीय अधिक व्यय, इत्यादींचा हिंदी भाषेत अुनवाद, तपासणी, मुद्रित वाचन करुन, शासन निर्णयानुसार राजपत्रात प्रसिद्धीसाठी पाठवणे, विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात मंजूर झालेल्या विधेयकांचे अधिनियमात रुपांतर करुन, शासन निर्णयानुसार राजपत्रात प्रसिद्धीकरिता पाठविणे इत्यादी कामे या कार्यालयाकडून (हिंदी शाखा सात) केली जातात.

सन २०२५-२६ या वर्षामध्ये एकूण ४५ विधेयके, १२ अध्यादेश, २ विधानमंडळ ठराव, मा. उप मुख्यमंत्री, वित्त विभाग यांनी सोळाव्या वित्त आयोगानिमित्त लोकलेखा समिती समोर केलेल्या भाषणाचा हिंदी अनुवाद इत्यादी वैधानिक प्रकरणांचे हिंदीकरण केले असून, अनुवाद केलेली काही ठळक प्रकरणे पुढीलप्रमाणे-

**अ) विधानसभा / विधानपरिषद विधेयके :-**

१. महाराष्ट्र कर ब्याज शास्ती या विलंबित फीस (सार्वजनिक क्षेत्र उपक्रमित कंपनी) के बकायों का निपटान विधेयक, २०२५.

२. महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाति आयोग विधेयक, २०२५.

३. महाराष्ट्र प्रादेशिक और नगर योजना (संशोधन), विधेयक, २०२५.

४. महाराष्ट्र (अनुपूरक) विनियोग विधेयक, २०२५.

५. महाराष्ट्र स्टाम्प शुल्क (संशोधन) विधेयक, २०२५.

६. महाराष्ट्र जन सुरक्षा विधेयक, २०२५.

**आ) महाराष्ट्र अध्यादेश :-**

१. महाराष्ट्र भू राजस्व संहिता (संशोधन) अध्यादेश, २०२५.

२. महाराष्ट्र लोक न्यास (संशोधन) अध्यादेश, २०२५.

३. मुंबई नगर निगम, महाराष्ट्र नगर निगम, महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत तथा औद्योगिक नगरी संशोधन अध्यादेश, २०२५.

४. महाराष्ट्र कृषि उपज विपणन (विकास और विनियमन) (संशोधन) अध्यादेश, २०२५.

५. महाराष्ट्र स्टॅम्प शुल्क (संशोधन) अध्यादेश, २०२५.

६. महाराष्ट्र ग्रामपंचायत और महाराष्ट्र जिला परिषद तथा पंचायत सिमिती (संशोधन) अध्यादेश, २०२५.

सन २०२५-२६ या वर्षामध्ये विधिमंडळाची जेवढी अधिवेशन पार पडतील त्यानुसार वेळोवेळी येणारे अध्यादेश, विधेयके, विधानमंडळ ठराव अशा वैधानिक प्रकरणांचा तातडीने अनुवाद करुन देणे आवश्यक आहे. कार्यासन ७ मध्ये कोणत्याही प्रकारे प्रलंबित कामे न ठेवता, तातडीने अनुवादाची कामे करुन दिली जातात. त्यामुळे सन २०२६-२७ या वर्षामध्ये संबंधित शाखेची संपूर्ण कामे पूर्ण करुन देण्याचे प्रस्तावित आहे.

**(९) शासन व्यवहारात मराठीचा वापर (शासकीय कार्यालयांची तपासणी) :-**

अ) राजभाषा अधिनियम, १९६४ अन्वये शासन व्यवहारात मराठीचा वापर करणे अनिवार्य केलेले असल्याने, शासन व्यवहारात मराठीचा वापर केला जातो किंवा कसे, यादृष्टीने महाराष्ट्रातील मंत्रालयीन विभाग आणि शासकीय व निम-शासकीय कार्यालये यांची तपासणी करणे, त्यासंबंधातील अडचणी सोडविणे व मार्गदर्शन करणे आणि करावयाच्या उपाययोजनासंबंधी शासनाकडे अहवाल पाठविणे, इत्यादी कामे भाषा संचालनालयामार्फत केली जातात.

ब) मुख्यालय स्तरावर भाषा संचालक व विभागीय स्तरावर सहायक भाषा संचालक, नवी मुंबई, पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर यांच्या नेतृत्वाखालील तपासणी पथकांद्वारे शासकीय, निमशासकीय कार्यालये, महानगरपालिका, नगरपालिका, मंडळे व महामंडळे यांची तपासणी करण्यात येते.

क) आतापर्यंत राज्यातील सुमारे १०३४ शासकीय व निमशासकीय कार्यालयांची आणि ११ मंत्रालयीन विभागांची तपासणी केली आहे.

ख) सन २०२५-२६ मध्ये २५० कार्यालयांची तपासणी करण्याचे प्रस्तावित आहे.

**१०) भाषाविषयक परीक्षा :-**

भाषा संचालनालयामार्फत घेतल्या जाणाऱ्या पुढील परीक्षा घेण्याची संपूर्ण जबाबदारी भाषा संचालनालय पार पाडत आहे. या परीक्षा वर्षातून दोन वेळा घेतल्या जातात. सदर परीक्षा पुढीलप्रमाणे आहेत:

| अ.क्र. | परीक्षा | परीक्षेचा दिनांक | परीक्षेस बसलेले उमेदवार |
|---|---|---|---|
| १ | मराठी भाषा (राजपत्रित) परीक्षा. | जुलै, २०२५ | २७६ |
| | | जानेवारी, २०२६ | अंदाजित ३०० |
| २ | मराठी भाषा (अराजपत्रित) परीक्षा. | जुन, २०२५ | ३४१ |
| | | डिसेंबर, २०२५ | अंदाजित ३५० |
| ३ | हिंदी भाषा परीक्षा | जुन, २०२५ | २२४८ |
| | | डिसेंबर, २०२५ | अंदाजित २५०० |
| ४ | मराठी टंकलेखन परीक्षा. | एप्रिल, २०२५ | ५० |
| | | ऑक्टोबर, २०२५ | ७६ |
| ५ | मराठी लघुलेखन परीक्षा. | एप्रिल, २०२५ | ३५ |
| | | ऑक्टोबर, २०२५ | ३३ |

सन २०२४-२०२५ मध्ये माहे ऑक्टोबर, २०२५ पर्यंत मराठी भाषा, हिंदी भाषा, टंकलेखन व लघुलेखन परीक्षांसाठी अंदाजे एकूण २९५० उमेदवार बसले होते. सन २०२५-२६ मध्ये ३२६० उमेदवार बसण्याची शक्यता आहे.

## भाषा संचालनालय

### कर्मचारी विषयक गोषवारा (विभागीय कार्यालयांसह)

| अ.क्र. | वर्ग | पदसंख्या |
|---|---|---|
| १. | अ | ३ |
| २. | ब (राजपत्रित) | १० |
| ३. | ब (अराजपत्रित) | १९ |
| ४. | क | ७८ |
| ५. | ड | १७ |
| **एकूण** | | **१२७** |

# भाषा संचालनालय

## पदांचे वर्गीकरण(विभागीय कार्यालयांसह)

| अ क्र. (१) | पदनाम (२) | वेतनश्रेणी SCALE OF PAY (३) | पदांची संख्या (४) | DESIGNATION (५) |
|---|---|---|---|---|
| **(अ) राजपत्रित गट-अ (Gazetted Class-A)** | | | | |
| १. | भाषा संचालक | एस-२५ : ७८८००-२०९२०० | १ | Director of Languages |
| २. | भाषा उप संचालक (अनुवाद व शब्दावली) | एस-२० : ५६१००-१७७५०० | १ | Dy.Director of Languages (Translation & Terminology) |
| ३. | भाषा उप संचालक (विधि) | एस-२० : ५६१००-१७७५०० | १ | Dy.Director of Languages (Legal) |
| | | **एकूण (अ)** | **३** | **Total (A)** |
| **(ब) राजपत्रित गट-ब (Gazetted Class-B)** | | | | |
| ४. | सहायक भाषा संचालक (अनुवाद व शब्दावली) | एस-१५ : ४१८००-१३२३०० | ८ | Assistant Director of Languages (Translation & Terminology) |
| ५. | सहायक भाषा संचालक (प्रशिक्षण व आस्थापना) | एस-१५ : ४१८००-१३२३०० | १ | Assistant Director of Languages (Training & Establishment) |
| ६. | भाषा अधिकारी (हिंदी) | एस-१५ : ४१८००-१३२३०० | १ | Language Officer (Hindi) |
| | | **एकूण (ब)** | **१०** | **Total (B)** |
| **(क) अराजपत्रित गट-ब (Non-Gazetted Class-B)** | | | | |
| ७. | उच्चश्रेणी लघुलेखक | एस-१५ : ४१८००-१३२३०० | १ | Stenographer (H.G.) |
| ८. | अधीक्षक | एस-१४ : ३८६००-१२२८०० | ७ | Superintendent |
| ९. | पर्यवेक्षक (मराठी) | एस-१४ : ३८६००-१२२८०० | ९ | Supervisor (Marathi) |
| १०. | पर्यवेक्षक (हिंदी) | एस-१४ : ३८६००-१२२८०० | १ | Supervisor (Hindi) |
| ११. | निम्नश्रेणी लघुलेखक | एस-१४ : ३८६००-१२२८०० | १ | Stenographer (L.G.) |
| | | **एकूण (क)** | **१९** | **Total (C)** |
| **(ड) अराजपत्रित गट – क (Non-Gazetted Class-C)** | | | | |
| १२. | अनुवादक (मराठी) | एस-१३ : ३५४००-११२४०० | ४२ | Translator (Marathi) |
| १३. | अनुवादक (हिंदी) | एस-१३ : ३५४००-११२४०० | ४ | Translator (Hindi) |
| १४. | वरिष्ठ लिपिक | एस-८ : २५५००-८११०० | १० | Senior Clerk |
| १५. | लघुटंकलेखक (मराठी) | एस-८ : २५५००-८११०० | १ | Steno-Typist (Marathi) |
| १६. | कनिष्ठ ग्रंथपाल | एस-७ : २१७००-६९१०० | १ | Junior Librarian |
| १७. | लिपिक-टंकलेखक (मराठी/ इंग्रजी) | एस-६ : १९९००-६३२०० | १८ | Clerk-Typist (Marathi/English) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८. | वाहनचालक | एस-६ : १९९००-६३२०० | २ | Driver |
| | | **एकूण (ड)** | **७८** | **Total (D)** |
| | | **(इ) अराजपत्रित गट-ड (Non-Gazetted Class-D)** | | |
| १९. | नाईक | एस-३ : १६६००-५२४०० | २ | Naik |
| २०. | शिपाई | एस-१ : १५०००-४७६०० | १५ | Peon |
| | | **एकूण (इ)** | **१७** | **Total (E)** |
| | | **एकूण (अ+ब+क+ड+इ)** | **१२७** | **Total (A+B+C+D+E)** |

**भाषा संचालनालयाची माहिती https://directorate.marathi.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

## कार्यक्रम क्रमांक ४

## राज्य मराठी विकास संस्था

मराठी भाषा आणि महाराष्ट्राची संस्कृती यांचे संरक्षण, संगोपन आणि संवर्धन करण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने दिनांक १ मे, १९९२ रोजी 'राज्य मराठी विकास संस्थेची' स्थापना केली. 'संस्था नोंदणी अधिनियम, १८६०' आणि 'सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५०' याअन्वये दिनांक ०२ जानेवारी, १९९३ रोजी संस्थेची धर्मादाय आयुक्त, मुंबई यांच्याकडे स्वायत्त संस्था म्हणून नोंदणी झाली. सर्व कायदेशीर बाबी पूर्ण झाल्यानंतर दिनांक ०१ मार्च, १९९३ पासून संस्थेच्या कामकाजास प्रत्यक्ष सुरुवात झाली. तेव्हापासून आतापर्यंत संस्था मराठी भाषेच्या विकासासाठी विविध उपक्रम राबवत आहे.

**संस्थेची उद्दिष्टे :-**

विविध क्षेत्रात होणारा मराठीचा वापर अधिकाधिक गुणवत्तापूर्ण होत जावा, यासाठी प्रयत्नशील राहणे व मराठी भाषेच्या अभिवृद्धीची प्रक्रिया नियोजनपूर्वक गतिमान करणे, ही या संस्थेच्या स्थापनेमागील दोन मुख्य उद्दिष्टे आहेत. त्यानुसार, सर्व स्तरांवर मराठीचा विकास साधण्यासाठी संस्था स्वतंत्रपणे उपक्रम हाती घेते. भाषा व संस्कृतीच्या क्षेत्रात मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठी काम करणाऱ्या विविध शासकीय व अशासकीय संस्थांमध्ये समन्वय राखून, त्या संस्थांच्या सहाय्यानेही काही उपक्रम संस्था पार पाडते.

**प्रशासकीय व्यवस्था :-**

संस्थेचे कामकाज संस्थेच्या मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील नियामक मंडळाच्या सल्ल्यानुसार चालते. संस्थेचे कार्यक्रम/ उपक्रम/ प्रकल्प यांचे अग्रक्रम ठरविण्यासाठी नियामक मंडळाच्या सल्ल्यानुसार एक उपक्रम समिती असते. आर्थिक बाबी विचारात घेण्यासाठी नियामक मंडळाच्या सदस्यांमधून निर्माण केलेली एक वित्त समिती आहे. तसेच, संस्थेचे आर्थिक, प्रशासकीय व कायदेशीर नियोजन व व्यवस्थापन करण्यासाठी आणि संस्थेच्या विविध प्रकल्पांच्या अंमलबजावणीच्या कामावर देखरेख ठेवण्यासाठी एक कार्यकारी समिती नेमण्यात येते. संस्थेच्या विविध कार्यासाठी या कार्यकारी समितीची मंजुरी आवश्यक असते.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री हे संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत आणि मराठी भाषा विभागाचे मंत्री हे संस्थेचे पदसिद्ध उपाध्यक्ष आहेत.

**संस्थेचे कार्य :-**

संस्थेने आपल्या उद्दिष्टांना अनुसरुन स्थापनेपासून विविध प्रकारचे उपक्रम आयोजित केले आहेत.

**(अ) चर्चासत्रे** :- आजपर्यंत विविध विषयांवर २५ हून अधिक राज्यस्तरीय चर्चासत्रांचे आयोजन राज्य मराठी विकास संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

**(ब) काही महत्त्वपूर्ण प्रकाशने :-** मराठी भाषेच्या विकासाला पूरक असे माहितीकोश, संकल्पनाकोश, सूची, माहितीपुस्तिका, कार्यपुस्तिका, वैचारिक, संशोधनात्मक लेखन, मराठी साहित्यकृतींची हिंदी भाषांतरे अशी विविधांगी पुस्तके संस्थेने प्रकाशित केली आहेत. त्यापैकी काही उल्लेखनीय प्रकाशने पुढीलप्रमाणे आहेत -

**(१) भाषाविषयक :-**

**(अ) शिक्षण, शिक्षक व अभ्यासक्रम** - (संपादन - रमेश पानसे) - जन्मभाषेचा पाश तोडून आम्ही काय करणार? ना देश, ना गोत, ना राष्ट्र असे आम्हांस व्हावयाचे आहे काय?, या मौलिक आणि मूलभूत प्रश्नाला भिडणारे, मराठीच्या शिक्षणक्रमाशी संबंधित असलेले एक जुने (१९०६) चिरतरुण पुस्तक.

**(ब) मराठी भाषा : वाढ आणि बिघाड** - (श्री. के. क्षीरसागर) मराठी बोलताना आणि तिच्यातून लेखनव्यवहार पार पाडताना सर्वसामान्य शिक्षित माणसाच्या मनात आज जे-जे प्रश्न घुटमळत आहेत, त्यांचा मुक्त मनाने घेतलेला परामर्श.

**(क) महाराष्ट्राचा भाषिक नकाशा-पूर्वतयारी** - (प्रमुख संशोधक - डॉ. रमेश धोंगडे / संशोधन समन्वयक आणि संशोधक सहायक - डॉ. अशोक सोलनकर) प्रमाण मराठी, बोली, उपभाषा, आदिवासींच्या भाषा, मिश्रभाषा इत्यादींचे विविध भाषिक आविष्कार, त्यांची प्रदेशानुसार नकाशाद्वारे मांडणी करुन, महाराष्ट्रातील भाषांची वैविध्यपूर्ण माहिती देणारा ग्रंथ.

**(२) कोश व सूची वाङ्मय :-**

**(अ) कोश व सूची वाङ्मय : स्वरुप आणि साध्य** - (संपादन - सरोजिनी वैद्य, सुषमा पौडवाल, अनिता जोशी, कविता महाजन) बी. ए., एम. ए. चे मराठी विषयाचे विद्यार्थी, ग्रंथालयशास्त्र विद्यार्थी तसेच, संशोधनपर लेखन करु इच्छिणाऱ्यांसाठी उपयुक्त. संस्कृत-इंग्रजी-मराठी भाषांतील वैविध्यपूर्ण कोश व सूचीवाङ्मयाचा सांगोपांग परिचय करुन देणारा ग्रंथ.

**(ब) शालेय मराठी शब्दकोश** - (वसंत आबाजी डहाके, गिरीश पतके) इयत्ता ५ वी ते १२ वी पर्यंतच्या सर्व विषयांच्या मराठी पाठ्यपुस्तकांशी संबंधित शब्द, संज्ञा, वाक्प्रचार आदींची सचित्र व सोदाहरण ओळख. मराठी अभ्यास परिषदेतर्फे दिले जाणारे मराठी भाषाविषयक लेखनाचे महाबँक पारितोषिक १९९९. आजपर्यंत या कोशाच्या तीन सुधारित आवृत्त्या प्रकाशित करण्यात आल्या आहेत.

**(क) विज्ञान संकल्पना कोश** (प्रा. रा. वि. सोवनी) इयत्ता ५ वी ते १० पर्यंतच्या रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र व जीवशास्त्रातील संकल्पना सुबोध मराठीतून उलगडून सांगणारा कोश. (मराठी विज्ञान परिषदेच्या सहकार्याने)

**(ड) मराठी लघुलेखन शब्दकोश** (व. वा. इनामदार) मराठी लघुलेखनाचे शिक्षक आणि विद्यार्थी यांना सरावासाठी उपयुक्त ठरलेला लघुलेखनविषयक एकमेव ग्रंथ. ना. गो. कालेलकर पुरस्कार, महाराष्ट्र राज्य शासन पुरस्कार १९९५-९६.

**(इ) दलित ग्रामीण साहित्य शब्दकोश व विधीकोश** (संपादक - डॉ. गंगाधर पानतावणे) याकरिता इ.स. १८१८ ते २००५ या कालखंडात प्रकाशित झालेल्या साहित्यातून दलित-ग्रामीण जीवनानुभव व्यक्त झाले आहेत, असे साहित्य या शब्दकोशासाठी आधारभूत मानले आहे. आजवर शब्दकोशाचे तीन खंड व विधीकोशाचा १ खंड असे एकूण ४ खंड प्रकाशित.

**(३) शैक्षणिक :-**

**(अ) मराठी लेखन मार्गदर्शिका :-** (यास्मिन शेख) - सर्वसामान्य नागरिक, शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी, भाषा शिकणाऱ्या अन्य भाषिक व्यक्ती, दूरचित्रवाणीपटावर लेखन करणारे कलावंत, पाट्या रंगविणारे रंगारी, टंकलेखक, संगणकावर अक्षरजुळणी करणारे जुळारी अशा सर्वांना मराठीत लेखन करण्यासाठी बिनचूक मार्गदर्शन करणारे उपयुक्त पुस्तक. आजपर्यंत या पुस्तकाच्या तीन सुधारित आवृत्त्या प्रकाशित करण्यात आल्या आहेत.

**(ब) प्रशासनिक मराठी भाषेचा विकास :-** (गीता भागवत) - प्रशासनिक लेखन करणाऱ्यांसाठी मार्गदर्शनपर सूचनांसह, प्रशासनिक मराठीच्या वस्तुनिष्ठ व शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेला अभ्यास.

**(क) इतर उपक्रम :-**

**१) बृहन्महाराष्ट्रातील (महाराष्ट्राबाहेरील अन्य राज्यात) मराठी माध्यमांच्या शाळांना व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साधनांचे वाटप - विविध राज्यांतील व जगातील अनेक देशांतील मराठी भाषकांसाठी उपक्रम** :-

मध्यप्रदेश, कर्नाटक, आंध्रप्रदेश, गुजरात इत्यादी राज्यातील शाळांना महत्त्वाची पुस्तके पाठवण्याचे काम संस्था करत असते. सन १९९४ पासून संस्थेने आंध्रप्रदेशातील महाराष्ट्र मंडळ, हैद्राबाद यांना व त्यांनी सुचविलेल्या शाळांतील इयत्ता १ ली ते १२ वी

पर्यंतच्या विद्यार्थ्यांना बालभारती, कुमारभारती, युवकभारती अशी मराठीची पाठ्यपुस्तके पाठविण्यात येतात. महाराष्ट्र मंडळ ही पुस्तके विद्यार्थी प्रतिष्ठान महाराष्ट्र मंडळ (आंध्रप्रदेश) यांच्यामार्फत संबंधित शाळांना वितरित करीत असते. तसेच, गुजरात राज्यातील अहमदाबाद येथील मराठी मंडळांच्या शाळांना दैनिक लोकसत्ता, पुणे सकाळ ही वर्तमानपत्रे व नियतकालिके पाठविण्यात येतात.

परंतु, सदर योजना केवळ उपरोक्त शाळांपुरती मर्यादित राहू नये, यासाठी सन २०२२-२३ या वर्षासाठी जाहिरात देण्यासाठी तयार करण्यात आलेले आवाहन तसेच, अटी-शर्तीच्या प्रारुपाला तसेच, प्रस्तावित अटी-शर्तीनुसार पात्र ठरणाऱ्या १० प्राथम्यक्रमावरील शाळांना रु.१०.०० लक्ष इतक्या एकूण खर्चाच्या मर्यादेत प्रत्येकी रु.१.०० लक्ष इतक्या कमाल मर्यादेत अनुदान वितरणाची मान्यता दि.२६.०६.२०२३ रोजी झालेल्या प्रकल्प-वित्त समितीने आणि दि.१२.०२.२०२४ रोजी झालेल्या कार्यकारी समितीने मान्यता दिली आहे. या दिलेल्या निर्देशांनुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

**२) बृहन्महाराष्ट्र मंडळांना अर्थसहाय्य योजना :-**

महाराष्ट्र शासनाने सन २०१० मध्ये स्वीकारलेल्या सांस्कृतिक धोरणातील प्रकरण-४ 'भाषा आणि साहित्य' याअंतर्गत बृहन्महाराष्ट्र या विभागात उल्लेखिल्यानुसार महाराष्ट्राबाहेर अन्य राज्यात मराठी भाषा, साहित्य आणि महाराष्ट्रीय संस्कृती या संदर्भात आणि महाराष्ट्राबाहेर मराठी ग्रंथ प्रकाशनाचे दर्जेदार कार्य करणाऱ्या मान्यताप्राप्त संस्थांना अर्थसहाय्य देण्याची योजना कार्यान्वित आहे.

राज्य मराठी विकास संस्थेच्या घटनेतील 'अन्य राज्यात व परदेशात असलेल्या मराठी भाषिकांसाठी विविध भाषिक उपक्रम करणे' या उद्दिष्टाचा भाग म्हणून, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळामार्फत राबविण्यात येणारी ही योजना शासन निर्णय, मराठी भाषा विभाग, दिनांक १३ जून, २०१६ अन्वये राज्य मराठी विकास संस्थेकडे हस्तांतरित केली आहे. या योजनेअंतर्गत, महाराष्ट्राबाहेर मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी कार्य करणाऱ्या देशांतर्गत बृहन्महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त संस्था/मंडळे यांना विहित कार्यपद्धतीनुसार एका संस्थेला जास्तीत जास्त २ लक्ष तर एकूण ५० लक्ष रुपयांच्या मर्यादेत अर्थसहाय्य करण्यात येते. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षापासून सन २०२२-२३ पर्यंत संस्थेच्या विहित कार्यपद्धतीने एकूण ८७ मान्यताप्राप्त संस्थांना अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे.

सन २०२२-२३ या वर्षासाठी या योजनेतंर्गत दरवर्षी प्रमाणे वृत्तपत्रांतून जाहिरात प्रसिद्ध करुन अर्ज मागविण्यात आले होते. यानुसार संस्थेस ३४ अर्ज प्राप्त प्राप्त झाले होते. या योजनेच्या अंतर्गत असणाऱ्या निवड समितीने या अर्जाची छाननी करुन २६ अर्ज प्रथमदर्शनी स्वीकारले. संस्थेच्या विहित कार्यपद्धतीनुसार दि.२६.०६.२०२३ रोजी झालेल्या प्रकल्प-वित्त समितीने आणि दि.१२.०२.२०२४ रोजी झालेल्या कार्यकारी समितीने त्यास मान्यता दिली.

या दिलेल्या निर्देशानुसार सन २०२२-२३ या वर्षासाठी कागदपत्रांची पूर्तता पूर्ण केलेल्या अशा पात्र २४ मंडळांच्या एकत्रित मंजूर रु.४०,२०,०००/- इतक्या रकमेपैकी, पहिल्या टप्प्यातील रु. २४,१२,०००/- इतकी रक्कम दि.०८.०८.२०२४ रोजी एनईएफटीद्वारे वितरित करण्यात आली आहे. उर्वरित दुसऱ्या टप्प्यातील एकत्रित रु.१६,०८,०००/- इतक्या अर्थसहाय्याची रक्कम वितरित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. या पात्र २४ मंडळांपैकी कागदपत्रांची पूर्तता केलेल्या अशा १६ मंडळे / संस्थांना स्मरणपत्रे पाठविण्यात आली आहेत. या मंडळांकडून पूर्तता होताच, दुसऱ्या टप्प्यातील अर्थसहाय्याची रक्कम वितरित करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

दरवर्षीप्रमाणे सन २०२५-२६ साठी वृत्तपत्रांमधून जाहिरात प्रसिद्ध करुन गुगल अर्जाद्वारे अर्ज मागविण्यात आले आहेत. या प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्याची कार्यवाही संस्थास्तरावरुन सुरु आहे.

**३) महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील मराठी मंडळे व संस्थांसाठी अर्थसहाय्य योजना –**

महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागात मराठी भाषेचा विकास, संवर्धन, संगोपन आणि अभिवृद्धी होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील मराठी संस्थांना अर्थसहाय्य करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार दिनांक १४ जून, २०२२ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागात मराठी भाषा संस्कृती व विकास यासाठी महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागात कार्य करणाऱ्या मान्यताप्राप्त संस्थांना/मंडळांना सदर शासन निर्णयातील परिच्छेद २ (२) मध्ये नमूद केलेल्या अटी-शर्तीच्या अधीन राहून अर्थसहाय्य/ अनुदान मंजूर करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार 'महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील मराठी भाषा संस्कृती व विकास यासाठी अर्थसहाय्य' हा नवीन उपक्रम म्हणून मराठी भाषा विभागाच्या अधिनस्त राज्य मराठी विकास संस्था यांच्या मार्फत सन २०२२-२३ पासून कार्यान्वित करण्यात आला आहे.

मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र. कसीयो-१०१२/प्र.क्र.१३९/२०१२/भाषा-३, दि.२१.०१.२०१३ अन्वये महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील मराठी भाषेचा विकास, सर्वधन, संगोपन आणि अभिवृद्धी होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनातर्फे एक खास बाब म्हणून महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील मराठी संस्थांना शासनाच्या अटी व शर्तीची पूर्तता करण्याऱ्या / पात्र ठरणाऱ्या संस्थांना अर्थसहाय्य करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. राज्य मराठी विकास संस्थेकडून सन २०२२-२३ या वर्षापासून 'महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील मराठी भाषा संस्कृती व विकास अर्थसहाय्य' ही योजना कार्यन्वित करण्यात आली आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील, महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावांतील मराठी भाषेचा विकास, संवर्धन, संगोपन आणि अभिवृद्धी होणाच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाच्या राज्य मराठी विकास संस्थेतर्फे महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील मराठी संस्थासाठी रु.१००.०० लक्ष इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे. राज्य मराठी विकास संस्थेने या योजनेअंतर्गत, निश्चित केलेल्या विहित कार्यपद्धती व निकषांना अनुसरुन, महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी कार्य करणाऱ्या मान्यताप्राप्त पात्र संस्थांना / मंडळांना रु. १०.०० लक्षच्या कमाल मर्यादेत अर्थसहाय्य करण्यात येणार आहे.

मराठी भाषा विभागाकडून निर्गमित करण्यात आलेल्या सदर शासन निर्णयान्वये राज्य मराठी विकास संस्थेकडून सन २०२२-२३ या वर्षापासून 'महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील मराठी भाषा संस्कृती व विकास अर्थसहाय्य' ही योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.

सदर योजनेतंर्गत सन २०२२-२३ या वर्षासाठी वृत्तपत्रांतून जाहिरात प्रसिद्ध करुन अर्ज मागविण्यात आले. यानुसार एकूण ६२ अर्ज संस्थेस प्राप्त झाले. महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाने दि.१४ जून, २०२२ आणि दि.३० नोव्हेंबर, २०२२ रोजी या विषयासंदर्भात निर्गमित केलेल्या शासन निर्णयात निश्चित केलेल्या निकषांच्या आधारे या योजनेतंर्गत निवड समिती सदस्यांनी ४१ अर्जांची निवड केली. यात १९ अर्ज हे शैक्षणिक संस्थांकडून प्राप्त झाले होते. परंतु शासनाने दि.२४ जून, २०२४ रोजीच्या पत्रान्वये केवळ साहित्य संस्थांनाच अर्थसाहाय्य करण्यात यावे, असे निर्देश दिले. सदर दिलेल्या निर्देशानुसार आणि दि.२६ जून, २०२३ रोजीच्या प्रकल्प-वित्त समितीने आणि दि.१२ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या कार्यकारी समितीने दिलेल्या निर्देशानुसार यासंदर्भातील कार्यवाही करण्यात आली. कागदपत्रांची पूर्तता पूर्ण केलेल्या अशा १९ पात्र साहित्य संस्थांच्या एकत्रित एकूण रु.६६,९९,५६०/- इतक्या अनुदान सहाय्यापैकी ६० टक्केनुसार रु.४०,१९,७३६/- इतक्या रकमेचा पहिला टप्पा दि. २८ मार्च, २०२४ रोजी

एनईएफटीद्वारे वितरित करण्यात आला आहे. या पात्र १९ मंडळांपैकी कागदपत्रांची पूर्तता केलेल्या अशा १७ मंडळे / संस्थांना दुसऱ्या टप्प्यातील अर्थसहाय्याची रक्कम वितरित करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. उर्वरित २ मंडळे / संस्थांना स्मरणपत्रे पाठविण्यात आली आहेत. या मंडळांकडून / संस्थांकडून पूर्तता होताच, दुसऱ्या टप्प्यातील अर्थसहाय्याची रक्कम वितरित करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

दरवर्षीप्रमाणेच सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातदेखील दरवर्षीप्रमाणे रितसर प्रक्रिया राबविण्यात आली आहे. प्राप्त झालेल्या अर्जांची निवड प्रक्रिया हाती घेतली आहे.

**४) मराठी भाषा संस्कृती ज्ञान परीक्षा व निबंध स्पर्धा :-**

बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली ही संस्था गेली ३० वर्षे मराठी भाषा, संस्कृती व सामान्य ज्ञान परीक्षा व निबंध स्पर्धा आयोजित करते. बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली आणि राज्य मराठी विकास संस्थेच्या संयुक्त विद्यमाने सन २०१८ पासून, सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. प्रतिवर्ष रु. ९.०० लक्ष इतक्या खर्चास मान्यता प्राप्त झालेली आहे.

बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली या मंडळाकडून प्राप्त होणारे अहवाल, देयके, कागदपत्रांची तपासणी करुन, प्रत्येक वर्षात रोख पुरस्कार, केंद्र मानधन, प्रमाणपत्र, परीक्षा प्रमुख मानधन, पेपर सेंटर व तपासनीस मानधन रोख पुरस्कार, प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह कार्यालयीन खर्च, विद्यार्थी मार्गदर्शन मानधनासाठी तर, प्रत्येक वर्षात होणाऱ्या पुरस्कार वितरण समारंभासाठी खर्च दिला जातो. सन २०१८ ते २०२३ पर्यंत या निबंध स्पर्धेचा सोहळा अजमेर (राजस्थान), इंदोर (देवास), बेळगाव, वाराणसी, जबलपूर, वडोदरा येथे संपन्न झाला आहे.

**५) विश्व मराठी संमेलन :-**

**पहिले विश्व मराठी संमेलन-सन २०२३ :-** मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. मभासं-२०२२/प्र.क्र.१२५/भाषा-२, दि.२१.११.२०२२ रोजीचा शासन निर्णयान्वये मराठी भाषा विभागतर्फे दि. ०४ ते ०६ जानेवारी, २०२३ या कालावधीत डोम, एस. व्ही. पी. स्टेडियम, नॅशनल स्पोर्टस् क्लब ऑफ इंडिया, वरळी, मुंबई येथे 'मराठी तितुका मेळवावा' अशी मध्यवर्ती संकल्पना असणारे पहिले विश्व मराठी संमेलन पार पडले.

या विश्व मराठी साहित्य संमेलनासाठी परदेशातील तसेच, देशांतर्गत विविध राज्यातील आणि महाराष्ट्रातील मराठी भाषेसाठी काम करणाऱ्या विविध संस्थांना निमंत्रित केले होते. या संमेलनासाठी सुमारे अडीच हजार इतकी संख्या उपस्थित होती. या विश्व मराठी संमेलनासाठी परदेशातील तसेच, देशांतर्गत विविध राज्यातील आणि महाराष्ट्रातील मराठी भाषेसाठी काम करणाऱ्या विविध संस्था यांना निमंत्रित करण्यात आले होते. सदर संमेलनात रंगमंचावरील सांस्कृतिक कार्यक्रम, परिसंवाद, चर्चासत्रे तसेच, लुप्त होत चाललेल्या वाद्य संस्कृती, खाद्य संस्कृती, वस्त्र संस्कृती, ग्रंथप्रदर्शन इ. कार्यक्रमांचे प्रदर्शन व त्यांची विक्री इत्यादींचे आयोजन करण्यात आले होते.

**दुसरे विश्व मराठी संमेलन-सन २०२४ :-** सन २०२४ मध्ये महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभागाकडून निर्गमित करण्यात आलेला शासन निर्णय क्र. विश्वसं-२०२३/प्र.क्र.६९ (भाग-१) भाषा-२, दि.०२.०१.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये दि. २७ ते २९ जानेवारी, २०२४ दरम्यान सिडको प्रदर्शन केंद्र, वाशी, नवी मुंबई येथे 'मराठी भाषेची वैश्विक व्याप्ती' अशी मध्यवर्ती संकल्पना असणारे द्वितीय विश्व मराठी संमेलन पार पडले.

दि. २७ ते २९ जानेवारी, २०२४ या तीन दिवसांच्या कालावधीत विविध भाषिक चर्चासत्रांच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सदर संमेलनात दररोज अंदाजे २५०० ते ३००० इतके मराठी बांधव उपस्थित होते. यात राज्याबाहेरील, देशाबाहेरील

मराठी भाषिक अतिथींचाही समावेश होता. तसेच, फेसबुक, इन्स्टा, युट्युब, ट्विटर अशा ऑनलाईन समाज माध्यमांद्वारेही जगभरातील हजारो मराठी बांधव आभासी उपस्थित होते. त्याचप्रमाणे, वेगवेगळ्या मराठी प्रसार माध्यमांद्वारे (वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या) कार्यक्रमांस प्रसिद्धी मिळाली. उद्योजक व गुंतवणुकदारांचा परस्परांशी संवाद साधण्यासाठी "इनव्हेस्टर मिट" चे आयोजनही केले होते. सदर संमेलनाचे औचित्य साधून महाराष्ट्रातील विविध मान्यवर आणि मराठी जनांबरोबरच देशभरातील विविध बृहन्महाराष्ट्र मंडळे जे देशभरात माय मराठीचा जागर, प्रचार-प्रसार करतात ते सर्व परदेशी व एतद्देशीय मराठी भाषिक बांधव सदर विश्व मराठी संमेलनाच्या माध्यमातून एका छत्राखाली एकत्रित आले होते. या सर्व परदेशी मराठी भाषिक बांधवांमध्ये परस्पर संवाद साधल्याने जगाच्या विविध भागात मराठी भाषेचा प्रचार-प्रसार, जतन व संवर्धन होण्यास तसेच, संस्कृतीबद्दल आस्था व रुची निर्माण होण्यास ह्या विश्व मराठी संमेलनामुळे शक्य झाले आहे.

**तिसरे विश्व मराठी संमेलन-सन २०२५ :-** मराठी भाषा विभागाने शासन निर्णय क्र. विश्वसं-२०२४/प्र.क्र.७१/भाषा-२, दि.१६.०१.२०२५ रोजी निर्गमित केलेल्या शासननिर्णयान्वये "अभिजात मराठी" ही मध्यवर्ती संकल्पना असणारे तिसरे मराठी विश्व संमेलन दि. ३१ जानेवारी ते ०२ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयाच्या प्रांगणात पार पडले.

सदर विश्व मराठी संमेलन २०२५ हे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतरचे पहिले संमेलन असल्याकारणाने याला एक वेगळे महत्त्व होते. अभिजात भाषेच्या अनुषंगाने पुढील वाटचाल कशी असावी , व अभिजात दर्जा मिळाल्यानंतर याचा मराठी भाषेसाठी काय फायदा अथवा लाभ होणार याबाबत विश्व मराठी संमेलन २०२५ मध्ये अनेक परिसंवादाद्वारे विस्तृत चर्चा करण्यात आली.

ह्या संकल्पनेच्या अनुषंगाने, सदर संमेलनाच्या तीन दिवसांच्या कालावधीत मराठी भाषेचे जतन व संवर्धन होण्यासाठी विविध भाषाविषयक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात भाषा, साहित्य, मराठीचा झेंडा अटकेपार, महाराष्ट्राची महासंस्कृती, मराठी भाषा आणि प्रसार माध्यमे, नाटक, चित्रपटातील मराठी भाषा यांचा परिसंवाद, प्रशासनातील मराठी भाषा, अभिजात भावसंगीत, चर्चासत्रे इ. विविध कार्यक्रमांचा यात समावेश होता. याबरोबरच भव्य पुस्तक प्रदर्शन भरविण्यात आले होते. यात एकूण १३२ प्रकाशक, ग्रंथविक्रेत्यांना विनामूल्य दालन उपलब्ध करुन देण्यात आले होते. सकाळी १० ते रात्री १० या वेळेत या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याचाच एक भाग म्हणून पुस्तक आदान-प्रदान हे या संमेलनाचे मुख्य आकर्षण ठरले. याद्वारे वाचकांनी आपली जुनी पुस्तके घेऊन, आदान-प्रदान दालनात येऊन कुठल्याही किमतीची पुस्तके घरी नेऊ शकले. यात किमतीची कुठलीही मर्यादा घालण्यात आली नव्हती. यामुळे समुद्ध ग्रंथसंपदेचे आदान-प्रदान होऊन वाचन संस्कृती समृद्ध होण्यासाठी खूप मोठी मदत झाली.

या तिसऱ्या विश्व मराठी संमेलनाची मुख्य विशेष बाब म्हणजे या वर्षीपासून दोन विशेष पुरस्कार प्रदान करण्याचे योजिले. यानुसार पहिला पुरस्कार श्री. मधु मंगेश कर्णिक, जेष्ठ साहित्यिक यांना विशेष साहित्यभूषण पुरस्कार तर, श्री. रितेश देशमुख, सिने अभिनेते यांना विशेष सन्मान कलारत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**चौथे विश्व मराठी संमेलन सन-२०२६ :-** मराठी भाषा विभागामार्फत चौथे विश्व मराठी संमेलन-२०२६ हे दि.२७, २८ फेब्रुवारी आणि १ मार्च, २०२६ या कालावधीत नाशिक येथील मराठा विद्या प्रसारक समाजाचे के. टी. एच.एम महाविद्यालयाच्या प्रागंणात पार पडले.

सदर संमेलनामध्ये डॉ. भालचंद्र नेमाडे यांना विश्व मराठी साहित्य भूषण पुरस्कार, संगीतकार अजय आणि अतुल गोगावले यांना विश्व मराठी कलारत्न पुरस्कार आणि शांतिब्रह्म, गुरुवर्य मारुती बाबा कुरेकर यांना विश्व मराठी संमेलन विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आले.

सदर विश्व मराठी संमेलनामध्ये देशातील आणि परदेशातील बांधव उपस्थित होते. तसेच, संमेलनात अनेक भाषिक कार्यक्रम, परिसंवाद, सांगितीक कार्यक्रम, चर्चासत्रे अशा विविध कार्यक्रमांचा समावेश होता.

या संमेलनामध्ये एकूण १५० प्रकाशक, ग्रंथविकेत्यांना विनामूल्य दालन उपलब्ध करुन देण्यात आले होते. संमेलनात विशेष दालनांची उभारणी करण्यात आली होती. यात साहित्यिक स्वाक्षरी हस्ताक्षर दालन, बृहन्महाराष्ट्र मंडळाचे दालन, आंतरराष्ट्रीय मराठी मंचाचे दालन, नाटक, संगीत, चित्रपट, क्रीडा, दुर्मिळ ग्रंथ प्रदर्शन व अभिजात दालन, कॅलिग्राफी दालन, कृषी व ग्राम विकास दालन इ. महाराष्ट्र संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या विशेष दालनांची उभारणी करण्यात आली होती.

**६) वाचन प्रेरणा दिन :-** भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून सन २०१५ पासून दरवर्षी दिनांक १५ ऑक्टोबर हा दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्त विविधांगी कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

**सन २०१९** मध्ये वाचन, प्रेरणा दिनानिमित्त महाराष्ट्रातील अ, ब, क व ड या वर्गातील सर्व ग्रंथालये आणि वाचनकट्टा यांना प्रत्येकी पाच हजार रुपये इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले.

**सन २०२०** मध्ये, कोविड-१९ प्रादुर्भावामुळे, महाराष्ट्रातील जनतेपर्यंत मराठी भाषा व मराठी साहित्य वाचनाचे महत्त्व व पुस्तक वाचनाला प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने 'साहित्ययान' या उपक्रमाचे आभासी पद्धतीने आयोजन केले होते. या कार्यक्रमात प्रा. डॉ. भालचंद्र नेमाडे, प्रा. रंगनाथ पठारे, श्री. किशोर कदम (सौमित्र) इत्यादी श्रेष्ठ साहित्यिक तसेच, श्री. प्रमोद पवार, श्रीम.मुक्ता बर्वे इत्यादी कलावंतांचा सहभाग शक्य झाला. तसेच, हा कार्यक्रम आभासी माध्यमातून असल्याने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचला.

**सन २०२१** मध्ये, दि.१५ ऑक्टोबर, २०२१ रोजी राज्य मराठी विकास संस्थेद्वारे महाजालीय अभिवाचन स्पर्धा आयोजित करण्यात आली. तसेच, महाजालीय अभिवाचन उपक्रमही राबविण्यात आला.

**सन २०२२** मध्ये, राज्य मराठी विकास संस्थेद्वारे 'वसा वाचनाचा' या दोन दिवसीय डिजिटल वाचन परिसंवाद या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमात मंगला गोडबोले, अच्युत गोडबोले, प्रणव सखदेव, रोहन चंपानेरकर, विजय केंकरे, चिन्मयी सुमीत, पुष्कर श्रोत्री, शिल्पा नवलकर या मान्यवरांचा सहभाग होता. तसेच, परिसंवादानंतर मराठी साहित्यातील कवितांचे वाचन व लेखांचे अभिवाचन करण्यात आले. या परिसंवादाचे सूत्रसंचालन प्रमोद बापट व डॉ. नितीन आरेकर यांनी केले.

याचप्रमाणे, 'डिजिटल कविता वाचन' या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे वयोगटानुसार तीन गट अनुक्रमे ८ ते १५ वर्षे, १६ ते ३० वर्षे व ३० वर्षांपुढील असे तीन गट करण्यात आले होते. सदर स्पर्धेत अमेरिकेतील स्पर्धकांनीसुद्धा सहभाग घेतला. कवी दासू वैद्य, प्रा. अनघा मांडवकर व आदित्य दवणे हे मान्यवर या स्पर्धेचे परीक्षक होते. सदर स्पर्धेचा अंतिम सोहळा दि. १८.१०.२०२२ रोजी पार पडला.

**सन २०२३** मध्ये, राज्य मराठी विकास संस्थेने 'जागर मराठीचा' हा दोन दिवसीय आभासी कार्यक्रम दि. १४ व १५ ऑक्टोबर २०२३ रोजी, 'माझी मराठी' लेख स्पर्धा, तसेच, 'शिवरायांचे आठवावे रूप' व 'बोलतो मराठी' या दोन प्रत्यक्ष कार्यक्रमांचे दि. १६ ऑक्टोबर २०२३ रोजी (दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र, मुंबई) आयोजन करण्यात आले होते.

**सन २०२४** मध्ये, दि. १४ ऑक्टोबर रोजी 'मराठीचे भवितव्य : आपली जबाबदारी' या विषयावर विशेष परिसंवाद आयोजित करण्यात आला. यात श्रीकांत बोजेवार (ज्येष्ठ पत्रकार), अजय भालवणकर (सोनी मराठी), हर्ष भटकळ (पॉप्युलर प्रकाशन), प्रा. मानिका गजेंद्रगडकर (लेखिका) हे मान्यवर सहभागी होते. तसेच, याच विषयावर लेखस्पर्धाही आयोजित करण्यात आली होती. या लेखस्पर्धेचा निकाल दि. १५ ऑक्टोबर रोजी झालेल्या आभासी कार्यक्रमात जाहीर करण्यात आला. तसेच, दि. १५ ऑक्टोबर, रोजी आभासी कार्यक्रमात 'निवडक मराठी साहित्याचे अभिवाचन' करण्यात आले.

दि.१५ ऑक्टोबर रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, माटुंगा (प) येथे सायं. ६.३० ते ९.३० या वेळेत **'वाचनवाटा'** हा प्रत्यक्ष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ.रविंद्र शोभणे व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष सदानंद मोरे तसेच, श्रीम.अनुराधा पौडवाल यांची या कार्यक्रमात विशेष उपस्थिती व सहभाग होता. त्याचप्रमाणे, उत्तरा केळकर, तुषार दळवी, पुरुषोत्तम बेर्डे, प्रा. प्रविण दवणे, सोनाली कर्निक, पं.उपेंद्र भट, मंदार आपटे, मधुरा वेलणकर, डॉ. संजय उपाध्ये, आदित्य कदम, स्वरा जोशी या कार्यक्रमात सहभागी कलाकार होते. सदर कार्यक्रम सर्व प्रेक्षकांसाठी खुला व विनाशुल्क होता. त्याचप्रमाणे, हा कार्यक्रम संस्थेच्या युट्युब वाहिनीवरुन थेट प्रसारण करण्यात आले होते.

**सन २०२५** मध्ये, वाचन प्रेरणा दिनानिमित्त राज्य मराठी विकास संस्थेद्वारे पुस्तकांचे गाव भिलार तसेच, राज्य मराठी विकास संस्थेचे बदलापूर येथील मध्यवर्ती ग्रंथालय येथे वाचन चळवळ बळकट होण्यासाठी विविध व्याख्यान, परिसंवाद इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. वाचन प्रेरणा दिनानिमित्त मराठी भाषा विभाग आयोजित त्रिमुर्ती प्रांगण, मंत्रालय येथे पुस्तक प्रदर्शनात राज्य मराठी विकास संस्थेच्या पुस्तकांचे प्रदर्शन करण्यात आले.

**७) मराठी भाषा गौरव दिन :-**

शासनाच्या धोरणानुसार कविवर्य कुसुमाग्रजांच्या जन्मदिनानिमित्त दरवर्षी २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. मराठी भाषा गौरव दिन समारंभाच्या वेळी मराठी भाषा विभागातर्फे देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात येते.

२७ फेब्रुवारी, २०२४ रोजी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी भाषेचे महाराष्ट्रासाठी योगदान, मराठी भाषेचा विकास व संवर्धन यांसाठी केले गेलेले प्रयत्न, तमाशा, नाटक, सिनेमा यातून फुलत गेलेली मराठी भाषा, विविध बोली भाषा इत्यादींच्या माध्यमातून मराठी भाषेचा प्रवास दर्शविणारा आणि मराठी भाषेची सौंदर्यस्थळे उलगडणाऱ्या 'मान मराठीचा, सन्मान महाराष्ट्राचा' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

२७ फेब्रुवारी, २०२५ रोजी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'गेट वे ऑफ इंडिया' येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमात मराठी भाषा विभागाच्या विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

२७ फेब्रुवारी, २०२६ रोजी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त नाशिक येथील मराठा विद्या प्रसारक समाजाचे के. टी. एच. एम महाविद्यालय येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमात मराठी भाषा विभागाच्या विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

**८) मराठी भाषा पुरस्कार :-**

मराठी भाषा विभाग, शासन निर्णय, क्र. भासंपु-२०१६/प्र.क्र.२६/२०१६/भाषा-३, दि.१८ फेब्रुवारी २०१६ अन्वये, सन २०१६ पासून 'अशोक रा. केळकर, मराठी भाषा-अभ्यासक पुरस्कार' आणि 'मंगेश पाडगांवकर, मराठी भाषा-संवर्धक पुरस्कार' हे दोन नवीन पुरस्कार मराठी भाषा संवर्धनासाठी मोलाचे योगदान देणाऱ्या व्यक्तीस अथवा संस्थेकरिता सुरू करण्यात आले आहेत. मराठी भाषा गौरव दिन समारंभाच्या वेळी सदर पुरस्कारांचे वितरण राज्य मराठी विकास संस्थेद्वारे करण्यात येते. या पुरस्काराचे स्वरूप प्रत्येकी रु.२.०० लक्ष रोख, मानचिन्ह व मानपत्र असे आहे.

मराठी भाषेचा अधिक प्रसार व प्रचार व्हावा यादृष्टीने सदर दोन्ही पुरस्कार सन २०२१ पासून व्यक्ती आणि संस्था यांना स्वतंत्रपणे देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, दि. २४.०२.२०२१ रोजीच्या बैठकीत मंत्रीमंडळाने वरील दोन ऐवजी चार पुरस्कार (दोन व्यक्ती व दोन संस्था यांना) सन २०२१ या वर्षापासून प्रदान करण्यास मान्यता दिली आहे.

सन २०२३ या वर्षी 'अशोक केळकर, मराठी भाषा-अभ्यासक पुरस्कार' डॉ. प्रकाश परब (व्यक्ती) व वाङ्मय चर्चा मंडळ, बेळगांव (संस्था) यांना व 'मंगेश पाडगांवकर, मराठी भाषा-संवर्धक पुरस्कार' प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील (व्यक्ती) व कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नाशिक (संस्था) यांना दि.२७ फेब्रुवारी, २०२४ रोजी मराठी भाषा गौरव दिनी प्रदान करण्यात आले आहेत.

सन २०२४ या वर्षीचे 'अशोक केळकर मराठी-भाषा-अभ्यासक पुरस्कार' डॉ. रमेश सीताराम सूर्यवंशी (व्यक्ती) व मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई (संस्था) यांना व 'मंगेश पाडगांवकर, मराठी भाषा-संवर्धक पुरस्कार' श्रीमती भीमाबाई संपत जोंधळे (व्यक्ती) व मराठवाडा साहित्य परिषद, छत्रपती संभाजीनगर (संस्था) यांना २७ फेब्रुवारी, २०२५ रोजी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'गेट वे ऑफ इंडिया' येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमामध्ये मा. मंत्री, मराठी भाषा यांच्या उपस्थितीत मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

सन २०२५ या वर्षीचे 'डॉ. अशोक केळकर, मराठी भाषा अभ्यासक पुरस्कार' डॉ. दिलीप धोंडगे (व्यक्ती) व आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी (संस्था) यांना आणि 'कविवर्य मंगेश पाडगांवकर, मराठी भाषा संवर्धक पुरस्कार' श्री. विनोद सूर्यनारायण कुलकर्णी (व्यक्ती) व कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषद, कलबुर्गी (संस्था) यांना २७ फेब्रुवारी, २०२६ रोजी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त नाशिक येथील मराठा विद्या प्रसारक समाजाचे के. टी. एच.एम महाविद्यालय येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमामध्ये प्रदान करण्यात आले.

**९) मराठी भाषा संवर्धन पंधरवडा :-**

दि. १४ जानेवारी २०२४ ते दि. २८ जानेवारी २०२४ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त राज्य मराठी विकास संस्थेद्वारे मराठीतील विविध साहित्यप्रकार, आणि साहित्यक्षेत्रे यात आपले योगदान देणाऱ्या विविध मान्यवरांचे विचार लोकांपर्यंत पोहोचावेत यासाठी 'साहित्य सेतू' या कार्यक्रमाचे महाजालीय स्वरुपात आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम राज्य मराठी विकास संस्थेद्वारे मिती क्रिएशन्स यांच्या सहयोगाने करण्यात आला. सदर कार्यक्रमांचे थेट प्रक्षेपण राज्य मराठी विकास संस्था, मिती क्रिएशन्स यूट्यूब वाहिनवर करण्यात आले. (**https://rmvs.marathi.gov.in/३०५८**)

सन २०२५-२६ मध्ये दि.१४ जानेवारी, २०२५ ते दि.२८ जानेवारी, २०२५ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त 'अभिजात मराठी' ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवून, राज्य मराठी विकास संस्थेद्वारे मिती क्रिएशन यांच्या सहयोगाने खालीलप्रमाणे महाजालीय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले-

**अ. महाजालीय कार्यक्रम**

१. अभिजात मराठी भाषा याविषयी महाराष्ट्र-सीमावर्ती भागांत ७ महाजालीय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, त्याचे थेट प्रक्षेपण राज्य मराठी विकास संस्थेच्या यूट्यूब वाहिनीवर प्रसारित करण्यात आले आहे.

२. महाराष्ट्री-प्राकृत भाषाविषयक ४ परिचयपत्र महाजालीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. सदर व्याख्यानमाला राज्य मराठी विकास संस्थेच्या यूट्यूब वाहिनीवर प्रसारित करण्यात आली आहेत.

(http://www.youtube.com/watch?v=tlqV9-1ZGXc&list=PLvAecHP4nl6NIB-LyPrCua6JgZqsvlpuc)

**आ. बाल-कुमार मराठी भाषिक मेळावा**:-

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई आणि नवभारत शिक्षण मंडळ, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२२.१.२०२५ रोजी सांगली येथे एकदिवसीय बाल-कुमार मराठी भाषिक मेळ्याचे आयोजन करण्यात आले.

सन २०२६-२७ मध्ये दि.१४ जानेवारी, २०२६ ते दि.२८ जानेवारी, २०२६ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त परिसंवाद, चर्चासत्र, अभिवाचन, व्याख्यान अशा विविध कार्यक्रमाचे (महाजालीय व प्रत्यक्ष) आयोजन राज्य मराठी विकास संस्थेद्वारे करण्यात आले.

**संस्थेत सुरू असलेले/पूर्ण झालेले उल्लेखनीय प्रकल्प :-**

**(१) दलित-ग्रामीण साहित्य शब्दकोश व साहित्यसूची :-**

**अ)** दलित आणि ग्रामीण साहित्य हे मराठी साहित्यातील महत्त्वाचे असे दोन प्रवाह आहेत. अपरिचित शब्द, संज्ञा, संकल्पना, म्हणी, वाक्यप्रयोग यामुळे हे साहित्य काही प्रमाणात वाचकांच्या दृष्टीने दुर्बोध राहिले आहे. लोकजीवनाच्या वेगवेगळ्या अंगांशी निगडित अशा दलित-ग्रामीण साहित्यातील, शब्दांचा नेमका अर्थ सापडेल, असा शब्दकोश आज मराठीत नसल्याने तसेच, या साहित्यामधून जे नवनवीन आणि अपरिचित शब्द मिळतात, ते प्रमाण मराठी भाषेत येणे आवश्यक असल्याने, असे शब्द विविध साहित्यकृतींमधून निवडून त्यांचे अर्थ तपशीलांसह या कोशात दिलेले आहेत. तो विशिष्ट शब्द असलेले साहित्यकृतीतील मूळ वाक्यही वाचकांच्या संदर्भासाठी त्या त्या नोंदीमध्ये दिलेले आहे. या कोशाचे तीनही खंड प्रकाशित झाले आहेत.

**ब) दलित-ग्रामीण-साहित्य रूढी, प्रथा, परंपरा विधिकोश :-** दलित-ग्रामीण साहित्य शब्दकोश या प्रकल्पाचाच हा एक भाग असून, त्यामध्ये दलित व ग्रामीण साहित्यकृतींमधून आलेल्या विविध जाती-जमातींच्या विधी, रूढी, प्रथा, परंपरा, श्रद्धा, समजुती, सण-उत्सव, नवस-सायास, दैवत, लोकाचार इत्यादि विषयांच्या अनुषंगाने, सांस्कृतिक संदर्भ असलेल्या अनेक संकल्पनांचे संकलन करुन, त्यांची सचित्र स्पष्टीकरणात्मक माहिती या कोशातून दिलेली असून, हा कोश प्रकाशित करण्यात आला आहे.

**(२) वस्त्रनिर्मिती माहितीकोश** :-

वस्त्रोद्योगाची सर्वांगीण व अद्ययावत माहिती मराठी भाषेतून उपलब्ध करून देणारा 'वस्त्रनिर्मिती माहितीकोश' हा प्रकल्प राज्य मराठी विकास संस्था आणि दत्ताजीराव कदम तांत्रिक शिक्षण संस्था, इचलकरंजी यांनी संयुक्तपणे कार्यान्वित केलेला प्रकल्प आहे. झपाट्याने विकसित होणाऱ्या विज्ञान-तंत्रज्ञानामुळे भारतातील वस्त्रोद्योगाचा, वस्त्रनिर्मितीकलेचा विकास कसा होत गेला, ते विकासाचे टप्पे, भारतीय वस्त्रोद्योगाचे आजवरचे स्वरुप, त्याची वैज्ञानिक-तांत्रिक प्रगती, महाराष्ट्राचे या उद्योगामधील स्थान, होऊ

घातलेले जागतिकीकरण या सर्वांचा साकल्याने विचार या कोशात करण्यात आला आहे. मराठीच्या आणि महाराष्ट्राच्या संदर्भात वस्त्रोद्योगाला प्राचीन काळापासून महत्त्वाचे स्थान आहे, परंतु या विषयासंबंधी फारच थोडे दर्जेदार लिखाण मराठी भाषेत उपलब्ध आहे. ही त्रुटी दूर करण्यासाठी सर्वसामान्य जिज्ञासूला समजेल अशी माहिती या कोशात देण्यात आली आहे.

या माहितीकोश प्रकल्पांतर्गत एकूण १३ खंड मान्यताप्राप्त असून, आतापर्यंत (१) खंड १ - तंतुनिर्माण व तंतुविज्ञान, (२) खंड २ - सूतनिर्माण, (३) खंड ३ - कापडनिर्माण, (४) खंड ४ - रासायनिक प्रक्रिया, (५) खंड ५ - फॅशन व वस्त्रप्रावरणे, (६) खंड ६- तांत्रिक वस्त्रे, (७) खंड -०७-वस्त्रोद्योग व्यवस्थापन, (८) खंड ९-वस्त्रोद्योग परिभाषा कोश हे आठ खंड प्रकाशित झालेले आहेत.

माहितीकोश खंड ०८- वस्त्र संकल्पनेचा सांस्कृतिक आविष्कार या खंडांचे काम अंतिम टप्प्यात असून, तो डिसेंबर, २०२५ पर्यंत मुद्रित होऊ शकेल. वस्त्रनिर्मिती माहितीकोश खंड-१ ते ७ हे **https://rmvs.marathi.gov.in/२६** या संकेतस्थळावर वाचकांसाठी विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

**(३) मराठी ग्रंथसूचिमाला (१९५१-२०००) :-**

कै. शं. ग. दाते यांनी सन १८०० ते १९५० पर्यंतच्या मराठी ग्रंथांची विषयवार सूची दोन भागात तयार केली होती. ही सूची बरीच वर्षे अनुपलब्ध असल्याने इ.स. २००० मध्ये संस्थेने तिचे नवीन परिशिष्टांसह पुनर्मुद्रण केले. तसेच, इ. स. १९५० नंतर मराठीमध्ये प्रकाशित झालेल्या ग्रंथांची एकत्रित अशी विषयवार ग्रंथसूची उपलब्ध नसल्याने राज्य मराठी विकास संस्थेने 'मराठी ग्रंथसूचिमाला' हा प्रकल्प हाती घेतला असून, त्याअंतर्गत इ. स. १९५१ ते २००० या कालखंडातील मराठी ग्रंथांची विषयवार सूची करण्यात येत आहे. आतापर्यंत या मालेतील चार भाग:- भाग-३ (१९५१-१९६२), भाग-४(१९६३-१९७०), भाग-५ (१९७१-१९७८) आणि भाग-६ (१९७९-१९८५) - प्रकाशित करण्यात आले आहेत.

मराठी ग्रंथसूची भाग-७ (१९८६-१९९०) या कालखंडातील व भाग-८ (१९९१-२०००) यातील सर्व सामग्री संगणकीय विदागाराच्या (डेटाबेसच्या) स्वरुपात संस्थेकडे उपलब्ध आहे. ती सामग्री शोधसुकर पद्धतीने शोधता यावी, याकरिता बाह्यस्त्रोताद्वारे संकेतस्थळ व आज्ञावली विकसित करण्याची बाब संस्थास्तरावर विचाराधीन होती.

तसेच, संस्थास्तरावर सद्य:स्थितीत पुढील डेटाबेस संस्थास्तरावर तयार करण्यात आले असून, महाजालावर शोधसुकर पद्धतीने उपलब्ध करुन देणे शक्य आहे-

१) मराठी दोलामुद्रितांची सूची

२) मध्यवर्ती ग्रंथालयाची सूची

३) मराठी कोश व संदर्भसाधनांची सूची

त्याअनुषंगाने उपरोक्त सूची तसेच, संस्थास्तरावर भविष्यात तयार करण्यात येणाऱ्या सूचीदेखील महाजालावर शोधसुकर स्वरुपात उपलब्ध करुन देण्यासाठी बाह्यस्त्रोताद्वारे संकेतस्थळ व आज्ञावली विकसित करुन घेण्यासाठी इच्छुक संस्थांकडून कामांच्या स्वरुपानुसार दरपत्रके मागविण्यात आली. त्यानुसार जेनएक्सी टेक्नॉलॉजी या संस्थेद्वारे सदर काम करून घेण्यात आले. तसेच, सूचीसंदर्भात स्वतंत्र संकेतस्थळ तयारी करण्याची कार्यवाही संस्थास्तरावर करण्यात येत आहे.

**(४) बोलकी / श्राव्य पुस्तके (ऑडिओ सीडीज) :-**

मराठीतील उत्तमोत्तम जुने साहित्य तसेच, ज्ञानपीठ पारितोषिक विजेत्या साहित्यिकांचे साहित्य, साहित्य अकादमी पारितोषिक विजेते साहित्य व तत्सम पुरस्कार प्राप्त मराठी साहित्याचे नामवंत कलावंतांच्या आवाजात ध्वनीमुद्रण करुन, ते

संस्थेच्या संकेतस्थळावर जनतेस विनामुल्य उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने सन २०११ पासून राज्य मराठी विकास संस्थेने बोलकी / श्राव्य पुस्तके हा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे.

**पहिला टप्पा** - बोलकी पुस्तके / श्राव्य पुस्तके या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात सन २०१३ मध्ये दासबोध, कृष्णाकाठ, ज्ञानपीठ पुरस्कार विजेते मराठीतील ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज आणि विंदा करंदीकर यांचे अनुक्रमे रसयात्रा व प्रवासी पक्षी आणि संहिता व आदिमाया या कवितासंग्रहांची श्राव्यपुस्तकात रुपांतर करण्यात आले आहे. सदर श्राव्यपुस्तके राज्य मराठी विकास संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. तसेच, त्यांच्या ऑडिओ सीडीही संस्थेच्या कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत. या श्राव्यपुस्तकाच्या पहिल्या टप्प्यासाठी सुमारे ६०.०० लक्ष इतका खर्च झालेला आहे.

**दुसरा टप्पा** - या प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथांचे श्राव्य पुस्तकात रुपांतर करण्यात आले आहे. दि. १७ डिसेंबर, २०२० रोजी झालेल्या प्रकल्प-वित्त समितीच्या बैठकीत सदर ग्रंथ श्राव्य पुस्तकात रुपांतर करण्यास व त्यासाठी येणाऱ्या रु.९०.०० लक्ष इतक्या अंदाजित खर्चास तत्वत: मान्यता दिली होती. मा. मंत्री, मराठी भाषा यांनी दिलेल्या निदेशानुसार रा.म.वि संस्थेचे प्रतिनिधी आणि सुप्रसिद्ध संगीतकार श्री. राहुल रानडे, पुणे यांच्यामध्ये दि.२३ मार्च, २०२२ रोजी सामंजस्य करार करण्यात आला. करारनाम्यातील अटी-शर्ती क्र.१० नुसार श्री ज्ञानेश्वरी मधल्या एकूण ९०३४ ओव्या आणि एकनाथ महाराजांनी रचलेल्या ५ ओव्या अशा मिळून एकूण ९०३९ इतक्या ओव्या ध्वनिमुद्रण करण्यात आल्या आहेत. यासाठीचा एकूण रु.८९,९७,५००/- (टिडीएस अंतर्भूत) इतका खर्च झाला आहे.

या ज्ञानेश्वरी श्राव्य पुस्तकाचे द्वितीय विश्व मराठी संमेलनात दि. २८ जानेवारी, २०२४ रोजी मा. मराठी भाषा मंत्री, श्री. दिपकजी केसरकर, मनसे अध्यक्ष श्री. राज ठाकरे, मराठी भाषा विभागाच्या अपर मुख्य सचिव मा. श्रीम. मनीषा पाटणकर-म्हैसकर व या श्राव्य पुस्तकाचे दिग्दर्शक व संगीतकार श्री.राहुल रानडे यांच्या उपस्थितीत लोकार्पण करण्यात आले असून, संस्थेच्या संकेतस्थळावरुन जनतेस विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात आले आहे. (**https://rmvs.marathi.gov.in/१०**)

**तिसरा टप्पा**- या प्रकल्पाच्या तिसऱ्या टप्प्यात 'तुकाराम गाथा' या ग्रंथाचे श्राव्य पुस्तकात रुपांतर करण्याचे प्रस्तावित आहे. या प्रस्तावित असलेल्या तिसऱ्या टप्प्यासाठी सुप्रसिद्ध संगीतकार श्री. राहुल रानडे, पुणे यांनी शासनास सादर केलेल्या प्राथमिक प्रस्ताव राज्य मराठी विकास संस्थेस प्राप्त झाला आहे. संस्थास्तरावरुन यासंदर्भातील कार्यवाही सुरु आहे.

**(५) तमिळ विद्यापीठ तंजावर मोडी प्रकल्प (तमिळ विद्यापीठ तंजावर येथील मोडी कागदपत्रांचे जतन, संवर्धन (प्रिझर्वेशन व कंझर्वेशन), संगणकीकरण (डिजिटायजेशन) व देवनागरी लिप्यंतर, भाषांतर व सूची करून ते प्रकाशित करणे)** :-

दक्षिण भारतामध्ये तमिळनाडू येथे इसवी सन १६७६ ते १८५५ या कालखंडापर्यंत छत्रपती शिवाजी महाराजांचे सावत्र भाऊ व्यंकोजी राजे भोसले व त्यांच्या वंशजांचे राज्य होते. या कालखंडातले समाज जीवन, इतिहास, त्यांचे शैक्षणिक व सांस्कृतिक धोरण, भाषा, साहित्य, संस्कृती, वैद्यकीय आदी विषयांची सर्व कागदपत्रे मोडी लिपीत उपलब्ध आहेत. त्यामुळे ही ऐतिहासिक माहिती मराठी भाषिकांना, अभ्यासकांना, संशोधकांना, वाचकांना उपलब्ध करणे, हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे.

सदर प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्यात आतापर्यंत एकूण ५,८८,५०० इतक्या मोडी कागदपत्रांचे दोन टप्प्यात अनुक्रमे ३,७६,००० व २,१२,५०० कागदपत्रांचे जतन व संवर्धन करण्यात आले आहे. सदर कागदपत्रे ही जपानी पद्धत वापरुन पुढील १०० ते २०० वर्षे टिकतील, असे जतन व संवर्धन केले आहे. तसेच, या सर्व कागदपत्रांचे संगणकीकरण करण्यात आले आहे. त्यांच्या एकूण १० लक्ष इमेजेस/फ्रेम्स तयार करण्यात आल्या असून, त्या ३४ हार्डडिस्कमध्ये वेगवेगळ्या स्वरुपात साठविण्यात आल्या आहेत. प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात मोडी कागदपत्रांचे विषयानुसार वर्गीकरण व सूचीकरण करण्यात येणार आहे. तर

तिसऱ्या टप्प्यात महत्त्वाच्या कागदपत्रांची निवड करुन, त्यांचे देवनागरी लिप्यांतर व मराठीत भाषांतर करुन ते प्रकाशित करण्यात येणार आहेत.

सन २०२४-२५ मध्ये, प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील पहिल्या भागातील आयुर्मान संपलेल्या हार्डडिस्कमधील डाटाची तपासणी करुन, त्यातील सर्व डाटा हा नवीन SSD मध्ये सुरक्षितपणे स्थांनातरित करण्यात आला आहे. सन २०२५-२६ मध्ये दुसऱ्या टप्प्याच्या कामाला सुरुवात करण्यात येणार आहे.

**(६) अमराठी भाषकांसाठी उपक्रम :- (मायमराठी)**

अमराठी भाषिकांसाठी प्रकाशने या प्रकाल्पांतर्गत अमराठी भाषिकांना मराठी भाषेचे ज्ञान करुन देण्यासाठी पाठ्यपुस्तके, शब्दकोश इ. निर्माण करणे तसेच, इतर प्रकाशने निर्माण करणे अभिप्रेत आहे. तसेच, दैनंदिन व्यवहारात उपयोगी पडेल, असे मराठी भाषेचे शिक्षण देणे अभिप्रेत आहे.

या दृष्टीने मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभागाने हाती घेतलेल्या 'माय मराठी' प्रकल्पाला राज्य मराठी विकास संस्थेने दुसऱ्या स्तराच्या अभ्यासक्रमापासून अर्थसहाय्य केले आहे. या प्रकल्पांतर्गत एकूण ६ स्तरांचा अभ्यासक्रम तयार करण्याचे काम पूर्ण झाले असून, परिचारिकांसाठीचा तसेच, रिक्षा-टॅक्सीचालक यांच्यासाठी लघुअभ्यासक्रम तयार करण्याचे कामही पूर्ण करण्यात आले आहे.

या अभ्यासक्रमांतर्गत पाठ्यपुस्तके, अभ्यासपुस्तके, शब्दसंग्रह आणि संपादित/ निर्मित दृकश्राव्य सामग्री ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आली आहे. या अभ्यासक्रमांची १-६ या स्तरांवरील सामग्री संस्थेच्या संकेतस्थळावर मुक्त (फ्री अँड ओपन सोर्स) परवान्याअंतर्गत उपलब्ध आहे. (**https://rmvs.marathi.gov.in/1628**) दि.२७ फेब्रुवारी, २०२२ रोजी त्याचे लोकार्पण करण्यात आले आहे.

**(७) मराठी दुर्मिळ ग्रंथांचे संगणकीकरण :-**

आजवर प्रकाशित झालेल्या मराठी ग्रंथांपैकी ज्यांच्या स्वामित्व हक्काची मुदत संपली आहे, असे मराठी भाषेतील दुर्मिळ ग्रंथ आणि नियतकालिके यांचे संगणकीकरण करुन, ते महाजालावर लोकांना उपलब्ध करुन देण्यात यावेत, अशी सूचना महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण, २०१० मध्ये करण्यात आली आहे. त्यानुसार मराठी भाषा, संस्कृती, साहित्य आणि समाज जीवन यासंदर्भातील ऐतिहासिक ठेवा जतन करण्याच्या हेतूने, मराठीतील दुर्मिळ पुस्तके आणि नियतकालिके यांचे संगणकीकरण (डिजिटायजेशन) करुन, ते जनतेला उपलब्ध करुन देण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

या प्रकल्पाच्या पहिल्या व दुसऱ्या टप्प्यात जी सामग्री विविध ग्रथांलयांकडून उपलब्ध झाली त्यानुसार, १६२ पुस्तके आणि विविध नियतकालिकांचे मिळून १२८९ अंक ही सामग्री पीडीएफ स्वरुपात संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. (**https://rmvs.marathi.gov.in/books**)

प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाल्यानंतर दुसऱ्या टप्प्याचे काम सुरु करताना राज्य मराठी विकास संस्थेप्रमाणेच अन्य संस्थाही असे संगणकीकरणाचे काम करत असल्याने, कामाची पुनरावृत्ती टाळावी, यासाठी महाराष्ट्रातील विविध शतायू ग्रंथालयांची एक कार्यशाळाही संस्थेने आयोजित केली. त्यात ठरल्याप्रमाणे दुर्मिळ ग्रंथांची माहिती नोंदवण्यासाठी संस्थेच्या संकेतस्थळावर सोय करुन देण्यात आलेली होती.

सार्वजनिक वाचनालय, राजगुरुनगर या ग्रंथालयाने संस्थेच्या आवाहनाला प्रतिसाद दिल्याने २५ दुर्मिळ ग्रंथांच्या

संगणकीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले असून, ही सामग्री विकिकॉमन्सवर शोधसुकर स्वरुपात उपलब्ध करून देण्यात आली असून, संस्थेच्या **https://rmvs.marathi.gov.in/category/grant-books** या संकेतस्थळावरही ग्रंथांच्या प्रती उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

(**https://commons.wikimedia.org/wiki/Category:Books_with_Public_Library,_Rajgurunagar_published_before_1900**)

तसेच, पुढील नियतकालिके व पुस्तकांची सामग्री ह्यांचे संगणकीकरण तसेच महाजालावर उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

१) बापूराव नाईक यांची टायपोग्राफी ऑफ देवनागरी १ ते ३ खंड आणि त्यांच्या संग्रहातील अन्य पुस्तके (यापैकी ५ पुस्तकांचे संगणकीकरण पूर्ण झाले असून, ती संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.)

२) जया दडकर यांच्या निवडक ३ पुस्तकांचे संगणकीकरण करुन, ते संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. (**https://rmvs.marathi.gov.in/3093**)

३) दीपावली (१५१) अंक, भाषा आणि जीवन (१२९) अंक आणि नवभारत (७२९) अंक ह्या नियतकालिकांच्या स्कॅन केलेल्या प्रती महाजालावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.
(**https://archive.org/details/@rajya_marathi_vikas_sanstha**)

४) नवी क्षितिजे (४७ अंक), तपशील (१८ अंक), या अंकांच्या स्कॅन केलेल्या प्रती महाजालावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. (**http://archive.org/details/@rajya_marathi_vikas_sanstha**)

५) महाराष्ट्र साहित्य पत्रिका या नियतकालिकाचे (३७५ अंक) संगणकीकरण करुन, ते महाजालावर उपलब्ध करुन देण्यात आले आहे. (**https://archive.org/details/@rajya_marathi_vikas_sanstha**)

६) युगवाणी या नियतकालिकाचे (३८६ अंक) आणि रुईया महाविद्यालय, माटुंगा, मुंबई येथील ग्रंथालयातील ८६ दुर्मिळ ग्रंथांचे स्कॅनिंग करण्याचे काम पूर्ण झाले असून, त्या अंकांवर संगणकीय प्रक्रिया (पृष्ठ स्वच्छ करणे, अनुक्रमणिका, लेखांना दुवे जोडणे, प्रत्येक पृष्ठावर मुद्रा डकवणे इत्यादी.) करण्याची कार्यवाही करण्यात येत असून, पुढील काळात सदर अंक महाजालावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

७) तसेच, दातेसंग्रह (शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे) या संग्रहातील ९४७ ग्रंथांचे स्कॅनिंग करण्याचे काम सुरु असून, ते अंतिम टप्प्यात आहे. सदर काम बाह्ययंत्रणेद्वारे करुन घेण्यात येत आहे.

तसेच, संस्थेद्वारे येत्या काळात करण्यात येणाऱ्या पुढील सामग्रीच्या संगणकीकरणासही मान्यता देण्यात आली आहे.

१.मालशेसंग्रह (एसएनडीटी विद्यापीठ, चर्चगेट, मुबई)

२.बापूराव नाईक यांचा संग्रह (२२१ ग्रंथ)(श्री. अरुण नाईक, वांद्रे, मुंबई)

३.प्रतिष्ठान हे नियतकालिक (मराठवाडा साहित्य परिषद, संभाजीनगर)

४.गोखले हॉल, शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे येथील १४०० नियतकालिके.

सदर प्रकल्प हा निरंतर चालणारा प्रकल्प असून ग्रंथांच्या उपलब्धतेनुसार संस्थास्तरावर संगणकीकरणाचे काम

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे सुरु असणार आहे.

**(८) प्रा. न. र. फाटक यांच्या साहित्याची वर्णनात्मक सूची :-**

प्रा. नरहर रघुनाथ फाटक हे मराठीतील प्रसिद्ध इतिहास संशोधक, व्यासंगी प्राध्यापक व चिकित्सक पत्रकार, वादपटू संपादक तसेच, चरित्रकार आहेत. तसेच, संगीतापासून खाद्यपदार्थांपर्यंत विविध विषयांवर लिखाण केले आहे. हे लिखाण अनेक वर्तमानपत्रे, नियतकालिके तसेच, दिवाळी अंकांमध्ये विखुरले आहे. या साहित्याचा तसेच, प्रा. न. र. फाटक यांच्याविषयी त्यांच्या हयातीत व निधनानंतर प्रसिद्ध झालेल्या साहित्याची वर्णनात्मक सूची करण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. सूचिकार डॉ. सुषमा पौडवाल यांच्याद्वारे या प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आले असून, सूचीचा पहिला खर्डा पूर्ण प्रकल्प प्रमुखांद्वारे अंतिम करण्यात येत आहे.

**(९) पुस्तकांचे गाव, भिलार :-**

वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी लोकसहभागातून साकारलेला पुस्तकांचे गाव हा नावीन्यपूर्ण प्रकल्प महाबळेश्वर जवळील भिलार या निसर्गरम्य गावी दिनांक ४ मे, २०१७ रोजी कार्यान्वित करण्यात आला. राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध झालेला आणि जगाच्या नकाशावर पोहोचलेला हा अभिनव प्रकल्प आहे. भारतातील पहिले पुस्तकांचे गाव म्हणून भिलार प्रसिद्ध आहे. सदर प्रकल्प म्हणजे शासनाचा पुढाकार आणि गावाचा सहभाग याचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

भिलार हे महाबळेश्वर आणि पाचगणी या थंड हवेच्या सुप्रसिद्ध ठिकाणांजवळचे गाव. धबधबा, घनदाट वनराई, पक्ष्यांचा किलबिलाट, थंड व स्वच्छ हवा आणि नीरव शांतता यांचा अनुभव देणारे निसर्गरम्य भिलार गाव हे स्ट्रॉबेरीच्या उत्पादनासाठीही प्रसिद्ध आहे. तसेच, ग्रामस्थांचा उत्साह, औदार्य आणि आदरातिथ्य यांचीही अनुभूती देणारे गाव, भिलार गावातील घरे, लॉज आणि शाळा, मंदिरे अशी सार्वजनिक ठिकाणे मिळून ३५ जागा निवडण्यात आल्या आहेत. या जागांमध्ये साहित्य प्रकारांनुसार प्रत्येकी सुमारे ८०० ते १००० पुस्तके, अशी सुमारे ३०,००० पुस्तकांचा अद्भुत खजिना वाचण्यासाठी विनामूल्य ठेवण्यात आली आहेत. प्रत्येक घरात, पर्यटकांना पुस्तके व्यवस्थित पाहता येतील, चाळता येतील आणि प्रसंगी आरामात बसून वाचता येतील अशी व्यवस्था आहे. संबंधित घरमालकांनी त्यांच्या घरातील सुमारे १५० चौ. फु. ते ५०० चौ. फु. जागा वाचन सेवेसाठी विनाशुल्क / विनामोबदला उपलब्ध करुन दिली आहे. तसेच, ३ मंदिरांजवळ निवडक ५० मराठी साहित्यिकांची माहिती साहित्यिक प्रदर्शनीद्वारे प्रदर्शित करण्यात आली आहे.

व्यक्तिगत किंवा गटांनी येणाऱ्या पर्यटकांना भाषेची गोडी लागावी आणि मराठी शब्दसंग्रह वाढावा, म्हणून त्यांच्यासमोर भाषिक खेळांचे सादरीकरणही करण्यात येते. दि.४ मे, २०१७ पासून ते आतापर्यंत सुमारे ५-६ लक्ष लोकांनी प्रकल्पास भेट दिली आहे. प्रकल्पास भेट देण्यासाठी रोज सुमारे सरासरी १०० ते १२५ आणि सुट्टीच्या दिवशी सरासरी सुमारे २०० पेक्षा जास्त वाचक-पर्यटक भेट देत असतात.

प्रकल्प कार्यालयात संस्थेची तीन निवडक प्रकाशने व प्रकल्पाचे बोधचिन्ह असलेल्या काही वस्तूंची विक्री करण्यात येते. आतापर्यंत एकूण सुमारे ३० लक्ष रुपयांची विक्री झाली आहे. वाचन संस्कृतीसाठी पूरक, बोधपर असे विविध प्रशिक्षणात्मक कार्यक्रम, कार्यशाळा (शिक्षक, विद्यार्थी, ग्रंथपाल), शब्दजत्रा, वाचन कौशल्य विकास, साहित्यिक परिचय, कविता-गीते, काव्यसंमेलन, वाचनध्यास, पुस्तकजत्रा, सांस्कृतिक परिसंवाद, चर्चासत्रे इत्यादी साहित्यिक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

कविवर्य वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस २७ फेब्रुवारी हा मराठी भाषा गौरव दिनानिमित्त दि.२८ फेब्रुवारी, २०२५ रोजी राज्य मराठी विकास संस्था, पुस्तकांचे गाव भिलार, प्रकल्प कार्यालयाच्या वतीने 'मराठी भाषा : सामाजिक व सांस्कृतिक वैभव' व्याख्याते मा. डॉ. सुरज चौगुले यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. या व्याख्यानाच्या कार्यक्रमास गावातील सहभागी दालन चालक, गावातील पुरुष व महिला मंडळी आणि पंचक्रोशीतील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी इत्यादींनी या व्याख्यानाच्या कार्यक्रमास उपस्थिती नोंदवली.

पुस्तकांचे गाव, भिलार प्रकल्प कार्यालयात १५ ऑक्टोबर, २०२५ रोजी वाचन प्रेरणा दिनानिमित्त विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी या उद्देशाने वाचन संस्कृती व मराठी भाषा अभिजात दर्जा याविषयीचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सदर कार्यक्रमात ५० विद्यार्थ्यांना डॉ. हेमंत कुंभार यांनी मार्गदर्शन केले.

अभिजात मराठी भाषा सन्मान दिनानिमित्त पुस्तकांचे गाव, भिलार प्रकल्पास भेट देणाऱ्या वाचक, पर्यटक व विविध शालेय, महाविद्यालय, सहली तसेच, विविध गटांना मराठी भाषा अभिजात दर्जा विषयी माहिती देण्यात आली. व काही वाचकांकडून अभिवाचन करुन घेण्यात आले. तसेच, दालन चालक महिलांनी अभिवाचन केले.

२७ फेब्रुवारी, २०२६ मराठी भाषा गौरव दिनानिमित्त भिलार येथे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

सन २०२५-२६ मध्ये प्रकल्पांतर्गत राज्य मराठी विकास संस्थेकडून नव्याने ५ दालनांची उभारणी करावयाच्या कामांबाबतचे नियोजन आहे.

दि. १५ ऑक्टोबर, २०२६ मध्ये वाचन प्रेरणा दिनानिमित्त भिलार येथे कार्यक्रम-उपक्रम करण्याचे नियोजन आहे.

**(१०) 'पुस्तकांचे गाव' या योजनेचा विस्तार** :-

'पुस्तकांचे गाव', भिलार या योजनेच्या यशाच्या पार्श्वभूमीवर 'पुस्तकांचे गाव' या योजनेचा महाराष्ट्रात विस्तार करण्याचे महाराष्ट्र शासनाने योजिले आहे. २७ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या मराठी भाषा गौरव दिनी तत्कालीन मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी 'पुस्तकांचे गाव' या योजनेची व्यापकता वाढविण्याच्या दृष्टीने 'पुस्तकांचे गाव' ही संकल्पना प्रत्येक जिल्ह्यात कार्यान्वित व्हायला हवी, अशी उत्साहवर्धक घोषणा केली.

मराठी भाषेचा विकास, प्रचार, प्रसार व वाचनसंस्कृतीची जोपासना व्हावी, यादृष्टीने मराठी भाषेचे संवर्धन करण्यासाठी 'पुस्तकांचे गाव' या योजनेचा विस्तार करण्याच्या अनुषंगाने क्रमांक- पुगाव-२०२०/प्र.क्र.४८/भाषा-३, दिनांक-४ जानेवारी, २०२२ रोजी मराठी भाषा विभागाचा शासन निर्णय पारित करण्यात आला. या शासन निर्णयान्वये, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील एका गावात पुस्तकांचे गाव सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच, क्रमांक- पुगाव-२०२२/प्र.क्र.२३/भाषा-३, दिनांक- २५ मार्च, २०२२ नुसार 'पुस्तकांचे गाव' या योजनेचा विस्तार करण्याबाबतच्या शासननिर्णयात नमूद केल्याप्रमाणे, सहा महसुली विभागात ज्या चार विभागांना मान्यता देण्यात आली आहे, ते विभाग खालीलप्रमाणे आहेत.

१) **औरंगाबाद-वेरुळ**, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद, ग्रामपंचायत वेरुळ, छत्रपती प्रसारक मंडळ वेरुळ.

२) **नागपूर-नवेगाव बांध**, ता.अर्जुनी-मोरगाव, जि.गोंदिया संयुक्त वन व्यवस्थापन समिती, नवेगाव बांध, नवेगाव फाऊंडेशन.

३) **कोकण-पोंभुर्ले**, ता. देवगड, जि. सिंधुदूर्ग माणुसकी फाऊंडेशन पोंभुर्ले- मालपेवाडी.

४) **पुणे-अंकलखोप (औदुंबर)** ग्रामपंचायत अंकलखोप (औदुंबर) ता.पलुस, जि.सांगली.

दिनांक १० मार्च, २०२४ रोजी मा. मंत्री, मराठी भाषा यांच्या हस्ते कोकण विभागातील पोंभुर्ले, ता. देवगड, जि. सिंधुदूर्ग येथे पहिल्या दालनाचे उध्दाटन व लोकार्पण सोहळा पार पडला. उर्वरित ९ दालनांच्या उभारणीसाठी ३ कार्यादेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. नव्याने मालगुंड गणपतीपुळे, जि.रत्नागिरीव अंमळनेर जि.जळगाव या ठिकाणी सुरु करण्यात येत आहे.

**(११) महाराष्ट्रातील मराठीच्या बोलींचे सर्वेक्षण, प्रतिमांकन आणि आलेखन :-**

महाराष्ट्रातील मराठी बोलीभाषा कालांतराने व्यपगत होऊ नयेत, यासाठी त्या भाषांचे संगणकीय जतन, संवर्धन करण्याच्या दृष्टीने त्यांचे प्रतिमांकन (डिजीटायझेशन) करण्याचा प्रकल्प डेक्कन कॉलेज, पुणे या अभिमत विद्यापीठाच्या सहयोगातून पूर्ण करण्यात आला आहे.

दिनाक २७ फेब्रुवारी, २०२१ रोजी तत्कालीन मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री, मराठी भाषा तसेच मा.राज्यमंत्री, मराठी भाषा यांच्या उपस्थितीत सदर प्रकल्पाच्या संकेतस्थळाचे (https://sdml.ac.in/mr) लोकार्पण करण्यात आले असून, सर्वेक्षणाची सामग्री आणि तिचे विश्लेषण मुक्त (फ्री अँड ओपन सोर्स) स्वरुपात संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील मराठीच्या प्रादेशिक भेदांचे सर्वेक्षण आणि त्याद्वारे मराठीच्या बोलींचे सर्वेक्षण, प्रतिमांकन आलेखन करणे, असे या प्रकल्पाचे स्वरुप आहे. प्रकल्पाद्वारे संकलित झालेली माहिती आणि तिचे विश्लेषण मुक्त स्वरुपात संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

प्रकल्पाच्या अहवालाचे मा. मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते मा. मंत्री, मराठी भाषा आणि अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत दि. २७ फेब्रुवारी, २०२४ रोजी मराठी भाषा गौरव दिनी लोकार्पण करण्यात आले आहे.

**(१२) समांतर पाठ्यपुस्तक निर्मितीसाठी अनुदान :-**

सुहृद मंडळ, पुणे या संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावानुसार, कर्णबधिर व अन्य दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी बालभारतीची समांतर पाठ्यपुस्तके तयार करण्यात आली. इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थी मराठी भाषेच्या पुस्तकांच्या छपाईचे काम पूर्ण झाले व महाराष्ट्रातील १७० विशेष (कर्णबधिर) शाळांना प्रत्येक विषयाची समांतर पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले.

**(१३) आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण : शिल्पकार चरित्रकोश प्रकल्प :-**

एकोणिसावे व विसावे शतक हे भारताचे प्रबोधनपर्व मानले जाते. आपली प्राचीन संस्कृती आणि पाश्चात्य देशातून आलेली आधुनिकता यांच्या परस्पर संवादातून आणि समन्वयातून जीवनाच्या विविध क्षेत्रांत मूलभूत परिवर्तन घडले. या सर्व परिवर्तनात महाराष्ट्र कायम अग्रेसर राहिला. ज्या व्यक्तींनी हे परिवर्तन घडवून आणले, त्यांचे स्मरण, त्यांच्या कार्यांची माहिती व त्यांच्या जगण्याच्या प्रेरणा महाराष्ट्रातील नव्या पिढीला माहीत व्हाव्या, या दृष्टीने या प्रकल्पाद्वारे हा परिवर्तनाचा आलेख महाराष्ट्रासमोर ठेवावा, हा प्रमुख उद्देश आहे. महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवाचे औचित्य साधून साप्ताहिक विवेकने हा प्रकल्प हाती घेतला आहे. गेल्या दोनशे वर्षांत आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या व्यक्तींचा परिचय महाराष्ट्राला घडावा, या दृष्टीने या प्रकल्पाची आखणी केली आहे.

या अंतर्गत एकूण १२ खंड प्रकाशित झालेले आहेत. ३५० व्हिडीओ तयार झालेले आहेत. दृकश्राव्या विभागाचे काम चालू आहे. हे काम **https://maharashtranayak.in/** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**(१४) महाराष्ट्रातील मराठी संशोधन संस्था/ मंडळे यांना अर्थसहाय्य करणे :-**

मराठी भाषा व साहित्य वृद्धिंगत होण्यासाठी काम करणाऱ्या महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त मंडळ व संस्थांना रु.५ लक्षच्या मर्यादेत अनुदान उपलब्ध करून दिले जाते. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात एकूण १२ संस्था / मंडळाना करार करुन, अनुदान उपलब्ध करून देण्यात आले आहे. यामधील २ संस्था/मंडळांनी केलेले काम संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहे. उर्वरित प्राप्त संस्था / मंडळांच्या अहवालावर कार्यवाही चालू आहे.

**(१५) दासोपंतकृत गीतार्णवाचा शब्दार्थ-संदर्भ-कोश :-**

नाथपंचकातील एक महत्त्वाचे कवी दासोपंत यांनी लिहिलेली गीताटीका म्हणजेच गीतार्णव हा ग्रंथ होय. या ग्रंथाचे १८ अध्याय असून, त्यामध्ये १,२५,००० ओव्या आहेत. या टीकेचे मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे दासोपंताने आपल्या टीकेत मराठी शब्दांना संस्कृत शब्दांपेक्षा अधिक महत्त्व दिले. ही मराठी भाषेतील एकमेव विस्तृत गीताटीका असून, ती साहित्य गुणांनीही संपन्न आहे. या साहित्यकृतीतील मराठी भाषेचे आणि मराठी साहित्याचे वैभव मराठी भाषिकांना कळावे व अभ्यासकांना त्याचा उपयोग व्हावा, याकरिता 'गीतार्णवाचा शब्दार्थ-संदर्भ-कोश' हा प्रकल्प राज्य मराठी विकास संस्थेने हाती घेण्यात आला होता.

सदर प्रकल्प सन २०२२ साली पूर्ण झाला असून, सदर कोश राज्य मराठी विकास संस्थेच्या संकेतस्थळावर **https://rmvs.marathi.gov.in/60** या दुव्यावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

**(१६) संस्थेचे मध्यवर्ती ग्रंथालय, बदलापूर :-**

मराठीतील वाङ्मयीन ठेव्याची/ ग्रंथसंपदेची व्याप्ती, मराठी भाषेचे विविध आयाम ग्रंथरुपाने दाखविणे, नवीन पिढीवर वाचन-लेखन संस्कार करणे हे संस्थेचे उद्देश असून, त्यासाठी विद्यापीठीय पातळीवर अभ्यास करताना मराठी भाषा, व्याकरण, बोली, लिपी, साहित्य वाङ्मयेतिहास, संस्कृती, समाजशास्त्र इत्यादी आंतरशाखीय अभ्यासाच्या या दिशांनी संशोधन, लेखन, संपादन व्हावे या दृष्टीने हे ग्रंथसंग्रहालय समृद्ध आहे. ह्या संदर्भ-ग्रंथालयाद्वारे अभ्यासकांना सशुल्क सेवा देण्यात येतात.

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त संस्थेचे मध्यवर्ती ग्रंथालय, बदलापूर येथे दि.१४ ते २८ जानेवारी, २०२५ या कालावधीत प्रत्यक्ष व महाजालीय अशा दोन्ही स्वरुपात विविध विषयांवर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले असून, ते राज्य मराठी विकास संस्थेच्या यूट्यूब वाहिनीवर प्रसारित करण्यात आले आहेत.

(https://www.youtube.com/watch?v+gVV_PUeJL-&list=PLvAecHP४nl६MpSLa६५jeCZsuZM९८KlYVl)

तसेच, प्रतिमुद्राधिकार संपलेल्या ग्रंथांचे/ नियतकालिकांच्या अंकांचे संगणकीकरण करणे, विविध कार्यशाळा, चर्चासत्रांचे आयोजन करणे तसेच, विविध उपक्रमांचे आयोजन करणे असे विविध उपक्रम राबवण्यात येतात.

**(१७) वऱ्हाडी बोली प्रकल्प :-**

वऱ्हाडी बोलीतील शब्द, म्हणी व वाक्प्रचार यांचे अर्थ विशद करणारा असा हा कोश असून, त्याचे संपादन प्रा.डॉ. विठ्ठल वाघ यांनी केलेले आहे. वऱ्हाडी बोलीतील शब्दभांडार, वाक्प्रचार व म्हणी यांचा समावेश शक्य त्या प्रमाणात प्रमाण मराठी भाषेत होऊन प्रमाण मराठी भाषेचा परीघ वाढविणे, हे प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे.

सदर प्रकल्प-अंतर्गत दि.२७ फेब्रुवारी, २०२१ (मराठी भाषा दिन) या दिवशी वऱ्हाडी बोली शब्दकोशाचे चार खंड प्रकाशित करण्यात आले. (१) वऱ्हाडी शब्दकोश खंड १ : भाग-१, (२) वऱ्हाडी शब्दकोश खंड २ : भाग-२, (३) वऱ्हाडी वाक्प्रचार : खंड ३ (४) वऱ्हाडी म्हणी: खंड ४, तसेच, दि.१५ ऑगस्ट, २०२३ रोजी सदर खंडांचे पुर्नमुद्रण करण्यात आले.

सदर चारही खंड संस्थेच्या **http://rmvs.marathi.gov.in/**2284 या संकेतस्थळावर वाचकांसाठी विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

**(१८) देवनागरी टंकाविषयी पुस्तक :-**

देवनागरी टंकांविषयीची तांत्रिक जाण वाढावी, यासाठी आवश्यक ती माहिती पुरवणारे पुस्तक संस्थेद्वारे तयार करुन वितरीत करण्यात येणार आहे.

देवनागरीची मुद्रणपरंपरा, त्यामुळे निर्माण होणारी काही वैशिष्ट्ये, देवनागरी अक्षराकारांची रचनावैशिष्ट्ये, देवनागरी टंकांची रचनावैशिष्ट्ये, टंकांचे प्रकार, टंकांचा वापर करताना लक्षात घ्यावयाची तत्वे, टंक वापरणाऱ्यांना सहाय्यभूत ठरतील असे टंकरचनेच्या प्रक्रियेतील काही मुद्दे, टंकांसंदर्भातील विविध अडचणी व त्यांच्या सोडवणुकीचे उपाय, काही समस्या, देवनागरी टंकरचनाकारांची थोडक्यात माहिती इ.मुद्यांचा या पुस्तकात समावेश असणार आहे.

सद्य:स्थितीत पुस्तकाची मुद्रणप्रत अंतिम करण्याच्या दृष्टीने संस्थास्तरावर कार्यवाही चालू आहे. सदर कार्यवाही पूर्ण होण्यास दोन महिन्यांचा कालावधी लागेल. परीक्षण, मांडणी इ. प्रक्रिया पूर्ण झाल्यावर हे पुस्तक संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येईल.

**(१९) पाणिनीच्या अष्टाध्यायी ग्रंथाचा मराठी अनुवाद :-**

अष्टाध्यायी हा पाणिनीकृत संस्कृत व्याकरणावरील प्रसिद्ध ग्रंथ असून, भारतीय भाषाभ्यासाच्या परंपरेतील महत्वाचा ग्रंथ मानला जातो. ह्या ग्रंथामध्ये आठ अध्याय आहेत. प्रत्येक अध्यायामध्ये प्रत्येकी चार पाद, असे मिळून एकूण बत्तीस पाद आहेत. ह्या प्रत्येक पादात सूत्रे आहेत.

अष्टाध्यायी ह्या ग्रंथाची विविध भारतीय आणि परदेशी भाषांत भाषांतरे झालेली आहेत. मात्र या संपूर्ण ग्रंथाचे मराठी भाषांतर अद्याप झालेले नाही. त्यामुळे या ग्रंथाचे सटीप मराठी भाषांतर करण्याचा प्रकल्प संस्थेद्वारे हाती घेण्यात आला आहे.

सदर ग्रंथ तांत्रिक स्वरुपाचा असल्याने तो समजून घेण्यासाठी अनुवादाबरोबर टिपा जोडणे तसेच, दिलेल्या व्याकरणिक प्रक्रिया सविस्तर समजावून देणे आणि महत्त्वाच्या विषयांचे सांकल्पनिक स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. सदर भाषांतराला याही गोष्टींची जोड देण्यात येणार आहे.

पाणिनीच्या अष्टाध्यायी ग्रंथाचा अनुवाद या प्रकल्पाचे काम डॉ. मल्हार कुलकर्णी, भारतीय तंत्रज्ञान संस्था (आय. आय. टी.) पवई, मुंबई यांच्याकडून करण्यात येत असून, जुलै, २०२३ मध्ये राज्य मराठी विकास संस्था, मुंबई आणि डॉ. मल्हार कुलकर्णी, भारतीय तंत्रज्ञान संस्था (आय. आय. टी) पवई, मुंबई यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे.

करारानुसार प्रकल्पकर्त्यांद्वारे प्रकल्पाचे काम सुरु असून, दि.२४.०६.२०२४ रोजी मूल्यमापन-समितीची पहिली बैठक झाली. समिती सदस्यांनी प्रकल्पाचे काम समाधानकारक असल्याचे सांगितले आहे. त्यांनी दिलेल्या सूचनांनुसार प्रकल्पाचे काम सुरु आहे. प्रकल्पाची दुसरी मुल्यमापन बैठक घेण्याचे प्रस्तावित आहे.

**२०) दासोपंतकृत 'गीतार्णव' ची समग्र संहिता संस्थेच्या महाजालावर उपलब्ध करुन देणे :-**

दासोपंत हे १५-१६ व्या शतकातील एकनाथपंचकातील संतकवी, भाष्यकार, तत्त्वचिंतक, वाग्गेयकार म्हणून प्रख्यात आहेत. दासोपंतांची 'गीतार्णव' ही रचना गीताभाष्याच्या संदर्भात महत्वपूर्ण आहे.

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे यापूर्वी दासोपंतरचित गीतार्णव या ग्रंथाचा शब्दार्थ-संदर्भ-कोश तयार करण्याचा प्रकल्प राबवला होता. तथापि, हा शब्दार्थ-संदर्भ-कोश ज्या गीतार्णव या ग्रंथावर आधारित आहे, तो गीतार्णव हा ग्रंथही संपूर्ण स्वरुपात प्रकाशित झालेला नाही. त्यामुळे शब्दार्थ-संदर्भ-कोशाच्या संपादक मंडळाशी चर्चा करुन, गीतार्णवाची संपूर्ण संहिता संपादित करुन, महाजालावर प्रकाशित करण्यासाठी प्रस्ताव प्राप्त करुन घेण्यात आला.

गीतार्णवचे जे अध्याय हस्तलिखित स्वरुपात उपलब्ध आहेत, त्यांचे संहिता वाचन, अर्थपूर्ण आकलन, शब्दशोधन, अक्षरे लावणे, ज्ञानपूर्वक लेखन, ओवी अध्याय यांचे योग्य क्रमवार संकलन व त्यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊन त्याचे पुनर्लेखन करण्यात येईल.

सदर प्रकल्पासाठी गीतार्णवाचे मुद्रित अध्याय तसेच, दासोपंत संशोधन मंडळ, बीड यांच्या हस्तलिखित संग्रहातील अधिकृतपणे मान्य असलेल्या प्रतीची संहिता-निश्चितीसाठी उपयोग करुन घेण्यात येईल. तसेच, अन्य संग्रहात उपलब्ध असलेल्या गीतार्णवाच्या संहितांतीस पाठभेदांचाही नोंद करण्यात येईल.

सदर प्रकल्पासंदर्भात राज्य मराठी विकास संस्था, मुंबई आणि डॉ. विद्यासागर पाटणकर, तसेच, दासोपंत संशोधन मंडळ, अंबाजोगाई, जि. बीड यांच्यात दि. १ ऑगस्ट, २०२४ रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे. करारानुसार प्रकल्पाचे काम सुरु आहे.

सदर प्रकल्पाच्या मूल्यमापन समितीची पहिली बैठक दि.२९.०९.२०२५ रोजी आयोजित करण्यात आली होती. समिती सदस्यांनी प्रकल्पाचे काम समाधानकारक असल्याचे सांगितले आहे.

**२१) अरबी-तुर्की-मराठी व्युत्पत्ती कोश :-**

मराठी भाषेत मोठ्या प्रमाणावर अरबी शब्दांचा, तसेच, काही प्रमाणात तुर्की शब्दांचाही समावेश झालेला असल्याने, राज्य मराठी विकास संस्थेद्वारे अरबी-तुर्की-मराठी व्युत्पत्तिकोश प्रकाशित करावा व त्या कोशाचे काम आपल्याकडे सोपवावे, अशी विनंती डॉ. यू. म. पठाण यांनी संस्थेकडे केली. त्यानुसार प्रस्ताव सादर करण्यात आला.

सदर कोशाचे काम डॉ. यू. म. पठाण यांच्याकडे सोपवले असून, त्यासाठी राज्य मराठी विकास संस्था आणि डॉ. यू. म. पठाण यांच्यात दि. ०३ जून, २०२४ रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे. करारानुसार प्रकल्पकर्त्यांद्वारे प्रकल्पाचे काम सुरु आहे. दि.२५ नोव्हेंबर, २०२४ रोजी प्रकल्पाच्या मूल्यमापन समिती पहिली बैठक झाली. समिती सदस्यांनी प्रकल्पाचे काम समाधानकारक असल्याचे सांगितले आहे. त्यांनी दिलेल्या सूचनांनुसार प्रकल्पाचे काम सुरु आहे.

**२२) भाषावैज्ञानिक दृष्टीकोनातून बोलीअभ्यास (संपादित ई-पुस्तक) :-**

बोली अभ्यासासाठी पायाभूत ठरु शकेल, असे मार्गदर्शक पुस्तक तयार करण्याचा प्रकल्प डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठ, पुणे यांच्याकडे सोपविण्यात आला असून, त्याबाबत राज्य मराठी विकास संस्था, मुंबई आणि डेक्कन कॉलेज, पुणे यांच्यात ०१ ऑक्टोबर, २०२४ रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे.

या पुस्तकात भाषाविज्ञान / बोलीविज्ञान या क्षेत्रांमधील महत्वाच्या संकल्पना, सिद्धांत आणि संशोधनपद्धती यांची ओळख करुन दिली जाणार आहे. हे पुस्तक मराठी विषयातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी तसेच, बोली-संशोधकासाठी उपयुक्त ठरेल. करारानुसार प्रकल्पकर्त्यांद्वारे प्रकल्पाचे काम सुरु आहे. प्रकल्पाची मूल्यमापन समितीची बैठक प्रस्तावित आहे.

**२४) विष्णूभटजी गोडसे लिखित 'माझा प्रवास' ह्या साहित्यकृतीसंदर्भात संकलित केलेली सामग्री संगणकीय स्वरुपात संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेबाबत :-**

विष्णुभटजी गोडसे लिखित 'माझा प्रवास' या पुस्तकाविषयी तसेच, त्यांचे ऐतिहासिक परंपरेचे वरसई गाव इत्यादी विषयांचे दस्तऐवज संगणकीय स्वरुपात विकिपीडियावर उपलब्ध करुन देण्याविषयी गोडसेभटजींचे वारसदार श्री. मुकुंद भालचंद्र गोडसे यांनी दि.१०.०८.२०२२ रोजी राज्य मराठी विकास संस्थेस प्रस्ताव पाठविला होता.

माझा प्रवास हे मराठी पुस्तक, पुस्तकावर अनेक नामवंत लेखकांनी लिहिलेली परीक्षणे, गोडसेभटजींचे जन्मस्थान असलेल्या वरसई गावातील वैजनाथ देवस्थानाच्या उत्सवानिमित्त प्रसिद्ध केलेल्या स्मरणिका, गावाविषयी वेगवेगळ्या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेले सुमारे ३५ ते ४० लेख / बातम्या यांचे संकलन करुन, ते संगणकीय स्वरुपात गोडसे भटजींचे वारसदार श्री. मुकुंद भालचंद्र गोडसे यांनी जतन करुन ठेवले आहे. सदर ग्रंथासंदर्भातील प्रतिमुद्राधिकार मुक्त साहित्य संस्थेच्या संकेतस्थळावर स्वतंत्र दालन निर्माण करुन, उपलब्ध करुन देण्यासंबधी निश्चिती करण्यासाठी मान्यता घेण्यात आली. प्रकल्पासंदर्भात संस्थास्तरावर कार्यवाही चालू आहे.

पुस्तकाची मूळ हस्तलिखिताची प्रत इतिहास संशोधन मंडळाने संस्थेस उपलब्ध करुन दिलेली आहे. सदर प्रत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे.

दि.१५ जुलै, २०२५ रोजी श्री. मुकुंद गोडसे यांचे संस्थेस प्राप्त पत्रानुसार, वेदशाखसंपन्न विष्णूभटजी गोडसे यांचे मूळ गाव आणि निवासस्थान असलेल्या वरसई गावासंबंधी ऐतिहासिक व वर्तमानकालीन माहिती देणारी कागदपत्रे, छायाचित्रे, तसेच, गावातील २२५ वर्षांची परंपरा असलेल्या महाशिवरात्री उत्सवानिमित्त प्रसिद्ध झालेल्या सहा स्मरणिका आणि इतर दस्तऐवज संस्थेचे मध्यवर्ती संदर्भ ग्रंथालय, बदलापूर येथे आहेत. सदर दस्तऐवजांची पडताळणी करुन, संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यासंबंधी कार्यवाही करण्यात येत आहे.

**२४) नवभारत अंकांतील लेखांची महाजालावरील सूची :-**

नवभारत जुन्या मासिक अंकांचे ई-पुस्तक करणे, या प्रकल्पांतर्गत सन ऑक्टोबर, १९४७ ते सप्टेंबर, २०१७ या कालावधीत ई-पुस्तक केलेले नवभारत मासिक अंक https://archive.org या संकेतस्थळावरील संस्थेच्या खात्यावर टप्प्याटप्प्याने उपलब्ध करण्यात येणार असून, त्याचे दुवे संस्थेच्या https://rmvs.marathi.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

तसेच, या नियतकालिकाचे संगणकीकृत अंक महाजालावरुन उपलब्ध करुन देताना, त्यातील लेखांची आणि लेखकांची निर्देशसूची उपलब्ध झाल्यास, अभ्यासकांना त्याचा उपयोग होईल. त्याअनुषंगाने सदर अंकातील लेखांची निर्देशसूची संस्थास्तरावर करण्याचे काम करण्यात येत आहे.

**२५) मराठी दोलामुद्रितांची सूची** :-

दोलामुद्रित म्हणजे मुद्रणाच्या प्रारंभीच्या काळात मुद्रित झालेले दस्तऐवज, मराठीतील ख्यातकीर्त संशोधक अ.का. प्रियोळकर यांनी ही संज्ञा योजिली आणि रुढ केली आहे.

मराठी भाषेसंदर्भात देवनागरी लिपीत प्रथम मुद्रण १८०५ या वर्षी कोलकात्यातील श्रीरामपूर मिशनद्वारे करण्यात आले. त्या वर्षापासून ते १८६७ ह्या वर्षी ग्रंथनोंदणी-अधिनियम (प्रेस रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स ॲक्ट) संमत करण्यात आला. या कालावधीतील प्रकाशित झालेल्या सामुग्रीस दोलामुद्रित म्हणावे, असे प्रा. प्रियोळकर यांनी निश्चित केले. त्याला अनुसरुन आजवर

मराठी दोलामुद्रितांच्या ३ सूची प्रकाशित झालेल्या आहेत. उपलब्ध सामग्री तपासून तसेच, त्यात नवीन सामुग्रीची भर घालून, दोलामुद्रितांची महाजालावरील सूची संस्थास्तरावर तयार करण्यात येत आहे.

सूचीतील २३४६ नोंदींचे संगणकीकरण पूर्ण करुन, सदर नोंदी नव्याने संपादित केल्या. दुबार नोंदी वगळून व अधिकच्या संपादित २६ नोंदी अशा एकूण नोंदी २०१२ आहेत. मराठी दोलामुद्रितांच्या संकेतस्थळावरुन उपलब्ध झालेल्या एकूण १४६ पीडीएफ स्वरुपात उतरवून संकलित केल्या आहेत.

Archive.org तसेच, गुगल ई-बुक या संकेतस्थळावरुन संकलित केलेले दुवे (१२४) प्रत्यक्ष नोंदींना जोडणे, दुव्यावरुन उतरवून घेतलेल्या पीडीएफ प्रतीवरुन नोंदींचे संपादन करुन नोंद अंतिम करण्याचे काम सुरु आहे. दुर्मिळ मराठी ग्रंथांचे संगणकीकरण या प्रकल्पांतर्गत उपलब्ध झालेल्या शासकीय विभागीय ग्रंथालयातील २६७ दोलामुद्रिते संकलित करुन, सूची अद्यायावत करण्याचे काम संस्थास्तरावर करण्यात येणार आहे.

**(२६) मराठी विकिपीडिया कार्यशाळा :-**

'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' निमित्त दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीत दरवर्षी महाराष्ट्रातील निवडक विद्यापीठे आणि महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने मराठी विकिपीडिया परिचयात्मक कार्यशाळांचे आयोजन करण्यात येते.

सन २०२६-२७ मध्ये मराठी विकिपीडिया कार्यशाळेचे आयोजन करण्याचे प्रस्तावित आहे.

**(२७) बृहन्महाराष्ट्रातील मंडळांना संमेलनासाठी अनुदान :-**

अन्य राज्यात असलेल्या मराठी भाषिकांसाठी विविध भाषिक उपक्रम करण्याची तरतूद राज्य मराठी विकास संस्थेच्या घटनेत आहे. यानुसार मराठी भाषेचा प्रचार-प्रसार करण्यासाठी बृहन्महाराष्ट्रातील मंडळांच्या साहित्य संमेलनास अनुदान सहाय्य देण्यात येत आहे. मराठी भाषा विभाग, क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१०२/भाषा-३, दि.२३ फेब्रुवारी, २०२३ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये यासंदर्भातील कार्यवाही करण्यात येते.

अ) **पहिले संमेलन :-** मराठी भाषा विभागाकडून दि.२३ फेब्रुवारी, २०२३ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली तर्फे दि.२४ ते २६ फेब्रुवारी, २०२३ या दरम्यान इंदोर येथे संपन्न झालेल्या ७१ व्या वार्षिक अधिवेशनात या संस्थेला रु.२५.०० लक्ष इतके अनुदान सहाय्य संस्थेच्या विहित कार्यपद्धतीच्या अधीन राहून दि.२४.०२.२०२३ रोजी एनईफटीद्वारे वितरित केले आहे.

आ) **दुसरे संमेलन :-** मराठी भाषा विभाग क्रमांक-संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१०२/भाषा-३ दि.२३ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली या मंडळाचे दि.२४ व २५ फेब्रुवारी, २०२४ या दोन दिवसीय गोवा, पणजी येथे संपन्न झालेल्या बृहन्महाराष्ट्र साहित्य संमेलनाकरिता रु.२५.०० लक्ष इतके अनुदान सहाय्य बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली यांना करण्यात आले आहे.

इ) **तिसरे संमेलन :-** मराठी भाषा विभाग क्रमांक-संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१०२/भाषा-३ दि.२३ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली या मंडळाचे दि.१० व ११ जानेवारी, २०२५ या दोन दिवसीय रायपूर, छत्तीसगड येथे संपन्न झालेल्या बृहन्महाराष्ट्र साहित्य संमेलनाकरिता रु.२५.०० लक्ष इतके अनुदान सहाय्याची रक्कम दि.१९.०९.२०२५ रोजी वितरित करण्यात आली आहे.

ई) **चौथे संमेलन :-** मराठी भाषा विभाग क्रमांक-संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१०२/भाषा-३ दि.२३ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली या मंडळाचे दि.१५ व १६ नोव्हेंबर, २०२५ रोजी ग्वाल्हेर येथे होणाऱ्या चौथ्या संमेनासाठी बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली या मंडळाला रु.२५.०० लक्ष इतके अनुदान सहाय्याची रक्कम दि.१९.०९.२०२५ रोजी वितरित करण्यात आली आहे.

उ) **कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी :-** मराठी भाषा विभागाच्या क्रमांक-संकीर्ण-२०२३/प्र.क्र.१४२/भाषा-३, दि.२८.११.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये, कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी या मंडळामार्फत मॉरिशस येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाच्या प्रवास खर्चासाठी एकूण रु.१.५० कोटी अनुदानापैकी रु.१.०० कोटी अनुदान दि.३०.११.२०२३ रोजी तर उर्वरित रक्कम रु.४७,४२,५१५/- दिनांक ३१ जानेवारी, २०२४ रोजी एनईएफटीद्वारे वितरित करण्यात आली आहे.

**(२८) उत्तम संदर्भसाधनांच्या निर्मितीसाठी अनुदान :-**

अशा प्रकारचे निर्मिती अनुदान सहाय्य केल्याने वेगळ्या विषयाच्या पुस्तकाची माहिती/ओळख वाचकांना होऊन उत्तमोत्तम पुस्तक/ग्रंथ निर्मिती होऊन मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृध्दिंगत होण्यास मदत होते.

दि.१४ जुलै, २०१७ रोजी प्रकल्प-वित्त-समितीची मान्यता दि.१७ जुलै, २०१७ रोजी झालेल्या कार्यकारी समितीने निश्चित केलेल्या धोरणानुसार, पुस्तकांच्या मुद्रणास एकूण निर्मिती खर्चाच्या ३५ टक्के इतके अनुदान सहाय्य करण्याचे निदेश देण्यात आले आहेत. यानुसार सन २०१७ मध्ये प्राप्त झालेल्या प्रस्तावास संस्थेच्या विहित कार्यपद्धतीच्या मान्यतेअंती श्री.काशीनाथ मढवी यांच्या 'सिंधू संस्कृतीच्या लिपीचे वाचन व अध्ययन' या पुस्तकाला रु.१७,०००/- इतके मुद्रण अनुदान सहाय्य करण्यात आले आहे. तर सन २०२० मध्ये 'सिंधुदुर्गातीली पंडित पब्लिकेशन्सचे सिंधुदुर्गातील रानभाज्या' या पुस्तकाला रु. ३५,०००/- इतके अनुदान सहाय्य करण्यात आले आहे.

सदर योजना मर्यादित स्वरुपात राहू नये, यासाठी वृत्तपत्रांमधून जाहिरात प्रसिद्ध करण्यासाठी, तयार तयार करण्यात आलेले आवाहन तसेच, अटी-शर्तीच्या प्रारुपाला दि. २६.०६.२०२३ रोजी झालेल्या बैठकीत प्रकल्प-वित्त समितीने आणि दि.१२.०२.२०२४ रोजी झालेल्या बैठकीत कार्यकारी समितीने त्यास मान्यता दिली आहे. यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

**(३०) ग्रंथभेट उपक्रम :-**

मा. मंत्री (मराठी भाषा) यांनी दिलेल्या आदेशानुसार, जिल्हाधिकारी/आयुक्त यांना संस्थेची निवडक ५ प्रकाशने भेट स्वरुपात पाठविण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. अंदाजित रक्कम रु.१.५० लक्ष इतक्या खर्चास मान्यता दि.२६.०६.२०२३ रोजी झालेल्या बैठकीत प्रकल्प-वित्त समितीने आणि दि. १२.०२.२०२४ रोजी झालेल्या बैठकीत कार्यकारी समितीने त्यास मान्यता दिली आहे.

त्यानुसार संस्थेची पुढील प्रकाशने भेट म्हणून पाठविण्यात आली.

अ) दलित-ग्रामीण साहित्य शब्दकोश - पहिला खंड.

आ) दलित-ग्रामीण साहित्य शब्दकोश - दुसरा खंड.

इ) दलित-ग्रामीण साहित्य शब्दकोश - तिसरा खंड.

ई) विज्ञान संकल्पना कोश.

उ) यंत्रालयाचा ज्ञानकोश.

या निवडक ५ पुस्तकांचा संच जिल्हाधिकारी / आयुक्त यांना पाठविण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली.

**(३०) मराठीचा प्रचार-प्रसार करण्यासाठी आंतरराष्ट्रीय मराठी मंच :-**

अमराठी समाजगटांना मराठी भाषा व संस्कृतीबद्दल आस्था व रुची निर्माण व्हावी म्हणून विविध साधने विकसित करणे, अन्य राज्यांत व परदेशांत असलेल्या मराठी भाषिकांसाठी विविध भाषिक उपक्रम करणे, परदेशात मराठी भाषेचा प्रचार-प्रसार व संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती संस्था यांच्या कार्याची शासनस्तरावर दखल घेण्यासाठी आणि त्यांच्यात समन्वय निर्माण करण्यासाठी शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१८/भाषा-२, दि.०७.०३.२०२२ अन्वये मराठी भाषा विभागाकडून (राज्य मराठी विकास संस्था) 'आंतरराष्ट्रीय मराठी मंच' याची स्थापना करण्यात आली आहे. या मंचात विविध देशात मराठीसाठी कार्यरत असलेले श्री. ज्ञानेश्वर मुळे यांची मुख्य समन्वयक व १७ उपसमन्वयक अशी जगभरात कार्य करण्यासाठी नेमणूक करण्यात आली आहे. या 'आंतरराष्ट्रीय मराठी मंच' यासाठी आजवर केलेले उपक्रम पुढीलप्रमाणे-

**अ) अमेरिकेतल्या कॅलिफोर्निया येथे राज्य मराठी विकास संस्थेने प्रकाशित केलेल्या निवडक प्रकाशने भेट स्वरुपात पाठविणे :-**

जागतिक मराठी मंचाचे समन्वयक श्री. अभिषेक सुर्यवंशी यांनी प्राप्त ई-टपालात नमूद केल्याप्रमाणे अमेरिकेतल्या कॅलिफोर्नियामधील काही मराठी भाषिक लॉस एंजेलिसमध्ये ज्या मराठी शाळा चालविल्या जातात, त्या शाळांच्या वाचनालयासाठी संस्थेच्या प्रकाशनांपैकी निवडक १० प्रकाशने भारतीय टपालाद्वारे पाठविण्यात आली.

**आ) 'मराठीचा झेंडा अटकेपार' आभासी पद्धतीच्या कार्यक्रमाचे आयोजन :-**

परदेशस्थ मराठी भाषिकांच्या मराठी भाषा विषयक कार्याचा परिचय सर्वांना व्हावा, त्यांनी तिथे चालवलेल्या मराठी भाषेतील नियतकालिकांची माहिती व्हावी तसेच, तिथल्या ग्रंथालयांची माहिती, तिथली पुस्तके इ. माहिती सर्व मराठी भाषिकांपर्यंत पोहोचविणे आवश्यक वाटते. याच अनुषंगाने शासनाने निर्गमित केलेल्या आंतरराष्ट्रीय मराठी मंच याचे उद्देश डोळ्यासमोर ठेवून, दि.२२.०६.२०२४ ते २६.१०.२०२४ यादरम्यान एकूण १८ दृकश्राव्य भागात व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे "मराठीचा झेंडा अटकेपार" हा उपक्रम मिती क्रिएशन संस्थेमार्फत आभासी पद्धतीने राबविण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रत्येक भागात श्री. ज्ञानेश्वर मुळे, आंतरराष्ट्रीय मराठी मंचाचे मुख्य समन्वयक, आंतरराष्ट्रीय मराठी मंचाचा एक उपसमन्वयक आणि एक ज्येष्ठ साहित्यिक यांना निमंत्रित करुन यांच्यात सुसंवाद साधला आहे. या १८ भागांच्या कार्यक्रमाचा एकत्रित दुवा संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिला आहे. यासाठी झालेला खर्च रु.२.३४ लक्ष इतका आहे.

**इ) 'अभिजात मराठी कार्यशाळा/चर्चासत्रे' आभासी पद्धतीच्या कार्यक्रमाचे आयोजन :-**

त्या त्या देशात मराठी भाषेविषयक समन्वयक/उपसमन्वयकांमार्फत करण्यात येत असलेल्या कार्याचा आढावा घेण्यासाठी दि.१७ फेब्रुवारी ते १० मार्च २०२५ या कालावधीत 'अभिजात मराठी कार्यशाळा/चर्चासत्रे' या आभासी पद्धतीच्या कार्यक्रमाचे आयोजन 'कलाविष्कार' या संस्थेकडून करण्यात आले. यासाठी झालेला खर्च रु.१.८० लक्ष.

**ई) विश्व मराठी संमेलनानिमित्त सर्व समन्वयक/उपसमन्वयकांना ओळखपत्रे प्रदान करणे :-**

सन २०२३, २०२४ आणि २०२५ मध्ये मराठी भाषा विभागामार्फत विश्व मराठी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या विश्व मराठी संमेलनाच्या निमित्ताने परदेशातील मराठी भाषिक आणि मराठी भाषेसाठी काम करणाऱ्या संस्थांना राज्य मराठी विकास संस्थेच्या माध्यमातून एका छत्राखाली आणून परस्पर समन्वयातून त्यांच्या उपक्रमांना

शासनस्तरावर व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यात आले होते. आंतरराष्ट्रीय मराठी मंचाचे समन्वयक/उपसमन्वयक या संमेलनाला उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणाऱ्या इतर व्यक्ती व उपमंडळे या विश्व मराठी संमेलनास उपस्थित राहून, ते करीत असलेल्या उपक्रमांची, योजनांची माहिती देणे यासोबतच, भविष्यात जगभरात माय मराठीचा जास्तीत जास्त प्रचार-प्रसार व संवर्धन होणेबाबत विचारमंथन विविध कार्यक्रम व चर्चाद्वारे या व्यासपीठावरुन झाले होते. सदर संमेलनात राज्य मराठी विकास संस्थेकडून या सर्व समन्वयक/उपसमन्वयकांना ओळखपत्रे देण्यात आली होती.

**उ) टोकिओ, जपान येथे 'अभिजात मराठी - अभियान मराठी' या कार्यक्रमाचे आयोजन :-**

दि.३ ऑक्टोबर, २०२४ रोजी भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाने मराठी भाषेला अभिजात मराठी भाषेचा दर्जा प्रदान केला आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र शासनाद्वारे दि.३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस व दि.३ ते ९ ऑक्टोबर हा अभिजात मराठी भाषा सप्ताह म्हणून साजरा करण्याचे घोषित करण्यात आले आहे.

याचे औचित्य साधून, डॉ. उदय सामंत, मा. मंत्री, उद्योग व मराठी भाषा यांनी दिलेल्या निदेशानुसार, या आंतरराष्ट्रीय मराठी मंचाच्या प्रकल्पांतर्गत दि. १९ ते २४ सप्टेंबर, २०२५ या कालावधीत टोकिओ, जपान येथे 'अभिजात मराठी - अभियान मराठी' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी डॉ. किरण कुलकर्णी, मा. सचिव, मराठी भाषा विभाग, डॉ. शामकांत देवरे, सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ तथा संचालक (अ.का.) राज्य मराठी विकास संस्था आणि श्री. सचिन सानप, मा. मंत्री, मराठी भाषा यांचे विशेष कार्य अधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे टोकिओ येथील टोकिओ मराठी मंडळाद्वारे तयार करण्यात आलेल्या 'अभिव्यक्त' या अंकाचे प्रकाशन मा. मंत्री, मराठी भाषा आणि मा. सचिव, मराठी भाषा विभाग यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी रु.३५.०० लक्ष इतक्या खर्चास मंजुरी देण्यात आली आहे.

**ऊ) टोकिओ, जपान येथे दि.१३ ऑक्टोबर, २०२५ रोजी झालेला कार्यक्रम :-**

याच कार्यक्रमाच्या अंतर्गत दि.१३ ऑक्टोबर, २०२५ रोजी टोकिओ, जपान येथील इंडिया इंटरनॅशनल स्कूल इन जपान येथे राज्य मराठी विकास संस्था आणि आंतरराष्ट्रीय मराठी मंच, जपान आयोजित अभिजात मराठी अभियान मराठी या अंतर्गत 'महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे सादरीकरण' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी एकूण रु.११.८० लक्ष इतक्या खर्चास मान्यता.

**ऋ) संकेतस्थळ व पोर्टल :-**

आंतरराष्ट्रीय मंचाची स्थापना दि.७ मार्च, २०२२ रोजी झाली आहे. आता आंतरराष्ट्रीय स्तरावर अर्थात जगभरात माय मराठीच्या प्रचार-प्रसार, जतन, संवर्धनाचे कार्य १७ देशांमध्ये सुरु आहे. यापुढे हे कार्य ५० ते ७५ देशांपर्यंत नेण्याचा मानस मा. मंत्री, मराठी भाषा, मराठी भाषा विभाग व राज्य मराठी विकास संस्था यांचा आहे. सद्य:स्थितीत आंतरराष्ट्रीय मंचाचे ध्येय, उद्दिष्ट व कार्यप्रणाली तयार करण्याचे काम मंचाच्या स्तरावर सुरु आहे. या माध्यमातूनच आंतरराष्ट्रीय मंचाची माहिती जगभरात व्हावी, यासाठी इलेक्ट्रॉनिक्स माध्यमे, संकेतस्थळे व निरनिराळी पोर्टल यांचाही उपयोग करण्यात येणार आहे.

**ऌ) ५० ते ७५ देशांपर्यंत विस्तारित करणे :-**

मा. मंत्री, मराठी भाषा यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचना तसेच, मा. सचिव, मराठी भाषा विभाग यांच्या दालनात दि.१६ ऑक्टोबर, २०२५ रोजी झालेल्या आढावा बैठकीत सदर प्रकल्पाची व्याप्ती तूर्तास ५० ते ७५ देशांपर्यंत विस्तारित

करण्याचे निदेश दिले आहेत. या दिलेल्या निदेशानुसार, 'आंतरराष्ट्रीय मराठी मंच' याची व्याप्ती तूर्तास ५० देशांपर्यंत विस्तारित करण्याचा राज्य मराठी विकास संस्थेचे नियोजन आहे. या अनुषंगाने संस्थास्तरावरुन पुढील कार्यवाही सुरु आहे. **(https://rmvs.marathi.gov.in/३४०९)**

**(३१) मराठी भाषा युवक मंडळे निर्माण करणे** :-

मराठी भाषा विभागाने दि.१३.०७.२०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या अन्वये राज्यात व राज्याबाहेर परंतु, देशांतर्गत मराठी भाषा युवक मंडळे स्थापन करुन, त्यांच्या मार्फत त्यांच्या क्षेत्रात मराठीचा प्रचार-प्रसार करण्यासाठी शासनाने ही योजना जाहीर केली आहे. या उपक्रमाची माहिती जास्तीत जास्त मंडळांपर्यंत पोहोचावी, यासाठी महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळ आणि राज्य मराठी विकास संस्थेच्या संकेतस्थळावर या उपक्रमासाठी तयार करण्यात आलेल्या गुगल अर्जाचा दुवा उपलब्ध करुन देण्यात आला होता. सदर गुगल अर्जाद्वारे दि. ०१ मार्च ते १५ मार्च, २०२४ या कालावधीत अर्ज भरण्याचे आवाहन करण्यात आले होते. यानुसार एकूण ३६ अर्ज गुगल अर्जाद्वारे प्राप्त झाले आहेत. या अर्जांची छाननी करुन, कागदपत्रांची पूर्तता केलेल्या अशा २३ मंडळांना रु.१०,०००/- इतक्या अनुदान सहाय्यापैकी पहिला टप्पा वितरित करण्यात आला आहे. तर पूर्तता केलेल्या अशा ५ मंडळांना दुसऱ्या टप्प्यातील अनुदान सहाय्याची रक्कम वितरित करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे.

सन २०२५-२६ या वर्षासाठी वृत्तपत्रांमधून जाहिरात प्रसिद्ध करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

**(३२) कवितांच गाव**:-

कविवर्य मंगेश पाडगांवकर यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून दि.१० मार्च, २०२४ रोजी उभादांडा, ता. वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग येथे पहिल्या दालनाचा लोकार्पण सोहळा मा. मंत्री, मराठी भाषा यांच्या हस्ते संपन्न झाला.

कवी कुसुमाग्रज उर्फ वि.वा.शिरवाडकर यांच्या मूळगावी म्हणजेच शिरवाडे-वणी, ता. निफाड, जि. नाशिक येथे दि.२७ फेब्रुवारी, २०२५ रोजी एका दालनाचा लोकार्पण सोहळा मा. मंत्री, मराठी भाषा यांच्या हस्ते संपन्न झाला.

कवितांच गाव या उपक्रमांतर्गत दालनांची निर्मिती करावयाच्या अनुषंगाने उभादांडा आणि शिरवाडे या गावात प्रत्येकी १० दालने कार्यान्वित करावयाची असून, राज्य मराठी विकास संस्थेकडून उभारणी करावयाच्या कामांबाबतचे कार्यादेश निर्गमित करण्यात आले आहेत. प्रती दालन अंदाजे ७०० ते १००० कवितासंग्रह ठेवण्याचे नियोजन आहे.

**(३३) अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस आणि सप्ताह :-**

दि.३ ऑक्टोबर हा दिवस 'अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस' आणि दि.३ ते ९ ऑक्टोबर हा कालावधी 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' प्रतिवर्षी साजरा करण्याचा शासन निर्णय, क्र.२०२४/प्र.क्र.८६/भाषा-१, दि.१४.१०.२०२४ अन्वये मराठी भाषा विभागाद्वारे प्रसृत करण्यात आला आहे.

दि.३ ऑक्टोबर, २०२५ रोजी रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी येथे मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच, मा. मंत्री, मराठी भाषा आणि इतर मान्यवर यांच्या उपस्थितीत अभिजात मराठी भाषा सन्मान दिनाचे आयोजन करण्यात आले आहे.

अभिजात मराठी भाषा सप्ताहामध्ये दि.४ ऑक्टोबर, २०२५ रोजी 'ऑनलाईन मराठी : दशा आणि दिशा' या विषयांवर मुंबई येथे परिसंवाद आयोजित करण्यात आला.

दि.३ ऑक्टोबर, २०२५ ते ९ ऑक्टोबर, २०२५ या अभिजात मराठी सप्ताहामध्ये ३ ऑक्टोबर-मराठीला अभिजात मराठी भाषेचा दर्जा कसा मिळाला, त्याची एकूण प्रक्रिया कशी होती आणि अभिजात भाषा सप्ताहामागची भूमिका, ४ ऑक्टोबर-मराठी

भाषेची उत्पत्ती आणि अभिजातता, ५ ऑक्टोबर-मराठी भाषेतील म्हणी, वाक्प्रचार आणि भाषेचे व्याकरण, ६ ऑक्टोबर-मराठी भाषेतील वृत्त आणि त्याचं सौंदर्य, ७ ऑक्टोबर-बोलीभाषा आणि प्रमाणभाषा, ८ ऑक्टोबर-मराठी ही अर्थार्जनाची भाषा, ९ ऑक्टोबर-नव्या पिढीची मराठी भाषा विषयांत तज्ज्ञता असलेल्या मान्यवरांसोबत महाजालीय पद्धतीने परिसंवादाचे आयोजन करण्यात येऊन, ते मराठी विकास संस्थेच्या यूट्यूब वाहिनीवर प्रसारित करण्यात आले.

दि.६ ऑक्टोबर, २०२५ ते ८ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीत मराठी भाषा विद्यापीठ, अमरावती येथे ११ भारतीय अभिजात भाषा परिषदेचे आयोजन करण्यात आले.

दि.७ ऑक्टोबर, २०२५ रोजी गडकरी रंगायतन, ठाणे येथे मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच, मा. मंत्री, मराठी भाषा आणि इतर मान्यवर यांच्या उपस्थितीत अभिजात मराठी भाषा गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

**(३४) संकीर्ण** :-

मा. अध्यक्ष, कार्यकारी समिती, राज्य मराठी विकास संस्था आणि मराठी भाषा विभाग यांच्या निदेशानुसार खालील उपक्रम राज्य मराठी विकास संस्थेद्वारे राबविण्यात आले आहेत.

**१. लोकसत्ता या वृत्त समूहाद्वारे 'महाराष्ट्राचे मानकरी' या कार्यक्रमाच्या सहप्रायोजकत्व संदर्भात :-**

लोकसत्ता या वृत्तसमूहाद्वारे 'महाराष्ट्राचे मानकरी' ही वार्षिक पत्रिका महाराष्ट्रातील प्रतिष्ठित व्यक्तींना सन्मानित करण्यासाठी आणि त्यांच्या प्रेरणादायी प्रवासाची ओळख करुन देण्यासाठी प्रकाशित करण्यात येते. सन २०२५ मध्ये बाळकृष्ण भगवंत बोरकर (बा. भ. बोरकर) यांच्या ११५ व्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून, मराठी आणि कोकणी साहित्यात दिलेल्या योगदानाचे, स्वातंत्र्य चळवळीतील त्यांच्या भूमिकेचे आणि गोव्याच्या समृद्ध सांस्कृतिक वारसा असलेल्या नातेसंबंधाचे गौरव करणारे असा अंक प्रकाशित करण्यासाठी राज्य मराठी विकास संस्थेने सहप्रायोजकत्व स्वीकारावे, यासाठी संस्थेस प्रस्ताव प्राप्त झाला. सदर अंकाच्या अनावरणाचा कार्यक्रम पुढील दोन ठिकाणी आयोजित करण्यात आला होता.

अ) २५ जून, २०२५- टिळक स्मारक मंदिर, सदाशिव पेठ, पुणे.

आ) २७ जून, २०२५- स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, शिवाजी पार्क, दादर, मुंबई.

लोकसत्ता प्रस्तुत 'बाबीबाब' या विशेषांकाकरिता सहप्रायोजकत्व राज्य मराठी विकास संस्थेद्वारे स्विकारण्यात आले. सहप्रायोजकत्वाकरिता रु.३.०० लक्ष इतके अनुदान लोकसत्ता यांना देण्यात आले.

**२. समष्टी आर्ट अँड लिटरेचर फेस्टीवल-२०२५ साठी आर्थिक सहकार्याबाबत :-**

आर्ट अँड लिटरेचर फेस्टीवल या कार्यक्रमात देशभरातील साहित्यिक, विचारवंत, युवा लेखक आणि विविध सामाजिक स्तरावरील कलाकार एकत्र येऊन मराठी भाषा आणि साहित्याची उंची वाढविण्याचा प्रयत्न करणार आहेत. हा फेस्टीवल केवळ एक साहित्यिक सोहळा नसून, तो बहुजनांचे विचार, संवेदना आणि लढ्यांचा एक प्रबुद्ध व्यासपीठ ठरणारा आहे. मराठीच्या वटवृक्षाला वाढविण्यास अनेक साहित्यिक, विचारवंत आणि संस्कृतीकर्मींचे योगदान अमूल्य आहे. अशाच महान साहित्यिकांपैकी एक ज्यांनी मराठी भाषेला नवा आयाम दिला, ते म्हणजे पद्मश्री नामदेव ढसाळ. त्यांच्या कार्याचा गौरव करण्याच्या संधीसह सामाजिक न्याय, बहुजन साहित्य आणि कला यांचा महोत्सव म्हणून समष्टी आर्ट अँड फेस्टीवल, २०२५ चे आयोजन करण्यात येत असून, या कार्यक्रमासाठी आर्थिक पाठबळ देण्याची विनंती मा. मंत्री, मराठी भाषा यांना समष्टी फाऊंडेशन यांच्याद्वारे करण्यात आली होती.

समष्टी फाऊंडेशन यांना समष्टी आर्ट अँड फेस्टीवल, २०२५ च्या कार्यक्रमास रु.२.५० लक्ष अर्थसहाय्य करण्यात आले.

**३. श्री संत ज्ञानेश्वरी माऊली व श्री संत तुकाराम महाराज पालखी वारी सोहळा २०२५ :-**

दि. १८ जून, २०२५ ते ९ जुलै, २०२५ या कालखंडात श्री संत ज्ञानेश्वर माऊली व श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या देहू आणि आळंदी येथून पंढरपूरला येतात. या वारीत लाखो वारकऱ्यांचा सहभाग असतो. या वारीत प्रत्येकी एका एल. ई. डी. व्हॅनद्वारे मराठी भाषा विभागाचे कार्य, विविध जनहित योजना मराठी, भाषेचा प्रचार-प्रसार इत्यादींची प्रसिद्धी विविध चित्रफितीच्या माध्यमांतून करण्यात आली. त्याकरिता रु.३७,३८,२४०/- इतका खर्च आला.

**४. पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या 'अभिजात मराठी भाषेसाठी पत्रकारितेचे योगदान' या स्मरणिकेसाठी अर्थसहाय्य :-**

पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या 'अभिजात मराठी भाषेसाठी पत्रकारितेचे योगदान' या स्मरणिकेसाठी अर्थसहाय्य मिळण्याबाबतचा प्रस्ताव मा. मंत्री, मराठी भाषा यांना पुणे श्रमिक पत्रकार संघाद्वारे पाठविण्यात आला होता. त्यानुसार सदर स्मरणिकेसाठी रु. १.०० लक्ष इतक्या मर्यादेत अर्थसहाय्य राज्य मराठी विकास संस्थेद्वारे करण्यात आले.

**५. थायलंड येथे दि.९ आणि १० नोव्हेंबर, २०२३ दरम्यान झालेल्या मराठी भाषिक परिषदेत भाग घेण्यासाठी श्री. सुमेध चव्हाण यांना थायलंड येथे जाण्यासाठी प्रवासापोटी करण्यात आलेले अर्थसहाय्य :-**

शासन पत्र क्र.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.११६/भाषा-३, दि.१७.१०.२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये मा. मंत्री महोदयांनी दिलेल्या सूचनेनुसार श्री. सुमेध चव्हाण यांना थायलंड येथे जाण्यासाठी प्रवासापोटी रु.३०,०००/- इतकी अर्थसहाय्याची रक्कम दि.२५.१०.२०२३ रोजी एनईएफटीद्वारे वितरित करण्यात आली आहे.

**६. पंडित पब्लिकेशन्सचे मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. वामन पंडित यांनी आयोजन केलेल्या जीए कुलकर्णींच्या 'शताब्दी संस्मरण' या अभिवाचन कार्यक्रमासाठी अर्थसहाय्य :-**

जीए कुलकर्णींच्या 'शताब्दी संस्मरण' निमित्ताने दि.११ जुलै ते ११ डिसेंबर, २०२३ दरम्यान निलायम दब्लू बॉक्स, हळवल, कणकवली येथे अभिवाचन कार्यक्रमाच्या आयोजनासाठी रु.३०,०००/- इतकी अर्थसहाय्याची रक्कम दि.४.४.२०२४ रोजी एनईएफटीद्वारे वितरित करण्यात आली आहे.

**७. 'ग्रंथाली' या प्रकाशन संस्थेच्या 'ग्लोबल लेखिका' आणि 'तीन साहित्यिकांच्या जन्मशताब्दी' या दोन्ही कार्यक्रमांसाठी अर्थसहाय्य :-**

'ग्रंथाली' या प्रकाशन संस्थेमार्फत दि.२५.१.२०२५ रोजी एनसीपीए लिटिल थिएटरमध्ये झालेल्या 'ग्लोबल लेखिका' आणि दि.२७ फेब्रुवारी ते १ मार्च, २०२५ या कालावधीत विलेपार्ले येथील दीनानाथ नाट्यगृहात जयवंत दळवी, विद्याधर पुंडलीक, गंगाधर गाडगीळ या साहित्यिकांच्या जन्मशताब्दीनिमित्त झालेल्या या दोन्ही कार्यक्रमासाठी रु.७.५० लक्ष इतकी अर्थसहाय्याची रक्कम व्ही.पी.डी.ए. प्रणालीद्वारे दि.२५.०२.२०२५ रोजी वितरित करण्यात आली आहे.

**८. वारकरी साहित्य परिषद, सांगली या परिषदेमार्फत शिर्डी येथे संपन्न झालेल्या १३ वे अखिल भारतीय मराठी संत साहित्य संमेलनास अर्थसहाय्य :-**

वारकरी साहित्य परिषद संस्थेचे दि.२२ व २३ मार्च, २०२५ या कालावधीत शिर्डी येथे संपन्न झालेल्या १३ व्या अखिल भारतीय मराठी संत साहित्य संमेलनास रु.२५.०० लक्ष इतके अनुदान सहाय्य दि.२८.४.२०२५ रोजी व्हि.पी.डी.ए. प्रणालीद्वारे

वितरित करण्यात आले आहे.

**९. कोकण भूमी प्रतिष्ठान, मुंबई या संस्थेच्या ग्लोबल कोकण महोत्सव २०२५ या आंतरराष्ट्रीय महोत्सवासाठी अर्थसहाय्य :-**

कोकणी भूमी प्रतिष्ठान, मुंबई या संस्थेमार्फत दि.६ ते ९ मार्च, २०२५ या दरम्यान नेस्को कॉम्प्लेक्स, मुंबई एक्झिबिशन सेंटर, गोरेगाव, मुंबई येथे आयोजित केलेल्या 'ग्लोबल कोकण महोत्सव २०२५' या महोत्सवासाठी रु.२०.०० लक्ष इतकी अर्थसहाय्याची रक्कम दि.७.३.२०२५ रोजी व्ही.पी.डी.ए. प्रणालीद्वारे वितरित करण्यात आली आहे.

**१०. श्री. ज्ञानेश्वरी महाराज संस्थान कमिटी, आळंदी मार्फत प्रकाशित होणाऱ्या ग्रंथराज 'श्री ज्ञानेश्वर गाथा' आणि 'श्री तुकाराम गाथा' या दोन्ही पुस्तकांच्या प्रकाशनास अर्थसहाय्य :-**

श्री ज्ञानेश्वरी महाराज संस्थान कमिटी, आळंदी मार्फत प्रकाशित होणाऱ्या ग्रंथराज 'श्री ज्ञानेश्वर गाथा' आणि 'श्री तुकाराम गाथा' या दोन्ही पुस्तकांच्या प्रकाशनास मंजूर रु.१००.०० लक्ष इतकी अर्थसहाय्याची रक्कम दि.६.५.२०२५ आणि दि.९.५.२०२५ अशा दोन टप्प्यात व्ही.पी.डी.ए. प्रणालीद्वारे वितरित करण्यात आली आहे.

**११. जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज संस्थान, देहू यांच्यामार्फत प्रकाशित होणाऱ्या 'संत तुकाराम महाराज अभंग गाथा' ग्रंथाच्या छपाईसाठी अर्थसहाय्य :-**

जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज संस्थान, देहू यांच्यामार्फत प्रकाशित होणाऱ्या 'संत तुकाराम महाराज अभंग गाथा' ग्रंथाच्या छपाईसाठी रु. १००.०० लक्ष इतकी अर्थसहाय्याची रक्कम दि.२७.०५.२०२५ रोजी व्ही.पी.डी.ए. प्रणालीद्वारे वितरित करण्यात आली आहे.

**१२. इंग्लंडमधील मराठी लेस्टर समुदायातर्फे आयोजित केलेल्या 'युरोपीय मराठी संमेलन २०२५' साठी अर्थसहाय्य :-**

इंग्लंडमधील मराठी लेस्टर समुदायातर्फे दि. ४ ते ६ जुलै, २०२५ या दरम्यान आयोजित केलेल्या 'युरोपीय मराठी संमेलन २०२५' साठी रु.१५.०० लक्ष इतकी अर्थसहाय्याची रक्कम दि.२१.५.२०२५ रोजी व्ही.पी.डी.ए. प्रणालीद्वारे वितरित करण्यात आली आहे.

**१३. रमा प्रकाशनाच्या 'हेमांगी' या अभिजात मराठी विशेषांकास अर्थसहाय्य :-**

रमा प्रकाशनाच्या 'हेमांगी' या अभिजात मराठी विशेषांकास रु.९.५० लक्ष इतकी अर्थसहाय्याची रक्कम दि.१५.७.२०२५ रोजी व्ही.पी.डी.ए. प्रणालीद्वारे वितरित करण्यात आली आहे.

**१४. प्राज्ञपाठशाळा मंडळामार्फत प्रकाशित झालेल्या 'नवभारत' ऑक्टोबर, २०२५ च्या अभिजात मराठी विशेषांकास अर्थसहाय्य :-**

प्राज्ञपाठशाळा मंडळामार्फत प्रकाशित झालेल्या 'नवभारत' ऑक्टोबर, २०२५ च्या अभिजात मराठी विशेषांकास रु.९.५० लक्ष इतकी अर्थसहाय्याची रक्कम दि.१५.७.२०२५ रोजी व्ही.पी.डी.ए. प्रणालीद्वारे वितरित करण्यात आली आहे.

**१५. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने प्रकाशित केलेल्या ग्रंथापैकी अभिजात मराठी भाषेशी संबंधित अशा ५ पुस्तकांच्या छपाईसाठी अर्थसहाय्य :-**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, प्रभादेवी, मुंबई यांच्यामार्फत प्रकाशित केलेल्या ग्रंथापैकी अभिजात मराठी भाषेशी संबंधित अशा ५ पुस्तकांच्या छपाईसाठी होणारा खर्च, छपाई आणि राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांना

पाठविण्याचा टपाल खर्च, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, मुंबई यांना दि.२८.८.२०२५ रोजी एनईएफटीद्वारे वितरित करण्यात आली आहे.

**१६. श्री बाल शिवाजी वाचनालय, मच्छे, बेळगाव या संस्थेद्वारे बेळगाव सीमाभागात होणाऱ्या मराठी भाषेचा प्रचार प्रसारार्थ कार्यक्रमासाठी अर्थसहाय्य :-**

श्री बाल शिवाजी वाचनालय, मच्छे, बेळगाव या संस्थेद्वारे बेळगाव सीमाभागात होणाऱ्या मराठी भाषेचा प्रचार प्रसारार्थ रु.५.०० लक्ष इतकी अर्थसहाय्याची रक्कम दि.५.८.२०२५ रोजी व्ही.पी.डी.ए. प्रणालीद्वारे वितरित करण्यात आली आहे.

**१७. आर्ट सर्कल, रत्नागिरी या संस्थेतर्फे झालेल्या प्रख्यात साहित्यिका सुनीताताई देशपांडे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त स्मृती संमेलनासाठी अर्थसहाय्य :-**

आर्ट सर्कल, रत्नागिरी या संस्थेतर्फे दि.७ ते ९ नोव्हेंबर, २०२५ या दरम्यान प्रख्यात साहित्यिका सुनीताताई देशपांडे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त झालेल्या स्मृती संमेलनासाठी रु.१०.०० लक्ष इतकी अर्थसहाय्याची रक्कम दि.१८.९.२०२५ रोजी व्ही.पी.डी.ए. प्रणालीद्वारे वितरित करण्यात आली आहे.

**१८. सुवर्णसूर्य फाऊंडेशन, या संस्थेतर्फे रत्नागिरी येथे मराठी भाषेचा प्रचार प्रसारार्थ आयोजित केलेल्या 'कोकण कोस्टल हाफ मॅरेथॉन-पर्व तिसरे एक घाव मराठी भाषेसाठी' या कार्यक्रमासाठी अर्थसहाय्य :-**

सुवर्णसूर्य फाऊंडेशन, या संस्थेतर्फे रत्नागिरी येथे दि.४ जानेवारी, २०२६ रोजी मराठी भाषेचा प्रचार प्रसारार्थ आयोजित केलेल्या 'कोकण कोस्टल हाफ मॅरेथॉन-पर्व तिसरे एक घाव मराठी भाषेसाठी' या नियोजित कार्यक्रमासाठी रु.२५.०० लक्ष इतकी अर्थसहाय्याची रक्कम दि.२६.९.२०२५ रोजी व्ही.पी.डी.ए. प्रणालीद्वारे वितरित करण्यात आली आहे.

**१९. माय होम इंडिया, नवी दिल्ली या संस्थेतर्फे नवी दिल्ली येथील तालकटोरा इनडोअर स्टेडियम मध्ये होणाऱ्या 'नेस्ट-फेस्ट २०२५' या कार्यक्रमासाठी अर्थसहाय्य :-**

माय होम इंडिया, नवी दिल्ली या संस्थेतर्फे दि.३ व ४ ऑक्टोबर, २०२५ रोजी नवी दिल्ली येथील तालकटोरा इनडोअर स्टेडियम मध्ये होणाऱ्या 'नेस्ट-फेस्ट २०२५' या कार्यक्रमासाठी रु.२५.०० लक्ष इतकी अर्थसहाय्याची रक्कम दि.३०.९.२०२५ रोजी व्ही.पी.डी.ए. प्रणालीद्वारे वितरित करण्यात आली आहे.

# राज्य मराठी विकास संस्था

## कर्मचारी विषयक गोषवारा

## Personnel Summary

| अ.क्र. | वर्ग | पदसंख्या |
|---|---|---|
| १. | अ | ५ |
| २. | ब (राजपत्रित) | २ |
| ३. | क | ८ |
| ४. | ड | १ |
| **एकूण** | | **१६** |

# राज्य मराठी विकास संस्था

## पदांचे वर्गीकरण

| अ क्र. (१) | पदनाम (२) | वेतनश्रेणी SCALE OF PAY (३) | पदांची संख्या (४) | DESIGNATION (५) |
|---|---|---|---|---|
| **(अ) राजपत्रित गट-अ (Gazetted Class-A)** | | | | |
| १. | संचालक | एस-२७ : ११८५००-२१४१०० | १ | Director |
| २. | उप संचालक | एस-२७ : ७८८००-२०९२०० | १ | Dy.Director |
| ३. | वरिष्ठ संशोधन सहायक | एस-२५: ६७७००-२०८७०० | १ | Senior Research Assistant |
| ४. | प्रशासकीय अधिकारी | एस-२३: ६७७००-२०८७०० | १ | Administrative Officer |
| ५. | कनिष्ठ संशोधन सहायक | एस-२०: ५६१००-१७७५०० | १ | Junior Research Assistant |
| | | **एकूण (अ)** | **५** | **Total (A)** |
| **(ब) राजपत्रित गट-ब (Gazetted Class-B)** | | | | |
| ६. | लेखा अधिकारी | एस-१६ : ४४९००-१४२४०० | १ | Accounts Officer |
| ७. | कार्यासन अधिकारी | एस-१५ : ४१८००-१३२३०० | १ | Desk Officer |
| | | **एकूण (ब)** | **२** | **Total (B)** |
| **(क) अराजपत्रित गट – क (Non-Gazetted Class-C)** | | | | |
| ८. | लघुलेखक (निम्नश्रेणी) | एस-१४ : ३८६००-१२२८०० | १ | Stenographer (L.G.) |
| ९. | सहायक | एस-१३ : ३५४००-११२४०० | ३ | Assistant |
| १०. | लिपिक-टंकलेखक | एस-६ : १९९००-६२२०० | २ | Clerk-Typist |
| ११. | रोखपाल | एस-६ : १९९००-६२२०० | १ | Cashier |
| १२. | वाहनचालक | एस-६ : १९९००-६२२०० | १ | Driver |
| | | **एकूण (क)** | **८** | **Total (C)** |
| **(ड) अराजपत्रित गट-ड (Non-Gazetted Class-D)** | | | | |
| १३. | शिपाई | एस-१ : १५०००-४७६०० | १ | Peon |
| | | **एकूण (ड)** | **१** | **Total (D)** |
| | | **एकूण (अ + ब + क + ड )** | **१६** | **Total (A+B+C+D)** |

**राज्य मराठी विकास संस्थेची माहिती https://rmvs.marathi.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

**कार्यक्रम क्रमांक-५**

## महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मराठी साहित्य, संस्कृती व कला या क्षेत्रांमध्ये महाराष्ट्रास लाभलेला थोर वारसा जतन व संवर्धन करण्यासाठी आणि विविध विषयांवरील मूलभूत संशोधन व प्रकाशन यांना उत्तेजन देण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने दिनांक १९ नोव्हेंबर, १९६० रोजी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना केली. अशा तऱ्हेच्या मंडळाची मूळ संकल्पना महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांची होती. संपूर्ण भारतात राज्य पातळीवर स्थापन करण्यात आलेले साहित्य-संस्कृती विषयक कार्य करणारे हे पहिलेच मंडळ होय. मंडळाचे पहिले अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे होते.

### (१) मंडळाचे मुख्य उद्दिष्ट

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे मुख्य उद्दिष्ट 'पुस्तक प्रकाशन' हे आहे. या मुख्य उद्दिष्टानुसारच सदर योजनेअंतर्गत साहित्य, संस्कृती, कला, इतिहास यासारख्या विषयांवर वैचारिक, समीक्षात्मक, चरित्रात्मक, वाङ्मयीन संशोधन या विषयांवरील वैविध्यपूर्ण, महत्त्वपूर्ण, नाविन्यपूर्ण व दुर्मिळ स्वरूपाचे ग्रंथ मंडळाकडून प्रकाशित केले जातात. खाजगी प्रकाशकांकडून जे गंभीर, वैचारिक, उच्च दर्जाचे बौद्धिक, वाङ्मयीन संशोधनात्मक ग्रंथ प्रकाशित केले जात नाही, असे अत्यंत महत्त्वाचे गंभीर वाङ्मयीन संशोधनात्मक ग्रंथ मंडळाकडून प्रकाशित केले जातात. मंडळाच्या साहित्य संवर्धनाच्या उदिष्टपूर्तीसाठी मंडळामार्फत खालील योजना/उपक्रम राबविले जातात.

### (२) महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाकडून राबविण्यात येणाऱ्या प्रमुख योजना/उपक्रम यांची सविस्तर माहिती-

१) **मंडळाचा पुस्तक प्रकाशन उपक्रम :-**

खाजगी प्रकाशकांमार्फत साधारणत: जी पुस्तके प्रकाशित करण्यास नकार दिला जातो अशी पुस्तके जिज्ञासू, चोखंदळ तसेच, सामान्य वाचकास कमी किंमतीत उपलब्ध करून देण्याची ही योजना आहे. सदर योजनेमध्ये वैचारिक, समीक्षात्मक, चरित्रात्मक इत्यादी विषयांवरील ग्रंथ प्रकाशित केले जातात. तसेच, मंडळाने प्रकाशित केलेल्या पुस्तकांचे मागणीनुसार पुनर्मुद्रणही केले जाते. सदर योजनेनुसार मंडळाने आतापर्यंत ७०२ पुस्तके प्रकाशित केली आहेत.

२) **ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान :-**

या योजनेअंतर्गत मराठीतील वैचारिक विषयावरील वैशिष्ट्यपूर्ण संशोधनात्मक अशा उच्च दर्जाच्या लेखनाचा तसेच, ललित साहित्यातील वाङ्मयीन दृष्टीने गुणवत्तापूर्ण असलेल्या लेखनाचा विचार अनुदानासाठी केला जातो.

३) **नवलेखक उत्तेजनार्थ अनुदान योजना :-**

या योजनेअंतर्गत ज्यांचे एकही पुस्तक प्रकाशित झाले नाही, अशा नवलेखकांना, कथा, कादंबरी, ललित गद्य, काव्य, नाटक (एकांकिका) व बालवाङ्मय या लेखनाच्या प्रकाशनासाठी मंडळाकडून अनुदान दिले जाते. आतापर्यंत सदर योजनेअंतर्गत २४०४ नवलेखकांची पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

**४) नवलेखकांची चर्चासत्रे/कार्यशाळांना अनुदान योजना** :-

नवलेखकांना ज्येष्ठ साहित्यिकांचे मार्गदर्शन व्हावे, त्यांच्या लेखनात सुधारणा व्हावी, म्हणून महाराष्ट्रात विविध ठिकाणी नवलेखकांची १० चर्चासत्रे/कार्यशाळा आयोजित केल्या जातात. मंडळाकडून महाराष्ट्रभर आजमितीपर्यंत १४२ चर्चासत्रे/कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत.

**५) साहित्य संस्थांना अनुदान :-**

या अनुदान योजनेअंतर्गत शासनामार्फत १९८९-९० सालापासून मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या विकासासाठी (१) अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ (२) विदर्भ साहित्य संघ, नागपूर (३) मराठवाडा साहित्य परिषद, छत्रपती संभाजीनगर (४) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे (५) मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई (६) कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी, (७) दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर अशा ७ संस्थांना दरवर्षी प्रत्येकी रक्कम रु. ५.०० लक्ष इतके अनुदान देण्यात येत होते. वित्तीय वर्षे २०१८-१९ पासून सदर अनुदान रु.१०.०० लक्ष करण्यात आले आहे.

**६) अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास अनुदान :-**

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाकडून दरवर्षी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित केले जाते. या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी रु.२५.०० लक्ष इतके अनुदान मंडळामार्फत दिले जात होते. वित्तीय वर्षे २०१८-१९ पासून सदर अनुदान रु. ५०.०० लक्ष करण्यात आले होते. वित्तीय वर्ष २०२२-२३ पासून सदर अनुदान रु. २.०० कोटी करण्यात आले आहे.

**७) नियतकालिकांना अनुदान :-**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळामार्फत मराठी भाषेत विविध विषयांवर प्रसिध्द होणाऱ्या ५३ नियतकालिकांना प्रतिवर्षी अनुदान वितरित केले जाते.

**८) स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना :-**

सन २०१२ पासून राज्य वाङ्मय पुरस्कार योजना सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून मंडळाकडे हस्तांतरित करण्यात आली. सदर योजना महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्यावतीने स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना या नावाने राबिण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत (अ) प्रौढ वाङ्मय विभागात २२ वाङ्मय पुरस्कार, (ब) बाल वाङ्मय विभागात ६ पुरस्कार, क) प्रथम प्रकाशन विभागात ६ पुरस्कार व (ड) सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार १ असे एकूण ३५ राज्य वाङ्मय पुरस्कार मंडळाच्यावतीने मराठी भाषा गौरव दिन (दि.२७ फेब्रुवारी) या दिवशी प्रदान केले जातात.

**९) ज्येष्ठ साहित्यिकास विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार :-**

साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या नामवंत ज्येष्ठ साहित्यिकास, ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त साहित्यिक कै. विंदा करंदीकर यांच्या नावे जीवन गौरव पुरस्कार मंडळाच्या वतीने सन २०१२-१३ पासून प्रदान करण्यात येत आहे. या पुरस्काराचे स्वरुप रु. १०.०० लक्ष रोख, मानचिन्ह व मानपत्र असे आहे.

**१०) श्री. पु. भागवत पुरस्कार :-**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून साहित्य निर्मिती क्षेत्रात लक्षणीय व उत्कृष्ट कार्य करणाऱ्या प्रकाशन संस्थेस मराठी प्रकाशन व्यवसायात मोलाचे कार्य करणारे श्री. पु. भागवत यांच्या नावे दरवर्षी पुरस्कार देण्यात येतो. या पुरस्काराचे स्वरुप रु. ५.०० लक्ष रोख , मानचिन्ह व मानपत्र असे आहे.

**११) जिल्हा साहित्य संमेलन अनुदान योजना :-**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती महामंडळाकडून दरवर्षी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास रु.२.०० कोटी अनुदान दिले जाते. या मुख्य साहित्य संमेलनाप्रमाणे मुख्य मानल्या गेलेल्या प्रवाहापेक्षा वेगळ्या प्रवाहातील जनसमुहांच्या आणि उपेक्षित वर्गांच्या अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान देण्यात यावे, या सांस्कृतिक धोरणातील सूचनेनुसार मंडळाकडून वित्तीय वर्ष २०१५-१६ पासून दरवर्षी रु.२.०० लक्ष इतके अनुदान अन्य संमेलनांना देण्यात येत होते. तथापि, वित्तीय वर्ष २०२५-२६ पासून

जिल्हा साहित्य संमेलन अनुदान योजनेंतर्गत महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील साहित्य संमेलनासाठी प्रत्येकी रुपये ५.०० लक्ष इतके अनुदान देण्यात येत आहे.

**१२) बृहद्ग्रंथांचे प्रकल्प योजना** :-

मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र.सासंमं २०१६/प्र.क्र.६०/२०१६/भाषा-३, दिनांक १३ मे, २०१६ अन्वये महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्यावतीने 'बृहद्ग्रंथ प्रकल्प' योजना राबविण्यात येते. महाराष्ट्राचे साहित्य, संस्कृती, कला, इतिहास यांसारख्या विषयांवर मराठीमध्ये ग्रंथ निर्मिती करणे हे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या मुख्य उद्दिष्टानुसारच सदर योजनेअंतर्गत साहित्य, संस्कृती, कला, इतिहास यांसारख्या विषंयांवर वैचारिक, समीक्षात्मक, चरित्रात्मक वाङ्मयीन संशोधन या विषयांवरील वैविध्यपूर्ण, महत्वपूर्ण, नाविण्यपूर्ण व दुर्मिळ स्वरुपाचे बृहद्ग्रंथ प्रकल्प हाती घेण्यात येऊन, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून प्रकाशित केले जातात.

## महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

## कर्मचारीविषयक गोषवारा

## Personnel Summary

| अ.क्र. | वर्ग | पदसंख्या |
|---|---|---|
| १. | अ | १ |
| २. | ब (राजपत्रित) | १ |
| ३. | ब (अराजपत्रित) | ४ |
| ४. | क | १३ |
| ५. | ड | २ |
| **एकूण** | | **२१** |

## महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

## पदांचे वर्गीकरण

| अ.क्र.<br>(१) | पदनाम<br>(२) | वेतनश्रेणी<br>SCALE OF PAY<br>(३) | पदांची संख्या<br>(४) | DESIGNATION<br>(५) |
|---|---|---|---|---|
| **(अ) राजपत्रित गट-अ (Gazetted Class-A)** | | | | |
| १. | सचिव | एस-२३ : ६७७००-२०८७०० | १ | Secretary |
| | | **एकूण (अ)** | **१** | **Total (A)** |
| **(ब) राजपत्रित गट-ब (Gazetted Class-B)** | | | | |
| २. | सहायक लेखा अधिकारी | एस-१५ : ४१८००-१३२३०० | १ | Assistant Account Officer |
| | | **एकूण (ब)** | **१** | **Total (B)** |
| **(क) अराजपत्रित गट-ब (Non-Gazetted Class-B)** | | | | |
| ३. | अधीक्षक | एस-१४ : ३८६००-१२२८०० | १ | Superintendent |
| ४. | प्रपाठक | एस-१४ : ३८६००-१२२८०० | १ | Reader |
| ५. | उच्चश्रेणी लघुलेखक | एस-१६ : ४४९००-१४२४०० | १ | Stenographer (H.G.) |
| ६. | निम्नश्रेणी लघुलेखक | एस-१५ : ४१८००-१३२३०० | १ | Stenographer (L.G.) |
| | | **एकूण (क)** | **४** | **Total (C)** |
| **(ड) अराजपत्रित गट-क (Non-Gazetted Class-C)** | | | | |
| ७. | वरिष्ठ लिपिक | एस-८ : २५५००-८११०० | ४ | Senior Clerk |
| ८. | ग्रंथालयीन सहायक | एस-७ : २१७००-६९१०० | १ | Assistant Librarian |
| ९. | लिपिक-टंकलेखक | एस-६ : १९९००-६३२०० | ७ | Clerk-Typist |
| १०. | वाहनचालक | एस-६ : १९९००-६३२०० | १ | Driver |
| | | **एकूण (ड)** | **१३** | **Total (D)** |
| **(इ) अराजपत्रित गट-ड (Non-Gazetted Class-D)** | | | | |
| ११. | शिपाई | एस- १ : १५०००-४७६०० | २ | Peon |
| | | **एकूण (इ)** | **२** | **Total (E)** |
| | | **एकूण (अ+ब+क+ड+इ)** | **२१** | **Total (A+B+C+D+E)** |

**महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाची माहिती https://sahitya.marathi.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

## कार्यक्रम क्रमांक-६

## महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ

महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या वेळी राज्यकारभारासंबंधी मूलभूत धोरण सूचित करणारी काही सूत्रे सांगितली. त्या सूत्रांनुसार मराठी भाषा व साहित्य यांच्या अभिवृद्धीसाठी राज्य शासनाने दिनांक १९ नोव्हेंबर, १९६० रोजी कै.तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना केली. या मंडळाने जे अनेकविध उपक्रम सुरु केले, त्यापैकी एक प्रमुख व वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम म्हणजे मराठी विश्वकोशाची निर्मिती हा होय.

दिनांक ०१ डिसेंबर, १९८० रोजी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे विभाजन होऊन, मराठी विश्वकोशाच्या संपादन व प्रकाशन कार्यासाठी महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ या राज्यस्तरीय मंडळाची स्थापना झाली आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या निधनानंतर (दिनांक २७ मे, १९९४) प्रा. मे. पु. रेगे, प्रा. रा. ग. जाधव, डॉ. श्रीकांत जिचकार, डॉ. विजया वाड, श्री. दिलीप करंबेळकर, डॉ. श्रीधर तथा राजा दीक्षित यांनी विश्वकोशाचे अध्यक्ष व प्रमुख संपादक म्हणून काम पाहिले आहे. मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र.विश्वनि-२०२४/प्र.क्र.४६/भाषा-२, दि.२६.११.२०२४ अन्वये महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाची पुर्नरचना करण्यात आली असून, डॉ. रवींद्र शोभणे यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

मराठी विश्वकोश हा सर्वविषयसंग्राहक ज्ञानकोश आहे. त्यामध्ये मानव्य व विज्ञान आणि तंत्रज्ञानातील मूलभूत ज्ञानशाखांतील सारभूत माहिती नोंदींच्या/लेखांच्या रुपाने प्रकाशित करण्यात आली आहे. मराठी विश्वकोशाचे १ ते २० (संहिता खंड) खंड वर्णानुक्रमाने (अ ते ज्ञ) प्रकाशित करण्यात आलेले आहेत. तसेच, खंड २१ (सूचीखंड) प्रकाशित करण्यात आलेला आहे.

**१) मराठी विश्वकोशाचे अद्ययावतीकरण :-**

कालौघानुसार सर्व विषय व ज्ञानशाखांमध्ये झालेले बदल व वाढ यामुळे विश्वकोशातील अनेक नोंदीमध्ये सुधारणा तसेच, काही अतिरिक्त नोंदी समाविष्ट करणे व अद्ययावतीकरणाचे हे काम कालमर्यादित स्वरूपात करणे आवश्यक बनले आहे. केलेले काम तितक्याच जलद गतीने जनतेपर्यंत पोहचविण्याकरिता माहिती व तंत्रज्ञानाची मदत घेऊन, सर्व ज्ञानशाखातील नोंदी संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. याकरिता विविध विद्यापीठे, शैक्षणिक व संशोधन संस्था इत्यादींच्या सहकार्याने ज्ञानमंडळे स्थापन करुन, त्याच्या माध्यमातून मराठी विश्वकोशातील नोंदी अद्ययावत करण्याचे तसेच, नवीन नोंदी समाविष्ट करण्याकरिता ज्ञानमंडळे स्थापन करुन, त्याच्या माध्यमातून मराठी विश्वकोशातील नोंदी अद्ययावत करण्याचे तसेच, नवीन नोंदी समाविष्ट करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. विविध विषयांची ६० ज्ञानमंडळे स्थापन करण्याचे नियोजन असून यापैकी ४५ ज्ञानमंडळे स्थापन करण्यात आलेले असून, ज्ञानमंडळ उपक्रमास मुदतवाढ मिळण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

मराठी विश्वकोशाचे संपादन कार्य हे विज्ञान व तंत्रविद्या, मानव्यविद्या, कला आणि प्रशासन अशा ४ शाखांमध्ये विभागलेले आहेत. ज्ञानविज्ञानाच्या सर्वच शाखांमध्ये कायमस्वरुपी तज्ज्ञ संपादक नेमणे शक्य नसल्याने, विविध शाखांतील तज्ज्ञांच्या सवडीनुसार अभ्यागत संपादक म्हणून त्यांचे सहकार्य उपलब्ध करून घेण्यात येते. वाई, जिल्हा सातारा येथे विश्वकोशाचे अद्ययावत ग्रंथालय असून, त्यामध्ये सुमारे ५० हजारांहून अधिक संदर्भग्रंथ उपलब्ध आहेत.

**(२) विक्रीस उपलब्ध असलेली प्रकाशने :-**

| अ.क्र. | पुस्तकाचे / सीडीचे नाव | मूळ किंमत (रुपये) | सवलतीची किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १. | मराठी विश्वकोश खंड. | २५०/- | १७५/- |
| २. | १ ते १७ खंडाच्या ६ सीडींचा संच. | १०००/- | ७००/- |
| ३. | कुमार विश्वकोश (जीवसृष्टी आणि पर्यावरण) खंड-१ (भाग-१) | ५००/- | ३५०/- |
| ४. | कुमार विश्वकोश (जीवसृष्टी आणि पर्यावरण) खंड-१ (भाग-२) | ५००/- | ३५०/- |
| ५. | कुमार विश्वकोश (जीवसृष्टी आणि पर्यावरण) खंड-१ (भाग-३) | ५००/- | ३५०/- |
| ६. | कुमार विश्वकोश (जीवसृष्टी आणि पर्यावरण) खंड-१ (भाग-४) | ५००/- | ३५०/- |
| ७. | मराठी विश्वकोश खंड १ ते २० पेनड्राईव्ह. | ८००/- | -- |
| ८. | विश्वकोशाचे सर्व खंड मोबाईल ॲप स्वरुपात उपलब्ध. | -- | -- |

'मराठी विश्वकोश' हे भ्रमणध्वनी ॲप अनन्या मल्टिटेक प्रा.लि. या कंपनीकडून विकसित करण्यात आले असून, त्याद्वारे विश्वकोशाच्या १ ते २० खंडातील सर्व नोंदी भ्रमणध्वनीवर आता एका क्लिकवर मोफत उपलब्ध करुन दिल्या आहेत. हे ॲप गुगल प्ले स्टोअरवर सहजरित्या उपलब्ध आहे.

**(३) मंडळाचे आगामी उपक्रम :-**

(१) मराठी विश्वकोशाचे सातत्याने अद्ययावतीकरण व प्रकाशन.

(२) मराठी विश्वकोश खंड १ ते २० मध्ये आलेला आक्षेपार्ह मजकूर काढून टाकणे तसेच, किरकोळ दुरुस्त्या करुन, नवीन सुधारित दुसरी आवृत्ती छपाई करणे.

(३) कुमार विश्वकोश २ ते १२ खंडांचे संपादन व प्रकाशन.

(४) मराठी विश्वकोश खंडांचे मुद्रण-विश्वकोश लेखन, समीक्षण, संपादन व प्रकाशनासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर.

(५) विश्वकोश वार्षिक अहवाल २०२५-२६.

(६) विविध विद्यापीठे / नामांकित संस्था भेटी / दौरे (विश्वकोश प्रचार-प्रसार).

(७) आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय सभेत विश्वकोश सहभाग (विश्वकोश प्रचार-प्रसार).

(८) संपूर्ण महाराष्ट्रात अभिजात मराठी भाषा दिन व सप्ताह सादरीकरण.

(९) संपूर्ण महाराष्ट्रात वाचन प्रेरणा दिन सादरीकरण.

(१०) संपूर्ण महाराष्ट्रात मराठी भाषा पंधरवडा सादरीकरण.

(११) संपूर्ण महाराष्ट्रात मराठी भाषा गौरव दिन सादरीकरण.

(१२) संपूर्ण महाराष्ट्रात ऑनलाईन ज्ञानवर्धन स्पर्धा आयोजित करणे.

(१३) कुमार विश्वकोश खंड २ भाग-३ व भाग-४ हे दृकश्राव्य स्वरूपात तयार करणे.

(१४) बालकोश नियोजनाची कामे.

(१५) विश्वकोशाचे माहिती पुस्तक नव्याने तयार करुन प्रसिध्द करणे.

(१६) मंडळाच्या संकेतस्थळावरील नोंदींचे पुनर्वाचन करुन, त्यातील त्रुटी दूर करणे.

(१७)आयत्यावेळी येणारे उपक्रम.

**(४) ऑलिंपिक माहितीकोश :-**

ऑलिंपिक माहितीकोश या प्रकल्पांतर्गत शाळा, महाविद्यालये शारीरिक शिक्षण महाविद्यालये, क्रीडा संघटना, खेळाडू यांना ऑलिंपिक खेळाविषयी माहिती देणे, हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. कारण अद्याप मराठी भाषेत ऑलिंपिक या खेळाबद्दल एकत्र माहिती असणारे पुस्तक किंवा पुस्तक समूह/पुस्तक मालिका, अंक/खंड उपलब्ध नाहीत. यामुळे सदर प्रकल्प हा महत्त्वाचा ठरतो. सदर माहितीकोश पाच खंडात ई-पुस्तक स्वरुपात तयार करण्यात येणार असून, प्रत्येक खंड साधारणपणे १००० पृष्ठांचा असेल.

## महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ (विभागीय कार्यालयासह)

## कर्मचारीविषयक गोषवारा
## Personnel Summary

| अ.क्र. | वर्ग | पदसंख्या |
|---|---|---|
| १. | अ | १ |
| २. | ब (राजपत्रित) | २ |
| ३. | ब (अराजपत्रित) | ११ |
| ४. | क | १९ |
| ५. | ड | ७ |
| ६. | बाह्ययंत्रणेवरील पदे | ५ |
| **एकूण** | | **४५** |

# महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ

## पदांचे वर्गीकरण

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | वेतनश्रेणी SCALE OF PAY (३) | पदांची संख्या (४) | DESIGNATION (५) |
|---|---|---|---|---|
| **१. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई कार्यालय** | | | | |
| **(अ) राजपत्रित गट-अ (Gazetted Class-A)** | | | | |
| १. | सचिव (विभाग प्रमुख) | एस-२३ : ६७७००-२०८७०० | १ | Secretary |
| | | **एकूण (अ)** | **१** | **Total (A)** |
| **(ब) राजपत्रित गट-ब (Gazetted Class-B)** | | | | |
| २. | सहायक लेखा अधिकारी | एस-१५ : ४१८००-१३२३०० | १ | Assistant Account Officer |
| | | **एकूण (ब)** | **१** | **Total (B)** |
| **(क) अराजपत्रित गट-ब (Non-Gazetted Class-B)** | | | | |
| ३. | अधीक्षक | एस-१४ : ३८६००-१२२८०० | १ | Superintendent |
| ४. | विद्याव्यासंगी सहायक | एस-१५ : ४१८००-१३२३०० | १ | Scholar Assistant |
| ५. | निम्नश्रेणी लघुलेखक | एस-१५ : ४१८००-१३२३०० | २ | Stenographer (L.G.) |
| | | **एकूण (क)** | **४** | **Total (C)** |
| **(ड) अराजपत्रित गट-क (Non-Gazetted Class-C)** | | | | |
| ६. | वरिष्ठ लिपीक | एस-८ : २५५००-८११०० | २ | Senior Clerk |
| ७. | लिपिक-टंकलेखक | एस-६ : १९९००-६३२०० | २ | Clerk-Typist |
| ८. | वाहनचालक | एस-६ : १९९००-६३२०० | १ | Driver |
| | | **एकूण (ड)** | **५** | **Total (D)** |
| **(इ) अराजपत्रित गट-ड (Non-Gazetted Class-D)** | | | | |
| ९. | शिपाई | एस- १ : १५०००-४७६०० | २ | Peon |
| | | **एकूण (इ)** | **२** | **Total (E)** |
| | | | | |
| | | **एकूण (अ+ब+क+ड+इ)** | **१३** | **Total (A+B+C+D+E)** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **२. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, वाई कार्यालय** | | | | |
| **(अ) राजपत्रित गट-ब (Gazetted Class-B)** | | | | |
| १. | सहायक सचिव<br>(कार्यालय प्रमुख) | एस-१५ : ४१८००-१३२३०० | १ | Assistant Secretary |
| | | **एकूण (अ)** | **१** | **Total (A)** |
| **(ब) अराजपत्रित गट-ब (Non-Gazetted Class-B)** | | | | |
| २. | विद्याव्यासंगी सहायक | एस-१५ : ४१८००-१३२३०० | ७ | Scholar Assistant |
| | | **एकूण (ब)** | **७** | **Total (B)** |
| **(क) अराजपत्रित गट-क (Non-Gazetted Class-C)** | | | | |
| ३. | संपादकीय सहायक | एस-१० : २९२००-९२३०० | ७ | Editorial Assistant |
| ४. | ग्रंथालयीन सहायक | एस-७ : २१७००-६९१०० | २ | Library Assistant |
| ५. | लिपिक-टंकलेखक | एस-६ : १९९००-६३२०० | ५ | Clerk-Typist |
| | | **एकूण (क)** | **१४** | **Total (C)** |
| **(ड) अराजपत्रित गट-ड (Non-Gazetted Class-D)** | | | | |
| ६. | शिपाई | एस-१ : १५०००-४७६०० | ५ | Peon |
| | | **एकूण (ड)** | **५** | **Total (D)** |
| | | **एकूण (अ+ब+क+ड)** | **२७** | **Total (A+B+C+D)** |
| **३. बाह्ययंत्रणेद्वारे भरावयाची पदे** | | | | |
| ७. | विभाग संपादक<br>(बाह्ययंत्रणेवरील पदे) | - | २ | Section Editor |
| ८. | सहसंपादक<br>(बाह्ययंत्रणेवरील पदे) | - | २ | Joint Editor |
| ९. | कला संपादक<br>(बाह्ययंत्रणेवरील पदे) | - | १ | Art Editor |
| | | **एकूण** | **५** | **Total** |
| | | **एकूण (१+२+३)** | **४५** | **Total (1+2+3)** |

**महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाची माहिती https://marathivishwakosh.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

# * वित्तीय आवश्यकता *

## * सन २०२५-२६ अर्थसंकल्पीय तरतूद व सुधारित अंदाज आणि सन २०२६-२७ अर्थसंकल्पीय तरतूद *

**(अनिवार्य) (Committed)**

(रुपये हजारात)

| अ.क्र. | लेखाशीर्ष संकेतांक | सन २०२५-२६ अर्थसंकल्पीय तरतूद | सन २०२५-२६ सुधारित अंदाज | सन २०२६-२७ अर्थसंकल्पीय तरतूद |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | मराठी भाषा विभाग (२०२५ ५०५४) | ६,७९,४८ | ५,७४,३० | ८,०४,९१ |
| २. | भाषा संचालनालय (२०२५ ५०६३) | ११,८८,२८ | ११,०६,४१ | १३,९६,७४ |
| ३. | मराठी भाषा भवन (२०२५ ५४०१) | २,४७ | २,४७ | २,७२ |
| ४. | राज्य मराठी विकास संस्था (२२०५ ३१६१) | २,३५,८६ | १,५३,१४ | २,२८,६९ |
| ५. | महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ (२२०५ ३१७२) | ३,६२,८२ | ३,१४,४३ | ३,७३,४० |
| ६. | मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ (२२०५ ३१८१) | ४,५१,५८ | ३,९५,५७ | ४,३६,८८ |
| ७. | सामाजिक सुधारणा व कल्याण कार्यक्रम, ठेव संलग्न विमा योजना (२२३५ A८९३) | २,४० | २,४० | २,४० |
| ८. | घर बांधणी अग्रीम (७६१० २१०५) | २,००,०० | १,०४,०० | २,००,०० |
| ९. | मोटार वाहने खरेदी अग्रीम (७६१० २११४) | २५,०० | १३,०० | २५,०० |
| १०. | इतर वाहने खरेदी अग्रीम (७६१० २१२३) | १ | १ | १ |
| ११. | संगणक खरेदी अग्रीम (७६१० २१३२) | १,०० | ५२ | १,०० |
| | **एकूण** | **३१,४८,९०** | **२६,६६,२५** | **३४,७१,७५** |

*** सन २०२५-२६ अर्थसंकल्पीय तरतूद व सुधारित अंदाज आणि सन २०२६-२७ अर्थसंकल्पीय तरतूद ***

**(कार्यक्रम) (Scheme)**

(रुपये हजारात)

| अ.क्र. | योजनेचे नाव व लेखाशीर्ष | सन २०२५-२६ अर्थसंकल्पीय तरतूद | सन २०२५-२६ सुधारित अंदाज | सन २०२६-२७ अर्थसंकल्पीय तरतूद |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | शासकीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण. (२०५२ ५१८१) | ५,०० | ३,५० | ५,०० |
| २. | ई- गव्हर्नन्स प्रकल्पाची अंमलबजावणी. (२०५२ ५१३४) | ४०,०० | २८,०० | १,७८,०० |
| ३. | मराठी भाषा प्रचार व प्रसारासाठी हाती घ्यावयाचे उपक्रम. (२०५२ ५२३२) | ४,२४,४० | ४,२३,८० | २०,००,०० |
| ४. | मराठी भाषा संशोधन, विकास व सांस्कृतिक केंद्र स्थापन करणे. (४०५९ २५३२) | १,३७,५०,०० | ९६,२५,०० | ८०,००,०० |
| ५. | राज्य मराठी विकास संस्था. (२२०५ ३२०५) | ७३,६०,६० | ५८,८८,४८ | १३२,७७,०० |
| ६. | राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ. (२२०५ ३२१४) | २,२५,०० | २,२५,०० | २,२५,०० |
| ७. | मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे विकास कार्यक्रम. (२२०५ ३२२३) | १,००,०० | ७०,०० | ४,००,०० |
| ८. | उत्तम पुस्तकांना उत्तेजन. (२२०५ ३१९९) | ५७,०० | ५७,०० | ५५,०० |
| ९. | साहित्य संस्थाना अनुदाने. (२२०५ ३३९५) | ७०,०० | ७०,०० | ७०,०० |
| १०. | नवलेखक योजने अंतर्गत पुस्तक प्रकाशनासाठी व हस्तलिखितांवरील अभिप्रायांबद्दल तज्ज्ञांच्या मानधनासाठी अनुदान. (२२०५ ३४०१) | ८,०० | ५,६० | ८,०० |
| ११. | नवोदित लेखकांसाठी कार्यशाळा व चर्चासत्रे यासाठी अनुदान. (२२०५ ३४१२) | ५,०० | ५,०० | ५,०० |
| १२. | नियतकालिकांच्या प्रकाशनासाठी अनुदान. (२२०५ ३४२१) | २२,०० | २२,०० | २५,०० |
| १३. | ललितेतर वाङ्मयातील पुस्तकांच्या प्रकाशनार्थ अनुदान. (२२०५ ३४३९) | ५,०० | २,०० | २,०० |
| १४. | अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास अनुदान. (२२०५ ३४४८) | २,००,०० | २,००,०० | ५,००,०० |
| १५. | पुस्तकांचे गाव विकसित करण्याकरिता सहायक अनुदान. (२२०५ ३६५३) | २,२८,०० | १,५९,६० | २,५०,०० |
| | **एकूण तरतूद** | **२,२५,००,००** | **१,६७,८४,९८** | **२,५०,००,००** |

## * सन २०२५-२६ अर्थसंकल्पीय तरतूद व सुधारित अंदाज आणि सन २०२६-२७ अर्थसंकल्पीय तरतूद *

**(गोषवारा)**

(रुपये हजारात)

| अ.क्र. | योजनेचे नाव व लेखाशीर्ष | सन २०२५-२६ अर्थसंकल्पीय तरतूद | सन २०२५-२६ सुधारित अंदाज | सन २०२६-२७ अर्थसंकल्पीय तरतूद |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | **(अनिवार्य) (Committed)** | ३१,४८,९० | २६,६६,२५ | ३४,७१,७५ |
| | **(कार्यक्रम) (Scheme)** | २,२५,००,०० | १,६७,८४,९८ | २,५०,००,०० |
| | **एकूण** | **२,५६,४८,९०** | **१,९४,५१,२३** | **२,८४,७१,७५** |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई